CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत


न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ११ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १६२ | पाने १२ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



ज्याप्रमाणे शरीर अशक्त झाल्यावर रोगांनी ग्रस्त होते, त्याचप्रमाणे समाजाचीही स्थिती होते. जेव्हा समाजात एकता, समरसता आणि सामाजिक मूल्यांप्रति असलेली निष्ठा कमी होते, तेव्हा सर्व वाईट गोष्टी वाढतात. जेव्हा सर्व समाज एका शरीराप्रमाणे आहे, अशी भावना प्रबळ होते तेव्हा सर्व वाईट गोष्टी नष्ट होतात.

**- स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# विजय यांचा शपथविधी

**● ६० वर्षांनंतर द्रविडेतर विचारसरणीचे सरकार ● राहुल गांधी यांची उपस्थिती**

◆ **चेन्नई, १० मे**

येथे रविवारी झालेल्या एका शानदार समारंभात सी. जोसेफ विजय यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या समारंभाला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी उपस्थित होते. या शपथविधीमुळे दक्षिण भारतातील राज्यात मागील ६० वर्षांत प्रथमच द्रमुक किंवा अण्णाद्रमुक व्यतिरिक्त अन्य पक्षाचे सरकार सत्तेत आले आहे.

त्यांचे मंत्रिमंडळ तरुण आणि अनुभवी व्यक्तींचे एक मिश्रण असून, विजय यांच्या मुख्य चमूला मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. मी कोणत्याही राजघराण्यातील नाही आणि लोकांनी स्वागत करून स्वीकारले आहे. खोट्या आश्वासनांनी लोकांची फसवणूक करणार नाही, असे विजय यांनी पहिल्या भाषणात सांगितले.

तामिळनाडूत एक नवीन शासनव्यवस्था सुरू झाली आहे आणि खऱ्या, धर्मनिरपेक्ष सामाजिक न्यायाचे एक नवे पर्व आता सुरू होत आहे, असे विजय यांनी नमूद केले. जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर झालेल्या कार्यक्रमाला विजय यांचे वडील एस. ए. चंद्रशेखर, आई शोभा, दक्षिणेतील आघाडीची अभिनेत्री तृषा आणि निमंत्रितांची मोठी गर्दी होती.

राज्यपाल आर. व्ही. आर्लेकर यांनी विजय आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील नऊ सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यात द्रविड चळवळीतील ज्येष्ठ नेते के. ए. सेंगोत्तैयन, डॉ. टी. के. प्रभू आणि एस. कीर्तना यासारख्या तरुण चेहऱ्यांचा समावेश होता. निवडणूक चिन्ह असलेल्या शिट्यांचा गजर यावेळी टीव्हीकेच्या कार्यकर्त्यांनी केला. या गजरातच विजय यांनी द्रमुक राजवटीतील बहुतांश मंत्र्यांच्या विपरित ईश्वराच्या नावाने मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनीही ईश्वराच्या नावानेच शपथ घेतली. (वृत्तसंस्था)



सी जोसेफ विजय यांना शपथ देताना राज्यपाल राजेंद्र आर्लेकर

### पहिला निर्णय २०० युनिट मोफत विजेचा

**जोसेफ विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर लगेच घरगुती ग्राहकांसाठी २०० युनिट्स मोफत वीज, महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष दलाची स्थापना आणि राज्यभरात मादकपदार्थ तस्करीविरोधात पथकांची उभारणी करण्यास मंजुरी देणाऱ्या कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या.**

# पेट्रोलियम उत्पादनांचा संयमाने वापर करा : पंतप्रधान

### विदेशी चलनाची होईल बचत

◆ **हैदराबाद, १० मे**

पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि जगभरात वाढत असलेल्या ऊर्जा संकटाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोलियम उत्पादनांचे संयमाने वापर करा, असे आवाहन नागरिकांना केले आहे.

पेट्रोल,डिझेल आणि गॅससारख्या बाबींचा वापर गरजेनुसार करणे ही आज काळाची गरज आहे. यामुळे देशातील विदेशी चलनाची बचत होईल आणि युद्धासारख्या परिस्थितीचा परिणामही कमी होईल, असे नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. विदेशी चलन वाचवण्यासाठी सोने खरेदीचा मोह टाळा, असे आवाहन त्यांनी केले.

हैदराबाद येथे ९,४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणीचा कार्यक्रम त्यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते सभेला संबोधित करीत होते.



पेट्रोलियम पदार्थांची आयात भारत मोठ्या प्रमाणात करतो. अशा परिस्थितीत तुम्ही पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर गरजेपेक्षा जास्त कराल, तर त्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होईल. संपूर्ण जग सध्या ऊर्जा संकटातून जात आहे आणि पश्चिम आशियातील तणावामुळे चिंता अधिकच वाढली आहे. त्यामुळे पेट्रोलियम उत्पादनांचा वापर विचारपूर्वक करावा. केवळ विदेशी चलनाची बचत होणार नाही, तर युद्ध आणि जागतिक प्रभावाचा परिणामही कमी होईल.

**सौरऊर्जेच्या क्षेत्रात भारत प्रमुख देशांच्या यादीत**

मागील काही वर्षांत सौरऊर्जेच्या क्षेत्रात भारत जगातील प्रमुख देशांच्या यादीत पोहोचला आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण झपाट्याने वाढवण्यात आले. सरकार अगोदरच प्रत्येक घरापर्यंत एलपीजी पाठवण्यासाठी काम करीत आहे. पाईप गॅस स्वस्तात उपलब्ध करण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. सोबतच सीएनजी आधारित व्यवस्थेलाही प्रोत्साहन दिले जात आहे. या सर्व प्रयत्नांमुळे देश जगात उद्भवलेल्या ऊर्जा संकटाचा सामना चांगल्या प्रकारे करीत आहे, असे मोदी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### कारणे नको, आश्वासने पाळा : एम. के. स्टॅलिन

**चेन्नई** : तामिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच जोसेफ विजय यांनी राज्याच्या आर्थिक स्थितीवर भाष्य केले. राज्यावरील १० लाख कोटींच्या कर्जाचा मुद्दा उपस्थित करीत विरोधकांवर निशाना साधला. त्यावरून माजी मुख्यमंत्री आणि द्रमुकचे प्रमुख एम. के. स्टॅलिन चांगलेच भडकले. मुख्यमंत्र्यांनी कारणे सांगू नये, आता आश्नासनाची पूर्तता करावी असा चिमटा काढला. विजय यांना शुभेच्छा देतानाच स्टॅलिन म्हणाले, सरकारकडे पैसे नाहीत, असे लगेचच म्हणायला सुरुवात करू नका. पैसा आहे. मात्र, गरज आहे ती केवळ तो जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या इच्छाशक्तीची आणि शासन करण्याची क्षमता दाखवण्याची. गत सरकारने १० लाख कोटींचे कर्ज ठेवल्याचा आरोप करून मुद्दा भरकटवू नका. पुन्हा जनतेची फसवणूक करू नका. तामिळनाडूच्या कर्जाची पातळी ही विहित मर्यादितच आहे.

### ऑनलाईन प्रणालीद्वारे सर्व पदांच्या बदल्या

**मुंबई** : महिला व बाल विकास विभागातील सर्व पदांच्या बदल्या आता केंद्रित ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाने दिली आहे. या निर्णयामुळे बदली प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार असून कर्मचाऱ्यांना अधिक सुलभ आणि न्याय्य पद्धतीने बदलीची संधी उपलब्ध होणार आहे. विभागातील बदल्या डिजिटल प्रणालीद्वारे केल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन संपूर्ण प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार असल्याचे विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. बदली प्रक्रियेत गुणवत्ता, सेवाज्येष्ठता, प्राधान्यक्रम आणि नियमांचा वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार केला जाणार आहे. राज्यशासन विविध विभागांमध्ये ई-गव्हर्नन्स प्रणालीचा वापर वाढवत असून महिला व बाल विकास विभागातही डिजिटल प्रशासनाला प्राधान्य दिले जात आहे.

### राज्यभर होरपळ; बहुतेक जिल्ह्यांमध्ये पारा ४० अंशावर

**मुंबई** : राज्यात मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही अंशी कमी झालेला उष्मा आता पुन्हा एकदा वाढू लागला आहे. राज्यातील पश्चिमी विक्षोभाचा (वादळाचा) प्रभाव हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे बहुतांश भागातील उकाड्यात वाढ झाली आहे. राज्यातील किनारपट्टी वगळता बहुतेक जिल्ह्यांमध्ये पारा ४० अशांवर नोंदला गेला. मागील काही दिवसांपासून विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण कोकणातील काही जिल्ह्यांवर पश्चिमी विक्षोभाचा (वादळाचा) प्रभाव असल्याने पावसाची तसेच काही भागात गारपिटीची नोंद होत होती. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागातील कमाल तापमानात काहीशी घट नोंदली जात होती. त्यामुळे नागरिकांना काही काळ तीव्र उष्णतेपासून दिलासा मिळाला होता. पुढील काही दिवसात राज्यातील अंतर्गत भागातील कमाल तापम नात १ ते २ अंशांनी वाढ होईल, अशी शक्याता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# योगी आदित्यनाथ यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार

**दोन कॅबिनेट, चार राज्य मंत्र्यांचा समावेश**

◆ **लखनौ, १० मे**



मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या दुसऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात उत्तरप्रदेश सरकारने दोन कॅबिनेट आणि चार राज्यमंत्र्यांचा समावेश करण्यात आला, तर रविवारी दोन राज्यमंत्र्यांना बढती देऊन त्यांना स्वतंत्र कारभार सोपवण्यात आला.

पुढील वर्षाच्या सुरुवातीला राज्यात नियोजित असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या आधी हा मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. जन भवन येथे आयोजित शपथविधी समारंभात भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र चौधरी आणि सपाचे बंडखोर नेते मनोज पांडे यांची कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. राज्यमंत्री अजित पाल सिंह आणि सोमेंद्र तोमर यांना बढती देऊन स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्रिपद देण्यात आले.

कृष्ण पासवान, सुरेंद्र दिलेर, हंसराज विश्वकर्मा आणि कैलाश राजपूत या चार नवीन राज्यमंत्र्यांना राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. २०२४ मध्ये सरकार स्थापनेनंतर दोन वर्षांनी झालेल्या पहिला विस्तारानंतर मंत्रिमंडळाचा हा दुसरा विस्तार होता. उत्तरप्रदेश विधानसभेची एकूण सदस्यसंख्या ४०३ असल्याने मंत्रिमंडळाचा कमाल आकार ६० असू शकतो. या विस्तारापूर्वी ५४ मंत्री होते, यामुळे सहा पदे रिक्त होती. (वृत्तसंस्था)

# हिमंता बिस्व सरमा उद्या घेणार शपथ

◆ **गुवाहाटी, १० मे**

आसाम भाजपा विधिमंडळ पक्षाने रविवारी येथे पक्षाच्या मुख्यालयात आयोजित बैठकीत हिमंता बिस्व सरमा यांची सलग दुसऱ्या कार्यकाळासाठी आपला नेते आणि आसामचा मुख्यमंत्री म्हणून एकमताने पुन्हा निवड केली.



निवडणुकीनंतर लगेच सरमा यांनी सहा सदस्यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करीत राज्यपालांची भेट घेतली होती आणि १२ मे रोजी नवीन सरकार स्थापन करण्याचा दावा केला होता.

राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी सरमा यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले. सरमा यांनी राज्यपालांकडे रालोआच्या १०२ आमदारांनी स्वाक्षरी केलेले पाठिंब्याचे पत्रही सादर केले. भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक केंद्रीय निरीक्षक जे. पी. नड्डा आणि नायबसिंह सैनी यांच्या उपस्थितीत पार पडली. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदींच्या सभेपूर्वी बंगळुरूतून स्फोटके जप्त

**तीन किमी अंतरावर जिलेटिनच्या कांड्या**

◆ **बंगळुरू, १० मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बंगळुरू दौऱ्यापूर्वी सुरक्षा यंत्रणांना मोठी सतर्कता दाखवली. कार्यक्रम स्थळापासून तीन किमी अंतरावर फुटपाथवरून जिलेटीनच्या दोन कांड्या रविवारी सकाळी जप्त केल्या. या घटनेनंतर परिसरात सुरक्षा आणखी वाढवण्यात आली. या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतले असून, त्याची कसून चौकशी सुरू आहे.

नरेंद्र मोदी यांच्या आगमनापूर्वी पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा संपूर्ण मार्गावरील आणि जवळपासच्या परिसराची तपासणी करीत होते. त्यावेळी त्यांना एक संशयास्पद वस्तू दिसली. तातडीने बॉम्बनाशक पथकाला पाचारण करण्यात आले. तपासणी केली असता, त्या जिलेटिनच्या कांड्या असल्याचे निष्पन्न झाले. तिथे जिलेटिनच्या दोन कांड्या सापडल्याची माहिती समोर आली.

नरेंद्र मोदी यांच्या सभास्थळापासून तीन किमी अंतरावर जिलेटिनच्या कांड्या सापडल्या, असे बंगळुरू सेंट्रल रेंजच्या पोलिस उपमहानिरीक्षकांनी सांगितले. फुटपाथवर जिलेटिनच्या कांड्या कुठून आल्या, याचा तपास केला जात आहे. या घटनेनंतर पोलिसांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आणि संशयास्पद हालचालींवर नजर ठेवली. सुरक्षा यंत्रणा परिसरातील सीसीटीव्हीची तपासणी करीत आहेत. या प्रकरणात अद्याप कुणालाही अटक झालेली नाही. सर्वच पैलूंवर विचार करून तपास केला जात आहे, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

**नसरापूर अत्याचार प्रकरण**

### ॲड. अजय मिसार विशेष सरकारी वकील

◆ **पुणे, १० मे**

नसरापूर अत्याचार प्रकरणात सरकारने विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ अजय मिसार यांची नियुक्ती केली आहे. या प्रकरणाची सुनावणी प्रभावीपणे व जलदगतीने पार पाडण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे १ मे रोजी साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला होता. या घटनेनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे. आरोपीला १२ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणात १५ दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याची तयारी पुणे ग्रामीण पोलिसांनी सुरू केली आहे. (तभा वृत्तसेवा)

# चिन्मय कृष्ण दास यांचा जामीन फेटाळला

◆ **ढाका, १० मे**

बांगलादेशच्या उच्च न्यायालयाने रविवारी हिंदू साधू ब्रह्मचारी चिन्मय कृष्ण दास यांचा जामीन अर्जम फेटाळला. २०२४ मध्ये एका वकिलाच्या हत्येप्रकरणी त्यांच्यावर कनिष्ठ न्यायालयात खटला सुरू आहे. बांगलादेश संमिलित सनातनी जागरण जोतेचे प्रवक्ते दास यांना २५ नोव्हेंबर २०२४ रोजी ढाक्याच्या हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून कथित देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. आग्नेय किनारपट्टीवर बंदर शहर असलेल्या चट्टोग्राम येथील न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ढाका आणि इतर ठिकाणी त्यांच्या समर्थकांनी निदर्शने केली. चट्टोग्राममध्ये आंदोलनाला हिंसक वळण लागले. तिथे कनिष्ठ सरकारी वकील असलेले ॲड. सैफूल इस्लाम अलिफ यांची हत्या करण्यात आली. (वृत्तसंस्था)



पंधरा वर्षांची तृणमूलची राजवट संपुष्टात आल्यानंतर पश्चिम बंगालमधील जनतेचा आनंदोत्सव सुरूच आहे. बिरभूम जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांनी रविवारी मिरवणूक काढत गुलालाची उधळण केली

### एअर इंडियाचे हजार कर्मचारी बडतर्फ

◆ **नवी दिल्ली, १० मे**

नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपात एअर इंडियाने १,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले आहे. एअर इंडियाचे सीईओ कॅम्पबेल विल्सन यांनी एका टाऊन हॉल बैठकीदरम्यान ही माहिती दिली आहे.

विल्सन म्हणाले, कर्मचाऱ्यांनी नैतिक नियमांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्यावर तीन वर्षांत कंपनीने हजार कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले. इतर कोणी पाहत नसतानाही कर्मचाऱ्यांनी योग्य रीतीने वागले पाहिजे. वाढत्या तोट्यामुळे कंपनीने खर्चात कपात करण्याचा पर्याय निवडला. रजा प्रवास धोरणाच्या वापरात चार हजारहून अधिक कर्मचाऱ्यांशी संबंधित अनियमितता आढळून आली होती. (वृत्तसंस्था)

# विद्यार्थी परिषदेत दृष्टी मिळाली आणि संघात ती विकसित झाली

### दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, १० मे**

यशवंतराव केळकर यांच्यासोबत काम करतांना मला जीवनाची दृष्टी मिळाली आणि रा. स्व. संघात आल्यानंतर ती विकसित झाली, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

अभाविपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष संघटनशिल्पी यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राजधानी दिल्लीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नागरी केंद्रात आयोजित 'प्रिय केळकर जी ' या विशेष अभिवाचन कार्यक्रमात होसबळे बोलत होते. यावेळी अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रघुराज किशोर तिवारी, माजी अध्यक्ष राजकुमार भाटिया, अ.भा. विद्यार्थिनी प्रमुख श्रीमती मनू शर्मा कटारिया, अभाविपचे दिल्ली प्रदेश अध्यक्ष डॉ. तपनबिहारी आणि प्रदेश मंत्री सार्थक शर्मा उपस्थित होते.



केळकर यांनी संघटन निर्माणाचे जे सूत्र दिले, त्यावर अभाविपचा सशक्त असा पाया उभा आहे, याकडे लक्ष वेधत होसबळे म्हणाले की, त्यांनी अभाविपला फक्त आंदोलनापुरतेच मर्यादित न ठेवता रचनात्मक दिशा दिली तसेच राष्ट्रनिर्माणाच्या कामालाही लावले. सामूहिक काम, वेळेचे पालन, साधेपणा, संसाधनाचा सदुपयोग आणि आत्मीय कार्यपध्दती यातून त्यांनी संघटन जीवनाचा आदर्श घालून दिला, असे गौरवोद्गार होसबळे यांनी काढले. आपल्या आदर्श आचरणातून केळकर यांनी कार्यकर्त्यासमोर प्रेरणांचा अखंड स्त्रोत उभा केला, असे ते म्हणाले. अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रघुराज किशोर तिवारी, माजी अध्यक्ष राजकुमार भाटिया यांनीही यावेळी समयोचित मार्गदर्शन केले.

पुण्यातून आलेल्या मिलिंद भडगे आणि चमूने यशवंतराव केळकर यांच्या जीवनकार्याचा परिचय करुन देणारा 'प्रिय केळकर जी' हा अभिवाचनाचा विशेष सादर कार्यक्रम सादर केला. केळकर यांचे जीवन, विचार आणि कार्यपध्दतीला भडगे यांच्या चमूने दृकश्राव्य पध्दतीने अतिशय प्रभावीपणे सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे सहसरकार्यवाह डॉ. कृष्णगोपालजी, अ.भा. प्रचारप्रमुख सुनील आंबेकर तसेच अभाविपचे अनेक जुने कार्यकर्ते तसेच परिवारातील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

**'देऊळबंद'!**

# अष्टविनायक यात्रापूर्ती आता जूनमध्येच

**वास्तूंचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीच्या कामांमुळे निर्णय**

◆ **पुणे, १० मे**

अष्टविनायकातील गणरायाची श्री मयुरेश्वर, श्री चिंतामणी आणि श्री सिद्धिविनायक ही तीन मंदिरे ९ जून २०२६ पर्यंत भाविकांच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. सध्या सुट्यांचे दिवस असून, भाविक सहकुटूंब अष्टविनायकाच्या यात्रेला जातात. पण, दुरुस्ती कामांसाठी मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय झाल्यामुळे भाविकांची यात्रापूर्ती आता ९ जूननंतरच होऊ शकणार असल्याचे पुरातत्त्व विभागाने सांगितले आहे.

अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत तसेच, पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या जतन, संवर्धन व दुरुस्ती कामांच्या पृष्ठभूमीवर अष्टविनायकातील मंदिरांमधील कामांसाठी महाराष्ट्र शासनाने विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या तिन्ही मंदीरांतील मुख्य गाभारा तसेच मंदिर परिसरातील वास्तूंचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

पुरातत्त्व विभागाच्या नियोजनानुसार मंदिरांचा मुख्य गाभारा आणि सभामंडप यांचे पौराणिक स्वरूप जपत सुबक दगडी बांधकामाद्वारे संवर्धन करण्यात येणार आहे. या कामादरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती अडथळा निर्माण करू शकते. तसेच, कामाचा कालावधी वाढण्याची शक्यता असल्याने मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासंदर्भात पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी सह धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडे विनंती अर्ज सादर केला होता. त्यानंतर पुरातत्त्व विभाग, मंदिर प्रशासन, पुजारी वर्ग आणि ग्रामस्थ यांचे म्हणणे ऐकून घेत सह धर्मादाय आयुक्तांनी मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ही विकासकामे मंदिरांची दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक असून ती नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी नागरिकांनी आणि भाविकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. (तभा वृत्तसेवा)



### चिंचवड देवस्थान ट्रस्टचा देखील ठराव

**सह धर्मादाय आयुक्तांच्या सूचनेनुसार चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त मंडळानेही मोरगाव, थेऊर आणि सिद्धटेक येथील मंदिरे भाविकांसाठी बंद ठेवण्याचा ठराव मंजूर केला आहे. या कालावधीत मंदिरांमध्ये नित्य पूजाअर्चा व धार्मिक विधी नियमितपणे सुरू राहतील. मात्र, भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश किंवा प्रत्यक्ष दर्शनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही. मंदिरांचे पुजारी, बांधकाम यंत्रणा, संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि विश्वस्त यांच्याशिवाय अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दोन बांगलादेशींचा त्रिपुरा सीमेवर खात्मा

**आगरतळा :** त्रिपुरातील सिपाहीजला जिल्ह्यात भारत-बांगलादेशसीमेवर शुक्रवारी रात्री सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफच्या जवानांनी आत्मरक्षणासाठी गोळीबार करीत दोन बांगलादेशींचा खातमा केला. ही घटना कमलासागर सीमा चौकीजवळ घडली. हा परिसर तस्करीसाठी कुख्यात आले. यात सीमाभागातील दोन्ही बाजूच्या ग्रामीण नागरिकांचा सहभाग असतो. शुक्रवारी रात्री अंधाराचा फायदा घेत १० ते १५ जणांचा गट सीमेवरील कुंपण ओलांडून भारतीय साथीदारांना तस्करीचे साहित्य सोपवत होता. त्यावेळी बीएसएफच्या गस्त घालणाऱ्या पथकाची त्यांच्यावर नजर गेली. जवानांनी आव्हान देत त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. तस्करांनी त्यांच्यावर दगडफेक सुरू केली. प्रत्युत्तरादाखल बीएसएफच्या जवानांनी केलेल्या गोळीबारात दोन जण जखमी झाले. नबीन हुसैन आणि मोहम्मद मुरसलीन अशी त्यांची नावे होती. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. जखमी अवस्थेत बांगलादेशी असल्याची आणि तस्करीत सहभागी असल्याची त्यांनी कबुली दिली. शवविच्छेदनानंतर त्यांचे मृतदेह बॉर्डर गार्ड बांगलादेशला सोपवण्यात आले.

# हिंदुत्वाच्या स्पष्टतेतूनच राष्ट्रीय एकतेची निर्मिती

### सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन

**पुणे, १० मे**
हिंदुत्वामध्ये विश्वकल्याणाची भावना आहे. त्यामुळे हिंदुत्वाच्या विचारात स्पष्टता आली, तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता निर्माण होईल आणि त्यातूनच राष्ट्राची पुढील दिशा स्पष्ट होईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

कर्वेनगर येथील कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयातील के. बी. जोशी सभागृहामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या छत्रपती संभाजी भागाच्या वतीने आयोजित 'संघ शताब्दी मंथन' कार्यक्रमात ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डेक्कन अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. भूषण पटवर्धन, रा. स्व. संघाचे अखिल भारतीय संपर्क विभागाचे कार्यालय प्रमुख प्रणव पवार आणि छत्रपती संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास उपस्थित होते.



कार्यक्रमात बोलताना मुख्य वक्ते सुनील आंबेकर. सोबत अनिल व्यास, डॉ. भूषण पटवर्धन, प्रणव पवार

सुनील आंबेकर म्हणाले की, जोपर्यंत कुठल्याही राष्ट्राला आपल्या स्व ची ओळख होत नाही तोपर्यंत त्या राष्ट्राची एकता दिसून येत नाही. ज्या गोष्टी आपल्या देशाच्या एकतेला, अखंडतेला, हिंदू धर्म आणि संस्कृतीला मजबूत करतात, त्या सगळ्या प्रतीकांना मजबूत करण्याचे काम संघाने केले आहे. राममंदिर हे फक्त मंदिर नसून ते राष्ट्रमंदिर असल्याने संघाने सुरुवातीपासूनच मंदिर उभारणीसाठी पुढाकार घेतला. हिंदू समाजासोबत सातत्याने तीस-चाळीस वर्षे मंदिर उभारणीचा लढा दिला. समाजाच्या या प्रयत्नाला अखेर यश आल्यानंतर संघाच्या भूमिकेची स्पष्टता अनेकांना झाली असे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी डॉ. भूषण पटवर्धन यांनी शिक्षण पद्धतीवर भाष्य करताना भारतीय ज्ञानावर विश्वास निर्माण करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, सध्या शिक्षणात पाश्चात्त्य जीवनशैलीचा प्रभाव वाढला असून, आहार, विहार आणि विचारांतून भारतीयत्व हरवत चालले आहे. भारतीय ज्ञान आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध करून जगासमोर मांडण्याची गरज आहे. (तभा वृत्तसेवा)

#### समाजाची विपरीत परिस्थितीत संघाला साथ

संघ स्वयंसेवकांची साधना ओळखून समाजाने विपरीत परिस्थितीत संघाला साथ दिली. आता व्यक्ती निर्माणाचे कार्य प्रत्येक कुटुंबात पोहोचणे आवश्यक आहे. केवळ संघाच्या भरवशावर समाजपरिवर्तन शक्य नाही, त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. समाजाचे अवलंबित्व कमी करून स्वावलंबी व्यवस्था निर्माण करणे हेच संघाचे ध्येय आहे. मुस्लिम प्रश्न हा संघाच्या स्थापनेपूर्वीपासून असून, संघ तो सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही सुनील आंबेकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# परजीवी काँग्रेस विश्वासघातकी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात

**बंगळुरू, १० मे**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. कर्नाटकातील अंतर्गत सत्तासंघर्षामुळे सुशासन देण्यात काँग्रेसला अपयश आले असून, या पक्षाने जनतेचा विश्वासघात केला, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेस आज परजीवी पक्ष बनला असल्याचा घणाघात त्यांनी केला.

देशभरात भाजपाचा राजकीय प्रभाव विस्तारत असताना बंगळुरू येथेही 'भगवा सूर्य' उगवत आहे, असे त्यांनी पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडुचेरी येथे पक्षाला मिळालेल्या विजयाचा संदर्भ देताना सांगितले. मागील तीन वर्षांत कर्नाटकात लोकांच्या समस्या सोडवण्याऐवजी, सरकारचा बहुतांश वेळ अंतर्गत संघर्ष मिटवण्यातच खर्ची पडला. काँग्रेस सरकार नेतृत्वाबाबत आणि सत्तेच्या वाटपाबाबतच्या व्यवस्थेवरून निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या विळख्यातच गुरफटलेले राहिले, नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांच्या एका विशाल मेळाव्याला संबोधित करताना म्हणाले.

मुख्यमंत्री किती काळ पदावर राहतील, हेच त्यांना ठरवता येत नाही, असे मोदी यांनी मागील सहा महिन्यांपासून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि त्यांचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात सुरू असलेल्या सत्तासंघर्षाचा संदर्भ देताना सांगितले. दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला संधी मिळेल की नाही, हे ते ठरवू शकत नाहीत. सर्व काही अधांतरी ठेवण्यात आले आहे, असे मोदी म्हणाले.

काँग्रेसकडे प्रशासनाचा अजेंडाच नसल्याने या पक्षाला काही महिन्यांतच हमखास सत्ताविरोधी लाटेचा सामना करावा लागतो. याचे कारण म्हणजे काँग्रेसला केवळ लोकांचा विश्वासघात कसा करायचा याची माहिती आहे. ते स्वतःच खोटे आहेत आणि त्यांची आश्वासनेही खोटी आहेत. काँग्रेसच्या सत्तेच्या पुस्तकात प्रशासनावर कोणतेही प्रकरण नाही, असा आरोप त्यांनी केला. (वृत्तसंस्था)



#### निर्णायक राजकीय बदलाचे संकेत

पुडचेरी आणि आसाममध्ये सत्ता कायम ठेवणे आणि पश्चिम बंगालमध्ये पहिले सरकार स्थापन करणे तसेच गुजरातच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाने मिळवलेला दणदणीत विजय हा निर्णायक राजकीय बदलाचे संकेत देतात, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# देशभरात ५ लाख २० हजार नागरिकांचा थांगपत्ताच नाही

### एनसीआरबीच्या अहवालातून २०२४ ची आकडेवारी समोर

**पुणे, १० मे**
सरकारच्या वतीने सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना केल्या जात असतानाही देशात बेपत्ता होणाऱ्या व्यक्ती आणि मुलांच्या घटनांमध्ये २०२४ या वर्षात वाढ झाल्याचे समोर आले आहे. या एका वर्षात पाच लाख २० हजार नागरिक बेपत्ता झाले असून लहान मुलांसह तरुणांचा बेपत्ता होण्याचा दर ७.८ टक्क्यांनी वाढल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

पोलिस आणि तपास यंत्रणांनी २०२४ मध्ये ५ लाख ३ हजार ६०२ व्यक्तींना शोधून काढण्यात यश मिळवले. यात १ लाख ६५ हजार ४६५ पुरुष, ३ लाख ३८ हजार ११६ महिला आणि २१ ट्रान्सजेंडर्सचा समावेश आहे. मात्र, बेपत्ता होणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक असल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

**बेपत्ता मुलांच्या संख्येत ६.८ टक्क्यांनी वाढ**

बेपत्ता मुलांच्या घटनेतही वाढ झाली आहे. २०२४ मध्ये एकूण ९८ हजार ३७५ मुले बेपत्ता झाल्याची नोंद झाली. यामध्ये २२ हजार ७६८ लहान मुले, ७५ हजार ६०३ मुली आणि ४ ट्रान्सजेंडर बालकांचा समावेश आहे. २०२३ मध्ये ९१ हजार २९६ मुले बेपत्ता झाली होती. त्यात २०२४ मध्ये ७.८ टक्क्यांची वाढ झाली. विशेष म्हणजे, मुलांच्या तुलनेत मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याने महिला व बाल सुरक्षा हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. (तभा वृत्तसेवा)



| २०२४ मधील बेपत्ता व्यक्ती | २०२३ च्या तुलनेत वाढ : ७.३% शोधलेल्या व्यक्ती |
|---|---|
| एकूण बेपत्ता : ५,२०,१६४ | एकूण शोधल्या : ५,०३,६०२ |
| पुरुष : १,६७,४१४ | पुरुष : १,६५,४६५ |
| महिला : ३,५२,७२९ | महिला : ३,३८,११६ |
| ट्रान्सजेंडर : २१ | ट्रान्सजेंडर : २१ |

#### सापडलेल्या मुलांची संख्या ३ हजार ७३७

**२०२४ मध्ये राज्यात ७९ हजार ३६८ जण बेपत्ता झाले. तर मागील वर्षांतील बेपत्ता असून अद्याप शोध न लागलेली ५१ हजार १६९ जण आहे. त्यामुळे एकूण १ लाख ३० हजार ५३७ जण बेपत्ता आहेत. तर १८ वर्षांखालील मुलांचा विचार केला तर मागील वर्षभरात ३ हजार ४९५ मुले बेपत्ता आहेत. तर मागील वर्षांतील बेपत्ता असून अद्याप शोध न लागलेली २ हजार ४५ जण आहेत. त्यांचा शोध लागला नाही. २०२४ मध्ये एकूण शोधण्यात आलेली तसेच सापडलेली मुलांची संख्या ३ हजार ७३७ आहे. त्याचे प्रमाण ६७.५ टक्के आहे.**

# चार मुलांचा तलावात बुडून मृत्यू

### खोल चिखलात पाय अडकल्याने झाला घात

**अमरावती, १० मे**
शहरालगतच्या मार्डी रोडवरील डॉ. राजेंद्र गोडे महाविद्यालय परिसरामागील तलावात बुडून चार अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये भाऊ-बहिणीचाही समावेश आहे. हे चौघेही महाजनपुरा भागातील रहिवासी आहेत. ही सर्व मुले १२ ते १६ वयोगटातील आहेत.

काही मुले व मुली रविवारी दुपारी तलाव परिसरात सहल आणि जेवणासाठी गेले होते. दुपारी जेवण झाल्यानंतर सोनाली नरेंद्र जोशी फोटो काढण्यासाठी तलावात उतरली. ती पाण्यात बुडू लागल्याचे दिसताच तिचा भाऊ आदित्य जोशी मदतीसाठी तलावात उतरला. तोही बुडत असल्याचे दिसताच पायल बबलू पंडित आणि यश गजानन काकणे या दोघांनी त्यांना वाचविण्यासाठी तलावात उडी घेतली. त्यांना बाहेर येता आले नाही. तलावातील खोल चिखलात चौघेही अडकले आणि पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरड करून नागरिकांना माहिती दिली. त्यानंतर घटनेची माहिती फ्रेजरपुरा पोलिसांना देण्यात आली.

माहिती मिळताच पोलिस निरीक्षक रोशन शिरसाठ यांच्या नेतृत्वात पथक घटनास्थळी दाखल झाले. जिल्हा आपत्ती निवारण व बचाव पथकालाही पाचारण करण्यात आले. बचाव पथकाने अथक प्रयत्नानंतर तलावातून चौघांना बाहेर काढले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

मृतदेह शवविच्छेदनासाठी इर्विन रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे महाजनपुरा परिसरासह शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. (तभा वृत्तसेवा)

# झारखंडमध्ये दोन माओवाद्यांना अटक

**खुंटी, १० मे**
झारखंडमधील खुंटी जिल्ह्यात सीपीआयचा (एम) फुटीरतावादी गट पीपल्स लिबरेशन फ्रन्ट ऑफ इंडियाच्या दोन सदस्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. जिलिंगा जिल्ह्यात शनिवारी केलेल्या छापेमारीत या दोघांना अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. एखादी मोठी घटना घडवून आणण्यासाठी, आपल्या संघटनेचा विस्तार करण्यासाठी आणि परिसरात खंडणी गोळा करण्यासाठी पीएलएफआयचे सदस्य जिलिंगा जंगलात जमले असल्याची गुप्त माहिती खुंटीच्या पोलिस अधीक्षकांना मिळाली होती.

माहितीच्या आधारे एक पथक स्थापन करण्यात आले आणि त्या दोघांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे. त्यांच्या ताब्यातून दोन कट्टे, दोन काडतुसे जप्त करण्यात आली. (वृत्तसंस्था)

## बाबा सिद्दिकी यांचा अंगरक्षक बडतर्फ

**मुंबई :** कर्तव्यात कसूर केल्याच्या आरोपाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दिकी यांचा अंगरक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या एका पोलिस शिपायाला पोलिस प्रशासनाने बडतर्फ केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ च्या रात्री मुंबईतील वांद्रे भागात, त्यांचा मुलगा झीशानच्या कार्यालयाबाहेर तीन जणांनी गोळ्या घालून हत्या केली. मुंबई पोलिसांच्या संरक्षण आणि सुरक्षा शाखेत कार्यरत असलेले कॉन्स्टेबल श्याम सोनवणे यांची सिद्दिकी यांचे अंगरक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सोनवणे यांनी निष्काळजीपणा आणि बेजबाबदार वर्तन केल्याचे एका चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

## भावगीत गायक गोविंदराव पोवळे यांचे निधन

**मुंबई, १० मे**
अवीट चालीच्या गाण्यांनी घरोघरी लोकप्रिय झालेले ज्येष्ठ गायक, संगीतकार गोविंदराव पोवळे यांचे शनिवारी रात्री मुंबई येथे निधन झाले. ते ९४ वर्षांचे होते. वयाच्या पंधराव्या वर्षी आकाशवाणीवर सगळ्यात लहान वयाचा



गायक म्हणून संगीत क्षेत्रात प्रवेश केलेल्या पोवळे यांनी जवळपास चार दशकांहून अधिक काळ सुगम संगीत क्षेत्रात अतुलनीय कार्य केले. पनवेलजवळील चिरनेर गावात गोविंदराव पोवळे यांचा जन्म झाला होता.

त्यांचे वडील त्रिंबक पोवळे हे कीर्तनकार होते आणि आई पार्वतीबाई यांनाही गाण्याची आवड असल्याने गाण्याचा वारसा त्यांना आपसूकच मिळाला होता. 'माती सांगे कुंभाराला पायी मज तुडविसी तुझाच आहे शेवट वेड्या माझ्या पायाशी' हे मधुकर जोशी यांनी लिहिलेले आणि पोवळे यांनी गायलेले, संगीतबध्द केलेले गाणे तसेच, त्यांनी गायलेली 'रात्र काळी घागर काळी', 'गंगा आली रे अंगणी' आदी गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. (वृत्तसंस्था)

# चाकणकरांची एसआयटीकडून चौकशी

**नाशिक, १० मे**
भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे वादात अडकलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांची रविवारी नाशिक येथे विशेष तपास पथकाने (एसआयटी)चौकशी केली. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे.



एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी चाकणकर यांची सहा तास चौकशी केली. रविवारी सकाळी चाकणकर आपल्या वकिलासोबत पुणे येथून नाशिकला पोहोचल्या आणि एसआयटी कार्यालयात पोहोचल्या. यावेळी त्यांचे वडीलही सोबत होते. दुपारी १ वाजताच्या सुमारास त्यांनी एसआयटी कार्यालयात प्रवेश केला आणि पाच तासाच्या चौकशीनंतर पुण्याकडे रवाना झाल्या. राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी पदाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. याशिवाय त्या खरातच्या शिवानिका संस्थाच्या विश्वस्तपदी होत्या. त्यामुळे आर्थिक व्यवहारांबाबतही चाकणकर यांची चौकशी करण्यात आली. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे.

**तपासात सहकार्य करणार**

चौकशीला हजर होण्यापूर्वी प्रसार माध्यमांशी बोलताना चाकणकर म्हणाल्या, एसआयटीला काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. ती देण्यासाठी मी आली आहे. तपासात माझे पूर्णपणे सहकार्य राहील. तपास यंत्रणेला जी काही मदत लागेल ती निश्चितपणे केली जाईल.

**चार मंत्र्यांची हकालपट्टी करा : पटोले**

खरात प्रकरणात राज्याच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश असून, त्यांची हकालपट्टी करावी असे पत्र मुख्यमंत्र्यांना पाठवणार असल्याचे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. खरातकडून सगळी माहिती गोळा करून त्याचा एन्काऊंटर केला जाईल असा दावा त्यांनी केला. त्यांनी आरोप केलेल्या मंत्र्यांची माहिती जाहीर केली नाही. (वृत्तसंस्था)

## झालमुडी आणि बंगालची निवडणूक

**काही** राज्यातील विधानसभा निवडणुका खाद्यपदार्थांनी गाजतात. हरयाणात काही वर्षांपूर्वी झालेली विधानसभा निवडणूक जिलेबीमुळे गाजली होती. जिलेबी हाच तेव्हा राज्यात चर्चेचा विषय झाला होता. त्यामुळे त्या राज्यात भाजपाला विजय मिळाल्यानंतर लाडूंसोबत जिलेबीचेही मुक्तहस्ताने वाटप करण्यात आले होते. जिलेबी हा जणू हरयाणाचा मुळ आणि लोकप्रिय पदार्थ असल्याचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळची पश्चिम बंगालची निवडणूक झालमुडीने गाजली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगालमधील प्रचारदौऱ्यात एका झालमुडीच्या दुकानाला भेट देत दहा रुपयांची झालमुडी काय घेतली, पश्चिम बंगालची निवडणूकच फिरुन गेली. झालमुडी राज्यातच नाही तर देशपातळीवरही चर्चेचा विषय झाली. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये भाजपाला दणदणीत विजय मिळाल्यानंतर झालमुडीचे वाटप होणे अपेक्षित होते. झालेही तसेच. बंगालमध्ये भाजपाने दुहेरी शतक झळकवल्यानंतर लाडू देऊन नाही तर झालमुडी देऊन लोकांचे तोंड गोड करण्यात आले.

राजधानी दिल्लीतील भाजपा मुख्यालयातील जल्लोषातही झालमुडी अग्रस्थानी होती, लोकांना आग्रह करुनकरुन झालमुडी दिली जात होती. शुभेंदु अधिकारी यांनी राजधानी कोलकात्यातील ब्रिगेड परेड मैदानात मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर भाजपातर्फे झालमुडीचे वितरण करण्यात आले. केंद्रीय मंत्रिमंडळातील निर्णयाची माहिती देण्यासाठी दर आठवड्यात राष्ट्रीय माध्यम केंद्रात पत्रपरिषद आयोजित केली जाते, यावेळच्या अशाच एका पत्रपरिषदेत बंगाली मिठाई संदेश आणि झालमुडी देण्यात आली. यावेळच्या विधानसभा निवडणुकीने आणि त्यातही पंतप्रधान मोदी यांच्या एका निर्णयाने झालमुडी हा राष्ट्रीय पदार्थ झाला आहे. दहा रुपयांच्या झालमुडीने मोदी यांनी पश्चिम बंगाल विधानसभेची निवडणूक जिंकली, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे यानंतर होणाऱ्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत त्या राज्यातील कोणता खाद्यपदार्थ चर्चेत येणार याचा अंदाज घेतला जात आहे.

●● ●●

## वेणुगोपाल दिल्ली सोडणार का?

**केरळमध्ये** काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीला (युडीएफ) बहुमत मिळाले आणि त्याचा आनंद होण्याऐवजी काँग्रेसची डोकेदुखी वाढली. कारण राज्यात कोणाला मुख्यमंत्री करावे, याचा निर्णय त्या पक्षाला आतापर्यंत करता आला नाही. त्यामुळे कुठून राज्यात आपली सत्ता आली, नसती आली तर बरे झाले असते, असे काँग्रसच्या नेत्यांना वाटू लागले आहे. मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसमधील तीन प्रमुख नेते उत्सुक आहेत. यात राहुल गांधी यांचे अतिशय विश्वासू के. सी.




वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला आणि व्ही. डी. सतीशन प्रमुख आहे. केरळच्या राजधानीत काँग्रेस पक्षाला याचा निर्णय करता न आल्यामुळे हा निर्णय आता देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत घेतला जाणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दरबारात हा वाद आला आहे. याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला आहे.राहुल गांधी यांचे अतिशय विश्वासू ही प्रतिमाच आता वेणुगोपाल यांच्यासाठी अडचणीची ठरत आहे. कारण वेणुगोपाल यांना मुख्यमंत्री केले तर राहुल गांधी यांना आपला एका विश्वासू सहकारी गमवावा लागणार आहे. आणि राहुल गांधींनी सोडले नाही तर वेणुगोपाल यांना हातातोंडाशी आलेल्या मुख्यमंत्रिपदावर पाणी सोडावे लागणार आहे. मात्र काँग्रेसमधील राष्ट्रीय पातळवरील ज्येष्ठ नेत्यांची वेणुगोपाल यांनीच केरळची मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा आहे. याचा अर्थ या सर्व नेत्यांना वेणुगोपाल यांच्याबद्दल खूप प्रेम आणि आपुलकी आहे, असे नाही. तर केरळचे मुख्यमंत्री झाल्यामुळे तरी ते काँग्रेस पक्षातील संघटनात्मक राजकारणापासून दूर जातील, राहुल गांधी त्यांच्या प्रभावातून मुक्त होतील, असे या नेत्यांना वाटते आहे. आज राहुल गांधींना कोणी भेटावे, यापासून काँग्रेस पक्षातील सर्व प्रमुख आणि धोरणात्मक निर्णय वेणुगोपाल घेत असतात. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नेत्यांना राहुल गांधी भेटणे शक्य होत नाही. त्यामुळे वेणुगोपाल यांना केरळमध्ये पाठवून राहुल गांधी यांना त्यांच्या प्रभावातून सोडवत आपल्याला त्यांना भेटणे शक्य होईल, असे मनातील मांडे हे नेते खात आहे. त्यामुळे आपली अडचण करत राहुल गांधी वेणुगोपाल यांना केरळमध्ये पाठवतील की, त्यांना दिल्लीत ठेवत वेणुगोपाल यांच्यासोबत बाकीच्या नेत्यांचीही अडचण करतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

●● ●●

## पवन खेडा यांना मिळाला अटकपूर्व जामीन

काँग्रेसच्या माध्यम विभागाचे प्रमुख पवन खेडा यांना सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. जामीन मंजूर होईस्तोवर पवन खेडा बेपत्ता झाले होते, कारण आसाम पोलिस त्यांच्या मागावर होते. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या पत्नीवर निराधार, खोडसाळ आणि धाधांत खोटे आरोप करत खेडा यांनी 'आ बैल मुझे मार ' करुन घेतले. आपल्या हाताने आपल्या पायावर दगड कसा पाडून घ्यावा, हे सर्वांनी खेरा यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. याआधी पण एकदा त्यांना पोलिसांनी विमानातून उतरवून ताब्यात घेतले होते. यावेळी पोलिस आपल्याला कधीही उचलतील या भीतीने ते काँग्रेस मुख्यालयातही दिसत नव्हते. पाच राज्यातील विधानसभा निवडणूक निकालाच्या आधी पवन खेरा यांना सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आणि खेरा यांच्या जिवात जीव आला. जामीन मंजूर होत नव्हता तोवर मान खाली घालून फिरणारे खेडा जामीन मिळाल्यावर ताठ मानेने पहिल्यांदा काँग्रेस मुख्यालयात आले. तेव्हा तेथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश काँग्रेस प्रवक्त्यांना निकालाच्या दिवशी वृत्तवाहिन्यांवर पक्षाची भूमिका कशी मांडायची याचे धडे देत होते. त्या बैठकीत पवन खेडा यांचे आगमन होताच उपस्थित सर्व नेत्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी पवन खेडा यांना अटकपूर्व जामीन मिळवून देण्यात मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि ख्यातनाम विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांचेही अभिनंदन करण्यात आले.

● दिल्लीवाला

# भारत-त्रिनिदाद-टोबॅगो यांच्यात आठ करार

**पोर्ट ऑफ स्पेन, १० मे**
परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्या कॅरेबियन देशाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान भारत,त्रिनिदाद आणि टोबॅगो यांनी पर्यटन, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा आणि आयुर्वेद यासारख्या क्षेत्रांमध्ये आठ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

८-९ मे रोजी कॅरेबियन देशाला भेट दिलेल्या जयशंकर यांनी द्विपक्षीय सहकार्य विस्तारण्याबाबत पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर आणि इतर वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली तसेच मागील वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्रिनिदाद आणि टोबॅगो दौऱ्यादरम्यान करण्यात आलेल्या घोषणांच्या अंमलबजावणीतील प्रगतीचा आढावा घेतला, असे परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. पर्यटन, टी अ‍ॅण्ड टी च्या परराष्ट्र आणि कॅरीकॉम व्यवहार मंत्रालयाच्या इमारतीचे सौरऊर्जेवर आधारित रूपांतर, रोगवाहक नियंत्रण, सुरुवातीच्या काळात भारतीय स्थलांतरित ज्या ठिकाणी वास्तव्यास होते, त्या नेल्सन बेटाच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि युनिव्हर्सिटी ऑफ द वेस्ट इंडीज येथे आयुर्वेदासाठी भारतीय अध्यासनाची स्थापना या क्षेत्रांमध्ये दोन्ही बाजूंमध्ये एकूण आठ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या, असे निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# शिवानंद भिमणवरु यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे -**
मजरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवानंद भिमणवरू हे ३१ मे २०२६ला सेवानिवृत्त होत असल्याने कुमठे केंद्राच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला.

शाळेत जवळजवळ पन्नास लाखापर्यंतचे शैक्षणिक उठावाअंतर्गत भौतिक सुविधा त्यांच्या काळात झालेले आहे. त्यामध्ये १ते ७ वर्गास स्मार्ट टिव्ही , शाळेच्या नावाचा बोर्ड , सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कट्टा , स्वतंत्र बालवाडी वर्गखोली , शाळेला संरक्षक कुंपण प्रत्येक वर्गात बोलक्या भिंती अश्या अनेक सुविधा झालेल्या आहेत याशिवाय शाळेने अनेक स्पर्धोमध्ये सहभाग घेऊन नावलौकिक मिळविला आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धे मध्ये तालुक्यात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षेमध्ये सुद्धा शाळेने त्यांच्या काळात यश संपादन केले. यावेळी तालुका विस्ताराधिकारी बापूसाहेब जमादार, केंद्रप्रमुख सिद्राम वाघमोडे, अंकुश काळे, विरभद्र यादवाड, म.ज. मोरे, भैरप्पा कुरे शशीकांत खुडे तसेच केंद्रातील बहुसंख्य शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## काशीनाथ गामाजी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अरळी, दि. १० मे-**
अक्कलकोट तालुक्यातील अरळी (द) येथील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक काशिनाथ हणमंतप्पा गामाजी (वय-९२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोमवार दि. ११ मे रोजी सकाळी ११.00 वाजता अरळी (द) येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# पाकिस्तान स्फोटाने हादरला

**२५ जण ठार**

- दहशतवादी हल्ल्याचा संशय
- हल्लेखोराने पोलिस चौकीत घुसवले वाहन



◆ **इस्लामाबाद, १० मे**

पाकिस्तानातील खैबर पख्तुनख्वाच्या बन्नू जिल्ह्यात एका आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेले वाहन पोलिस चौकीत घुसवले. यात २५ पोलिस कर्मचारी ठार झाले असून, ३२ जखमी आहे. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, पूर्णपणे पोलिस चौकी उद्ध्वस्त झाली आणि जवळच्या घरांचेही नुकसान झाले आहे.

आत्मघाती हल्ल्यानंतर या भागात सुरक्षा वाढविण्यात आली. शनिवारी मध्यरात्रीनंतर झालेला स्फोट दहशतवादी हल्ला असल्याची पुष्टी एका पोलिस अधिकाऱ्याने केली. अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी घेतलेली नाही. एका आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेले वाहन फतेह खेल पोलिस चौकीत घुसवले. या शक्तिशाली स्फोटात २५ पोलिसांचा जागीत मृत्यू झाला, तर ३२ जण जखमी असल्याची माहिती बन्नूचे पोलिस महानिरीक्षक सज्जाद खान यांनी प्रसार माध्यमांना दिली. या स्फोटामुळे मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आणि अनेक अधिकारी ढिगाऱ्याखाली गाडले गेले. बचाव पथकांनी रात्रभर चाललेल्या बचावकार्यानंतर मृत आणि जखमींना ढिगाऱ्याखालून हेर काढले. जखमींना तत्काळ जिल्हा मुख्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

(वृत्तसंस्था)

### निवासी इमारतींचे नुकसान

स्फोट इतका शक्तिशाली होता की त्याचा आवाज जिल्ह्याच्या दुर्गम भागातही ऐकू आला. पोलिस चौकीला लागून असलेल्या निवासी इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. स्फोटामुळे अनेक घरांची छपरे कोसळली. खैबर पख्तुनख्वाचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

### बीएलएफचे बलुचिस्तानात हल्ले, १० सैनिक ठार



बलुचिस्तान लिबरेशन फ्रंटने (बीएलएफ) बलुचिस्तानच्या विविध दहा भागांत पाकिस्तानी सुरक्षा दलांवर हल्ले चढविले. यात १० सैनिकांचा मृत्यू झाला. बीएलएफचे प्रवक्ते मेजर ग्वाहरम बलोच यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, त्यांनी खारान, वाशुक, अवाराण, केच आणि मस्तंग येथे पाकिस्तानी सुरक्षा दलावर हल्ले केले. लष्करी छावण्या, ताफे आणि एका रस्ते बांधकाम कंपनीच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले. खारान शहरातील एका तपासणी नाक्यावर रॉकेट आणि ग्रेनेड लाँचरने हल्ला करण्यात आला, ज्यामुळे मोठे नुकसान झाले.

# मालीत अल-कायदाचा हैदोस

**१०५ जण ठार**

## केनिरोबा कारागृहावर सशस्त्र हल्ला



◆ **बामाको, १० मे**

मालीची राजधानी बामाकोपासून सुमारे ६० किमी अंतरावर असलेल्या केनिरोबा मध्यवर्ती कारागृह आणि जवळच्या गावांवर अल-कायदाने सशस्त्र हल्ला केला. यात ७५ तुरुंग कर्मचारी आणि ३० नागरिक ठार झाले, तर ९० पेक्षा अधिक जखमी आहे. जखमींमध्ये कैद्यांचाही समावेश आहे. हे नव्याने बांधलेले कारागृह असून त्यात अंदाजे २,५०० कैदी आहेत.

अल-कायदाशी संबंधित गट, जमात नुसरत अल-इस्लाम वल मुस्लिमीन (जेएनआयएम), ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या गटाने शनिवारी केनिरोबा मध्यवर्ती कारागृह आणि आसपासच्या गावांवर गोळीबार आणि बॉम्बहल्ले केल्याची माहिती मालीचे लष्करप्रमुख जिब्रिल मैगा यांनी दिली. त्यांनी सांगितले की, गावांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये किमान ३० लोकांचा बळी गेला.

या घटनेमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. एका स्थानिक युवा नेत्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, अल कायदाकडून सातत्याने हल्ले होत असताना सुरक्षा दलाकडून कुठलाही प्रतिकार केला जात नाही. जवळच लष्करी तुकड्या तैनात असूनही आणि मदतीसाठी वारंवार आवाहन करूनही, त्यांनी हस्तक्षेप केला नाही.

दरम्यान मालीच्या विविध भागात एप्रिल महिन्यापासून सातत्याने हल्ले होत असताना सुरक्षा दल मात्र प्रतिकार करण्यात अपयशी ठरत आहे. दहशतवादी जेएनआयएम दहशत निर्माण करून विविध भागात वर्चस्व निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. अनेक भागातून नागरिकांचे स्थलांतर सुरू असल्याचे सरकारची चिंता वाढली आहे.

(वृत्तसंस्था)

### बामाकोला वेढा घालण्याचा धोका

गेल्या आठवड्यात जेएनआयएमने राजधानी बामाकोकडे जाणाऱ्या रस्त्यांवर तपासणी नाके उभारून शहराला पूर्ण वेढा घालण्याचा आपला इरादा जाहीर केल्यावर परिस्थिती आणखी चिंताजनक बनली. लष्करप्रमुख, जिब्रिल मैगा यांनी पत्रकार परिषदेत धोका कायम असल्याचे मान्य केले. जेएनआयएमने कथितरित्या तुआरेग-प्रभुत्व असलेल्या अझावाद लिबरेशन फ्रंटसोबत हातमिळवणी केल्यानंतर या भागात हल्ले तीव्र झाले आहे. एप्रिलमधील मोठ्या हल्ल्यांमध्ये मालीचे संरक्षण मंत्री, सादियो कामारा, मारले गेले.

## चित्रपट वार्ता

### गिव्हेंचीचा गाऊन अन् राधिकाचं सौंदर्य!



**व्हेनिस** : रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांची सून राधिका मर्चंट तिच्या फॅशन सेन्समुळे नेहमीच चर्चेत असते. नुकतेच राधिकाने इटलीतील प्रतिष्ठित 'व्हेनिस बिएनाले'च्या उद्घाटन सोहळ्याला हजेरी लावली. यावेळी तिच्या 'रॉयल' लूकने सर्वांच्या नजरा खिळवून ठेवल्या. या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमासाठी राधिकाने 'गिव्हेंची' या प्रसिद्ध फॅशन ब्रँडचा 'हौट कुटूर' मिंट रंगाचा गाऊन परिधान केला होता. हा गाऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाला अधिकच उठावदार बनवत होता. अत्यंत साधे पण प्रभावी दागिने आणि मोकळ्या केसांमुळे राधिका या गाऊनमध्ये एखाद्या राजकुमारीसारखी दिसत होती. या कार्यक्रमातील राधिकाचे फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. केवळ भारतीयच नव्हे, तर जागतिक स्तरावरील फॅशन प्रेमींकडूनही तिच्या या निवडीचे कौतुक होत आहे.

### 'राव बहादूर'ची रिलीज डेट अखेर जाहीर

**मुंबई** : महेश बाबू आणि नम्रता शिरोडकर यांच्या जीएमबी एंटरटेनमेंटने ए प्लस एस मूव्हीज आणि श्रीचक्रास एंटरटेनमेंट्स सोबत मिळून दिग्दर्शक वेंकटेश महा यांच्या बहुप्रतीक्षित मानसशास्त्रीय थरारपट 'राव बहादूर'च्या जागतिक प्रदर्शनाची अधिकृत घोषणा केली आहे. महेश बाबू प्रस्तुत आणि प्रसिद्ध दिग्दर्शक वेंकटेश महा यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेला 'राव बहादूर' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात रोमांचक चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये याबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.चित्रपटाच्या झलक व्हिडिओने एका वेगळ्या, गूढ आणि आकर्षक विश्वाची ओळख करून दिली असून, पडद्यावर नेहमी दिसणाऱ्या गोष्टींपेक्षा हा अनुभव पूर्णपणे वेगळा असल्याचे जाणवते.

### एल्विश यादवला धमकी

**गुरुग्राम** : लोकप्रिय समाजमाध्यम व्यक्तिमत्त्व आणि 'बिग बॉस ओटीटी' विजेता एल्विश यादव पुन्हा एकदा गंभीर कारणामुळे चर्चेत आला आहे. त्याला आणि त्याच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देत तब्बल दहा कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणानंतर हरियाणातील गुरुग्राम येथे गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस तपास सुरू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एल्विश यादव आणि त्यांच्या वडिलांच्या दूरध्वनीवर परदेशी क्रमांकावरून संदेश पाठवण्यात आला. या संदेशात दोन दिवसांच्या आत दहा कोटी रुपये न दिल्यास गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी देण्यात आली होती. सुरुवातीला दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र प्रतिसाद न मिळाल्यानंतर थेट संदेश पाठवून खंडणीची मागणी करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# नेपाळमध्ये ओळखपत्राशिवाय भारतीयांना प्रवेश नाही

**बालेन सरकारचा आदेश**

◆ **कांठमाडू, १० मे**

नेपाळमध्ये जाणाऱ्या भारतीय नागरिकांकडे ओळखपत्र असणे अनिवार्य करण्यात आले आहे. ओळखपत्राशिवाय नेपाळमध्ये भारतीय नागरिकांना प्रवेश मिळणार नसल्याचा आदेश बालेन शाह सरकारने जारी केला आहे. याशिवाय नेपाळमधून भारतात येणाऱ्यांनाही आपले परिचय पत्र दाखवावे लागणार आहे.

आधार कार्ड किंवा सरकारने जारी केलेले इतर कोणतेही वैध ओळखपत्र यासाठी ग्राह्य धरले जाईल. नेपाळ प्रशासनाने शनिवारपासून या नियमाची कडक अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

नवा नियम लागू झाल्यानंतर जोगबनी येथील भारत-नेपाळ सीमेवर दिवसभर गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. ओळखपत्रांच्या सखोल तपासणीमुळे सीमेवर वाहनांच्या आणि पादचाऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मोठ्या संख्येने प्रवासी नेपाळला जाण्यासाठी सीमेवर पोहोचले. मात्र, नेपाळ पोलिसांकडून ओळखपत्र तपासल्यानंतरच लोकांना प्रवेश दिला जात होता.

(वृत्तसंस्था)

### चीनची घुसखोरी रोखण्यासाठी निर्णय

जिल्हाधिकारी युवराज कटेल यांनी स्पष्ट केले की, सीमा ओलांडण्यासाठी ओळखपत्र दाखवणे बंधनकारक असेल. नेपाळ सीमेवरून चिनी नागरिकांच्या घुसखोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला. तीन दिवसांपूर्वी अररियाच्या जोगबनी सीमेवरून भारतात घुसलेल्या एका चिनी नागरिकाला वैध कागदपत्रांशिवाय पकडण्यात आले होते.

# पाकिस्तान-बांगलादेशात सीमापार दहशतवादावर करार

**तस्करीला आळा घालण्यासाठी सहकार्य वाढवणार**

◆ **ढाका, १० मे**

सीमापार दहशतवाद, मादक पदार्थ तस्करी रोखणे, माहितीची देवाणघेवाण आणि संयुक्त गुप्तचर कारवाया करण्यासंदर्भात पाकिस्तान-बांगलादेशमध्ये करार झाला. दोन्ही देशांच्या गृहमंत्र्यांनी शनिवारी करारवर स्वाक्षरी केली. दोन्ही देशात कोणतीही अधिकृत भू-सीमा नसतानाही झालेला करार चर्चेचा विषय ठरला आहे.



कराराचा उद्देश अवैध मादक पदार्थांची तस्करी, मनी लॉण्ड्रिग आणि दहशतवादविरोधात कारवाईसाठी माहितीची देवाणघेवाण करणे असल्याचे बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. बांगलादेशचे गृहमंत्री सलाहुद्दीन अहमद आणि पाकिस्तानचे गृहमंत्री सय्यद मोहसिन रझा नक्वी यांनी आपापल्या सरकारांच्या वतीने या कराराच्या दस्तावेजावर स्वाक्षरी केली. गृह मंत्रालयाचे उपमुख्य माहिती अधिकारी, फैसल हसन यांनी सांगितले की, या सामंजस्य करारामध्ये मादक पदार्थांची तस्करी आणि संबंधित मनी लॉण्ड्रिगच्या कारवायांना आळा घालण्यासाठी माहितीची नियमित देवाणघेवाण आणि तांत्रिक सहाय्याची तरतूद आहे. दरम्यान दोन्ही देशांच्या गृहमंत्र्यांमध्ये झालेल्या करारामध्ये बांगलादेश-पाकिस्तान सीमेचा थेट उल्लेख नव्हता. तरीही सीमापार दहशतवादाचा सामना करण्यासाठी हा करार कसा आणि का केला, असा सवाल बांगलादेशी पत्रकार सलाह उदगिन शोएब चौधरी यांनी उपस्थित केला आहे.

(वृत्तसंस्था)

### ग्वाल्हेरमध्ये सायबर ठगबाजांचा भंडाफोड

◆ **ग्वाल्हेर, १० मे**

ग्वाल्हेर गुन्हे शाखेने शनिवारी दुपारी शहरातील उच्चभ्रू कैलास विहार भागातील हॉटेल एचजीमधून चार एजंटला अटक करून एका आंतरराष्ट्रीय सायबर फसवणूक टोळीचा भंडाफोड केला. ही टोळी हॉटेलच्या खोलीचा कंट्रोल रूम म्हणून वापर करून देशव्यापी सायबर फसवणूक नेटवर्क चालवत होती. धक्कादायक म्हणजे, या टोळीचे संबंध पाकिस्तानशी आहेत.

तपासात असे उघड झाले की, पाकिस्तानच्या कंट्री कोड असलेल्या क्रमांकांचा वापर करून बनावट खात्यांचे (म्युल अकाउंट्स) नेटवर्क चालवले जात होते. गुन्हे शाखा सध्या आरोपींची सखोल चौकशी करत आहे. अटक केलेल्यांपैकी दोघे ग्वाल्हेरचे, एक मोरेनाचा आणि एक राजस्थानच्या धोलपूरचा रहिवासी आहे.

गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, हॉटेल एचजीमधील एका खोलीत काही संशयास्पद तरुण राहत असून ते मोबाईल फोन वापरून संशयास्पद कारवाया करत आहेत.

(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानी नागरिकांची यूएईतून हकालपट्टी

**दहा हजार कामगार हद्दपार, रातोरात पाठविले मायदेशी**

◆ **दुबई, १० मे**

अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करण्याचा पाकिस्तानला मोठा फटका बसला आहे. पाकिस्तानच्या दुटप्पी धोरणावर नाराज असलेल्या संयुक्त अरब अमिराती (यूएई) सरकारने दहा हजार पाकिस्तानी नागरिकांची देशातून हकालपट्टी केली. कुठलेही कारण न देता त्यांना एकाच रात्रीत मायदेशी रवाना करण्यात आले.



आखाती प्रदेशात आठवडाभर चाललेल्या संघर्षानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा घडवून आणण्यात पाकिस्तानने महत्त्वाची भूमिका बजावली होती. इराणी हल्ल्यांचा पाकिस्तानने निषेध न केल्यामुळे नाराज असलेल्या यूएईने सुरुवातीली पाकिस्तानला कर्ज परत मागितले. कर्जाचा भरणा केल्यानंतर आता त्यांनी पाकिस्तानी नागरिकांची हकालपट्टी करणे सुरू केले. शनिवारी एकाच दिवशी दहा हजार पाकिस्तानी नागरिकांना पकडण्यात आले. त्यांना कुठलेही कारण न देता मायदेशी रवाना करण्यात आले. याशिवाय अनेक पाकिस्तानी कामगारांना ताब्यात घेतले असून, लवकरच त्यांनी रवानगी करण्यात येणार आहे. यूएईच्या परराष्ट्र मंत्रालयाने या कारवाईला सुरक्षेचे कारण दिले आहे. पाकिस्तानी शिया नेत्यांचे म्हणणे आहे की, इराणशी असलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक संबंधांमुळे त्यांच्या समाजाला लक्ष्य केले जात आहे.

(वृत्तसंस्था)

# ट्रम्प-जिनपिंग यांची पुढील आठवड्यात भेट

**चर्चेत दोन महासत्तांमधील स्पर्धेची पुढील दिशा ठरणार**

◆ **वॉशिंग्टन, १० मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे सर्वोच्च नेते व राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची पुढील आठवड्यात बीजिंग येथे भेट होणार आहे. दोन्ही नेत्यांमध्ये होणारी चर्चा जगातील दोन महासत्तांमधील स्पर्धेच्या पुढील टप्प्याला दिशा देणारी ठरू शकते.



व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, ट्रम्प गुरुवापासून चीनच्या दौऱ्यावर असेल. दोन दिवसांच्या या बैठकीत ट्रम्प आणि शी जिनपिंग इराणमधील युद्ध, व्यापार, तैवान आणि इतर मुद्द्यांवर चर्चा करतील. ट्रम्प आणि जिनपिंग यांची शेवटची भेट ऑक्टोबरमध्ये दक्षिण कोरियात झाली होती. त्यावेळी दोन्ही नेत्यांनी आपापसातील तीव्र व्यापारयुद्ध थांबवण्याचे मान्य केले होते. यानंतर अमेरिकेने चीनी वस्तूंवर तीन अंकी दराने शुल्क (टॅरिफ) लादले होते, तर चीनने दुर्मिळ खनिजांच्या (रेअर अर्थ्स) जागतिक पुरवठ्यावर निर्बंध आणण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर पुढील आठवड्यातील ही भेट दोन्ही देशात निर्माण झालेली अस्वस्थता, तात्पुरता समेट टिकणार की नाही, हे ठरवू शकते.


(वृत्तसंस्था)

# पश्चिम घाटात हरवणार 'चतुर', 'टाचणी'

◆ **मुंबई, १० मे**

**पश्चिम घाट हा जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या जैवविविधता असणाऱ्या, हिमालयापेक्षाही प्राचीन असलेला पश्चिम घाट साधारणपणे १५ कोटी वर्षे जुना असून तिथल्या विविध प्रजाती धोक्यात आलेल्या प्रदेशांपैकी (बायोडायव्हर्सिटी हॉटस्पॉट्स) एक आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने या संशोधनाला अर्थसहाय्य केलं होतं. हा अभ्यास भारतातील ५ राज्यांमध्ये २ वर्षांच्या (२०२१-२०२३) कालावधीत करण्यात आला.**

### सर्वेक्षणाचे निष्कर्ष धक्कादायक





अशा प्रकारच्या या पहिल्याच संशोधनात पश्चिम घाटातील 'चतुर' (ड्रॅगनफ्लाय) आणि 'टाचणी' (डॅमसेलफ्लाय) या कीटकांच्या प्रजातींवर करण्यात आलेल्या अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष एकाच वेळी लक्षवेधी आणि चिंताजनक आहेत. अभ्यासानुसार, पश्चिम घाटात चतुर (ड्रॅगनफ्लाय) आणि टाचणी (डॅमसेलफ्लाय) या कीटकांच्या १४३ विविध प्रजातींचे वास्तव्य आहे. यातील किमान ४० प्रजाती या प्रदेशातील स्थानिक प्रजाती आहेत. विशेष म्हणजे या प्रजाती जगात इतरत्र कुठेही आढळत नाहीत.

या अभ्यासानुसार, या प्रदेशात यापूर्वी नोंदवण्यात आलेल्या किमान ७९ अतिरिक्त प्रजाती यावेळी आढळल्या नाहीत. शिवाय, चतुर आणि टाचणीच्या प्रजातींच्या संख्येत ३५ टक्क्यांची घट झाली आहे.

यातील काही प्रजाती अत्यंत दुर्मिळ आहेत किंवा त्या विशिष्ट ऋतूंमध्येच सक्रिय असतात. त्यामुळे संशोधकांच्या नजरेतून त्या सुटल्या असू शकतात किंवा त्यांना त्या दिसल्या नसाव्यात. मात्र, प्रजातींच्या संख्येत ही घट होण्यामागे, त्यातील काही प्रजाती नामशेष होणं, हे कारण असावं.

चतुर आणि टाचणी हे कीटक प्रदेशातील पर्यावरणाची स्थिती चांगली आहे की नाही याचे उत्तम निदर्शक आहेत. त्यामुळेच जेव्हा या कीटकांची संख्या घटते, तेव्हा इतल्या परिसंस्थेत संभाव्य ऱ्हास किंवा हानी झाल्याचा तो संकेत असू शकतो, असे संशोधकांचे मत आहे. पश्चिम घाट म्हणजे पश्चिम किनारपट्टीला समांतर पसरलेली १,६०० किलोमीटरची पर्वतरांग आहे. या भागाला युनेस्कोनं 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून जाहीर केले आहे.

पश्चिम घाटात जागतिक स्तरावर धोक्यात असलेल्या किमान ३२५ प्रजाती राहतात. तसंच, भारतात आढळणाऱ्या वनस्पती, झाडं आणि प्राण्यांच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक प्रजातींचे इथे वास्तव्य आहे. इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर (आययूसीएन)नं त्यांच्या २०२५ च्या अहवालात या प्रदेशाचं वर्गीकरण 'अत्यंत चिंताजनक' या प्रकारात केलं.

शेतीच्या विस्तारासह वेगवान शहरीकरण, पशुधनासाठी कुरणं, पायाभूत सुविधांचा विकास (पवनचक्क्या आणि धरणं), परकीय किंवा इतर प्रदेशातील आलेल्या प्रजाती आणि खाणकाम यामुळे या प्रदेशाला गंभीर धोका निर्माण होत असल्याचे संबंधित अहवालात नमूद करण्यात आले आहे.

यासोबतच, पश्चिम घाटातील कृषी पद्धतींमुळे तिथल्या बेडकांच्या प्रजातींनाही धोका निर्माण झाला आहे. गॅलेक्सी फ्रॉग्स किंवा दीर्घिका बेडूक ही दुर्मिळ प्रजाती पश्चिम घाटातून नाहीशी झाली आहे. तसेच, २०२३ मधील पक्ष्यांच्या सर्वेक्षणात पश्चिम घाटातील स्थानिक प्रजाती असलेल्या पक्ष्यांच्या १२ प्रजातींमध्ये ७५ टक्क्यांची घट झाली आहे. पश्चिम घाटात राहणाऱ्या प्रजातींचा मागोवा घेणं, त्यांची नोंद ठेवणे महत्त्वाचे असल्याचे संशोधकांचे मत आहे.

(तभा वृत्तसेवा)

# अहिल्यानगर जिल्ह्यात आढळले ३ हजार ६०९ अंथरुणाला खिळलेले रूग्ण

**अहिल्यानगर** : दुर्धर आजाराने व्याधीग्रस्त होऊन अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांचे उर्वरित आयुष्य सुखकर व वेदनारहित करण्यासाठी आरोग्य विभागाने 'पॉलिएटीव्ह केअर' योजना आरोग्य विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यात अशा प्रकारचे ३ हजार ६०९ रुग्ण आढळले आहेत. त्यामध्ये ४६१ कर्करुग्ण आहेत. यासाठी आरोग्य विभागाने गेल्या महिन्यात सर्वेक्षण केले होते. 'पॉलीएटिव्ह केअर' कार्यक्रम अंतर्गत रुग्णांवरील उपचारासाठी प्रत्येक जिल्हा सरकारी रुग्णालयात १० खाटा, ग्रामीण रुग्णालयात व उप रुग्णालयात २ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अशा अंथरुणाला खिळलेल्या व स्वतःची काळजी घेणे अशक्य असलेल्या रुग्णांना राज्य सरकार मोफत उपचार करणार आहे तसेच त्यांना समुदाय आरोग्याधिकारींमार्फत घरपोच उपचार केले जाणार आहेत. जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी ही माहिती दिली.

## अग्रलेख...

# परिवर्तनाच्या नव्या दिशा

सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडून येण्यासाठी मोठा कालावधी लागत असतो. कारण, या बदलाच्या काळात घट्ट झालेल्या घडीचा प्रत्येक पदर हा नव्याने आकार घेत असतो. स्वातंत्र्यानंतर १९७४ पर्यंत देशात काँग्रेसचा एकछत्री अंमल होता. पंडित जवाहरलाल नेहरू, लालबहाद्दूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातील राजकीय सत्तेची घडी घट्ट झाली होती. स्वातंत्र्याची नवीन पहाट उगवलेल्या विशाल भारतासाठी पर्यायाने जनतेसाठी हा प्रारंभीचा सामाजिक आणि राजकीय कालखंड होता. त्यामुळेच तत्कालीन नेत्यांनी घेतलेले कोणतेही निर्णय, मग ते सामाजिक प्रवाहाच्या विरोधात असले तरी, जनतेने स्वीकारले. पर्याय नव्हतेच. वास्तविक पाहता हे वरवरचे बदल होते. देशात १६ ऑगस्ट १९४६ रोजी मोहम्मद अली जिना यांनी दिलेल्या 'थेट कृती' (डायरेक्ट ॲक्शन) चा नारा आणि त्यानंतर कोलकात्यासह देशातील मुस्लिमबहुल भागात धर्माच्या नावावर हिंदूंची अमानुषपणे केलेली कत्तल देश विसरलेला नाही आणि त्याच्या काळ्या नोंदी कायमच्या स्मृतिपटलावर कोरलेल्या आहेत. 'भारताचे विभाजन करा अथवा भारताला नष्ट करा', असा आदेशच जिना यांनी मुस्लिमांना दिला होता. शेकडो वर्षांपासून बेसावध, नि:शस्त्र आणि निस्तेज बनून राहिलेल्या हिंदूंवर क्रूर दंगलीचे संकट कोसळले. सर्वांत जास्त फटका बंगालमधील हिंदूंना बसला होता. कोलकाताच्या गल्लोगल्ली हिंदूंची प्रेते कित्येक दिवस तशीच पडून होती. त्या प्रेतांवर गिधाडे ताव मारत होती. ही गिधाडे पुढील कित्येक दशके बंगालच्या आकाशात घिरट्या घालत होती. कारण, या गिधाडांना खाद्य पुरविणारी सरकारे येत राहिली. अगदी ४ मे २०२६ पर्यंत ही गिधाडे आकाशात मुक्तपणे संचार करीत होती. पण, अन्यायाने, अत्याचाराने आतून पेटून उठलेल्या बंगाली नागरिकांनी अखेर हिंदुद्रोही मिर जाफरच्या वंशजांना सत्तेवरून खाली खेचले. परिवर्तनाची ही नवी दिशा आहे. खरे तर, थोडाथोडका नव्हे तर सुमारे ८०० वर्षांपासून बंगालच्या नशिबी कधीच शांतता आणि समृद्धीचा काळ आला नाही. तत्पूर्वीचा मौर्य, गुप्त, गौड, पाल, चंद्र, देव आणि सेन राजवंशांचा समृद्ध आणि गौरवशाली काळही बंगालने अनुभवला. मात्र, सेन राजवंशाचा (१२३०) शेवट झाल्यानंतर क्रूर मुस्लिम शासक सुल्तान, मोगल यांनी अत्याचाराच्या सीमा पार करीत बंगालमधील सामाजिक, धार्मिक संतुलनच पार बिघडवून टाकले. बंगालचा गौरवशाली इतिहास नष्ट करण्याबरोबच बंगाली अस्मिता मिटविण्याचे प्रयत्न केले. शतकानुशतके चालत आलेल्या अन्याय, अत्याचारामुळे बंगाली माणूस हतबल झाला होता. उरलीसुरली कसर इंग्रजांनी काढून टाकली. दक्षिणेतील सागरी किनाऱ्यावर मराठ्यांची सत्ता असल्याने तिकडे बस्तान बसविणे कठीण असल्याची जाणीव झाल्यानंतर इंग्रजांनी पूर्व किनाऱ्यावर ताबा मिळविला. कोलकाता हे इंग्रजांचे मोठे लष्करी ठाणे झाले. प्लासी आणि बक्सारच्या लढाया जिंकत इंग्रजांनी भारतात आपले पाय पक्के रोवले. पुढे १८५७ च्या बंडाच्या वेळी कोलकाता येथूनच सैन्याच्या तुकड्या इंग्रजांनी पाठविल्या होत्या. लॉर्ड कर्झनने बंगालचे दोन तुकडे केले होते. विरोधानंतर त्याला निर्णय मागे घ्यावा लागला तरी १९४७ मध्ये धर्माच्या नावावर बंगालचे विभाजन अखेर झालेच. स्वातंत्र्यानंतरही बहुसंख्य हिंदू जनतेला मनमोकळेपणाने जगता आले नाही. फाळणीनंतरच्या हिंसाचारानंतर कोलकातासह राज्यातील मोठ्या शहरातील मुस्लिम पूर्व बंगालमध्ये जाण्याऐवजी खेड्यापाड्यांमध्ये घुसले. त्याकाळी ग्रामीण भागात मुबलक प्रमाणात जमीन रिकामी होती. पुढील तीन दशके या मुस्लिमांना काँग्रेसने पोसले आणि स्थिरस्थावर केले. त्यानंतर १९७७ मध्ये आलेल्या डाव्या सरकारांनी भूमी सुधारणा कायद्याच्या नावाखाली हिंदूंच्या जमिनी काढून घेत मुस्लिमांना वाटल्या. पुन्हा एकदा हिंदूंचे जगणे कठीण झाले. १९७१ मध्ये बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर बंगाली मुस्लिमांचे लोंढेच्या लोंढे पश्चिम बंगालमध्ये घुसले. या घुसखोरांना बाहेर काढण्याऐवजी त्यांना पोसण्याचे काम, काँग्रेस, डावे आणि तृणमूल सरकारने केले. आज बंगालमध्ये मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांच्या आसपास आहे. याच लोकसंख्येच्या बळावर आतापर्यंत हिंदुविरोधी राजकीय पक्ष सत्ता उपभोगत आले. पण, हिंदू एक झाला तर कुणाचे काहीच चालत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

४ मे रोजी बंगाली हिंदूंनी तृणमूल काँग्रेसला पार जमिनीवर आदळले. नागरिकांनी मोकळा श्वास घेतला. डावे आणि तृणमूलच्या काळात बंद करण्यात आलेली देवालये खुली झाली; नागरिक आनंदाने जय श्रीराम, मां दुर्गा, मां कालीच्या घोषणा देत आनंदाने नाचू लागली. ही सर्व दृश्ये अंगावर रोमांच उभी करणारी होती. पूर्व भारताचे महाद्वार असलेले पश्चिम बंगाल भाजपासाठी खुले झाले. आता वेळ आहे ती दक्षिणेची. तेथेही वेगळ्या अर्थाने परिवर्तन येतेय. कर्नाटक वगळता भाजपाला कुठेही स्वबळावर सत्ता स्थापन करता आलेली नाही. केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा ही राज्ये अजूनही भाजपासाठी दूर आहेत. पण, आधी उल्लेख केल्याप्रमाणे परिवर्तन होण्यासाठी दीर्घ कालावधी लागत असतो. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपाला जवळपास ५० वर्षे प्रतीक्षा करावी लागली. दक्षिणेत तर आता कुठे जमीन तयार होत आहे. सुदैव असे की अजून तरी दक्षिणेतील राज्ये हिंदुबहुल आहेत. केरळमध्ये तीन तर तामिळनाडूत भाजपाचा एक आमदार निवडून आलेला आहे. केरळमध्ये भाजपाला ११.४२ टक्के मतदान झाले. तामिळनाडूत मात्र, फक्त २.९७ टक्के मते मिळाली; जी डाव्या पक्षांपेक्षा जास्त आहेत, तर काँग्रेसपेक्षा थोडी कमी. पण, आतापर्यंत जे द्रमुक आणि अद्रमुक पक्ष द्रविडी अस्मितेचा आधार घेत सत्तेवर येत होते, त्या अस्मितेलाच यावेळी हिंदू-ख्रिश्चन असलेल्या जोसेफ विजय यांनी सुरुंग लावला. याचाच अर्थ दक्षिणेतील द्रविडी राजकारणाचे प्राबल्य हळूहळू लयाला जात असल्याची ही चिन्हे आहेत आणि ते देखील परिवर्तनच. एका चित्रपट कलाकाराने अगदी दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेला टीव्हीके हा पक्ष थेट सत्तेत येतो म्हणजे तामिळनाडूतील जनता पारंपरिक द्रविडी राजकारणाला कंटाळली असल्याचे द्योतक आहे. या निवडणुकीत जनतेने थेट वर्मावरच घाव घातला. पश्चिम बंगालमध्ये विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन्ही मतदारसंघांमध्ये तर तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांना कोलाथूर मतदारसंघात मतदारांनी धूळ चारली. २०११ च्या जनगणनेनुसार तामिळनाडूत ८७.५८ हिंदू आहेत. सनातन संस्कृतीचा वारसा सांगणारी हजारो मंदिरे आहेत. पण, येथे कधीही हिंदुत्ववादी राजकीय पक्षाचे सरकार आले नाही. येथील राजकारण द्रविडी विचारसरणीवर चालणारे आहे. नास्तिकवाद हा द्रविड विचारसरणीचा गाभा आहे. ई. व्ही. रामासामी पेरियार हे पक्के नास्तिकवादी होते. नास्तिक असणे किंवा नसणे हा ज्याचा त्याचा प्रश्न. पण त्यांचा नास्तिकवाद हा तामिळनाडूतील ब्राह्मणांना विरोध करण्याभोवती फिरत होता. त्यांचा देवाला टोकाचा विरोध होता; त्यांच्या नावातही राम हा शब्द आहे हा भाग वेगळा. तामिळनाडूतील राजकारण हे अनेक दशकांपासून द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोनच पक्षांभोवती फिरत राहिले. या दोन्ही पक्षांनी काँग्रेस, भाजपासह एकाही राष्ट्रीय पक्षाला राज्यात फिरकू दिले नाही. असा स्वभाव असलेल्या तामिळनाडूच्या द्विध्रुवीय राजकारणात जोसेफ विजय यांनी मारलेली मुसंडी म्हणजे टीव्हीकेच्या रूपाने राज्याच्या राजकारणात निर्माण झालेला पर्याय मानला पाहिजे. खरे, तर पुढाऱ्यांचे तेच ते चेहरे पाहून जनताही कंटाळली होती. विजय यांनी पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळवून सूड आणि कुरघोडीच्या राजकारणाला मूठमाती दिली आहे. विजय यांचा पक्ष अण्णाद्रमुकच्या मतपेढीला खिंडार पाडेल आणि द्रमुक आपसूकच निवडून येईल, असे अंदाज पोल पंडितांनी बांधले होते. निकालापूर्वी जे अंदाज वर्तविण्यात आले होते, त्यात विजय यांचे नाव कुठेही नव्हते. पण, झाले उलटेच. विजय यांनी द्रमुकच्या मतपेढीलाच खिंडार पाडले. तामिळनाडूच्या भोवती असलेला द्रविडी राजकारणाचा फास सैल होतो आहे. येणाऱ्या काळात भाजपासाठी हे सुचिन्ह आहे, असे म्हणायला हरकत नाही. जे परिवर्तन अधिक काळ घेते, ते तितकेच मजबूत असते हेही वास्तव आहेच. ते सुरू होणे महत्त्वाचे असते आणि जे सुरू होते ते आपल्या दिशेने पुढे जातेच.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# उच्चांक आणि नीचांक!

उच्चांक आणि नीचांक! एकाचवेळी या दोन्ही बाबी साध्य करण्याची 'जादू' राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी करून दाखविली आहे. ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी केल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीने 'उच्चांक' गाठला आहे आणि दुसरीकडे अमेरिकेत ट्रम्प यांच्या लोकप्रियतेने 'नीचांक' गाठला आहे. २०२५ च्या जानेवारीत ट्रम्प यांनी राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली तेव्हा ४७ टक्के अमेरिकन जनतेचा त्यांना पाठिंबा होता आणि त्यांनी इराणविरुद्ध युद्ध सुरू केल्यानंतर त्यांची ही लोकप्रियता वाढण्याऐवजी कमी होत, ती आता केवळ ३४ टक्क्यांवर आली आहे. आर्थिक विषय व महागाई हाताळण्याबाबत तर फक्त २२ टक्के अमेरिकन जनता त्यांच्या भूमिकेशी सहमत असल्याचे ताज्या चाचणीत सांगण्यात आले आहे.

**रशिया सुखावला** : अमेरिका-इस्रायल युद्धाने सारे जग चिंताग्रस्त असताना, रशिया मात्र सुखावला आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी रशियाची आर्थिक स्थिती चिंताग्रस्त अशी झाली होती. केवळ चार दिवसांत युक्रेनला चित करून हा देश ताब्यात घेऊ असे स्वप्न पाहणाऱ्या राष्ट्रपती पुतिन यांना युक्रेनने त्रस्त केले आहे. चार वर्षे दोन महिने म्हणजे एकूण ५० महिन्यांपासून सुरू असलेल्या या युद्धाने रशियाची अर्थव्यवस्था जर्जर करून टाकली आहे. आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार मार्च महिन्यात रशियन सैन्याला युक्रेनचा एक चौरस किलोमीटर भागही ताब्यात घेता आलेला नाही.

**दरमहा ५० हजार** : दुसरीकडे युक्रेनचे राष्ट्रपती झेलेन्स्की यांनी दरमहा ५० हजार रशियन सैन्य ठार करण्याचे लक्ष्य आपल्या सेनाधिकाऱ्यांना दिले आहे. रशियाने वर्षभरात ४ लाख नवे सैन्य भरती करण्याचे ठरविले आहे. त्याला उत्तर देण्यासाठी झेलेन्स्की यांनी दरमहा ५० हजार रशियन सैनिकांना ठार करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. रशिया दरमहा ३५ ते ४० हजार सैनिक गमावीत असल्याचा एक अंदाज वर्तविला जात आहे. यात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. रशियाचे ९६ टक्के सैनिक युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात मारले जात आहेत तर फक्त ४ टक्के सैनिक तोफा-बंदुका या परंपरागत शस्त्रांनी मारले जात आहेत.

**प्रचंड नुकसान** : युक्रेन युद्धात केवळ रशियन पायदळाचेच नाही तर रशियाचे नौदल व हवाई दळ यांचेही प्रचंड नुकसान झाले असल्याचे समजते. रशियाला हे सारे अनपेक्षित होते. याचा स्वाभाविक परिणाम रशियाच्या अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहे. पहिली तीन वर्षे रशियाची जनता शांत होती. आता जनतेतूनही युद्धाच्या विरोधात स्वर उमटत आहेत.

**जनमत चाचणी** : रशियात लोकशाही नावाला असली तेथे सरकारच्या मालकीची एक जनमत चाचणी संस्था आहे. रशियन पब्लिक ओपिनियन रिसर्च सेंटर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेने जारी केलेल्या नव्या आकडेवारीनुसार राष्ट्रपती पुतिन यांची लोकप्रियता ८८ टक्क्यांवरून घसरत ६५.६ टक्क्यांवर आली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युद्धामुळे रशियात वाढलेली महागाई. 'रोसस्टॅट' रशियन फेडरेशन स्टॅटिटिक्स सर्व्हिसच्या आकडेवारीनुसार देशातील महागाई ७५ टक्के वाढली आहे. महागाईमुळे चलनवाढ वाढली आहे. यावर उपाययोजना म्हणून रशियाच्या रिझर्व्ह बँकने व्याजाचे दर २० टक्क्यापर्यंत वाढविले होते. आता ते कमी करण्यात आले असले तरी हे दर सध्या १४.५ एवढे वाढलेले आहेत.

**तेल उत्पादनात घट** : रशिया दररोज ४ लाख बॅरल कच्च्या तेलाचे उत्पादन करीत होता. पण, युक्रेनने रशियाची बंदरे व तेल शुद्धीकरण कारखाने यांना लक्ष्य करणे सुरू केल्यापासून, त्याने आपल्या तेल उत्पादनात घट केली असून, रशिया आता दररोज ३ लाख बॅरल तेलाचे उत्पादन करीत आहे. म्हणजे एकीकडे युद्धक्षेत्रात रशियाला फार मोठी सैनिक हानी सहन करावी लागत आहे, दुसरीकडे युद्धामुळे अर्थव्यवस्था डबघाईस आलेली आणि तेल उत्पादनात घट झालेली अशा गंभीर संकटात रशिया सापडला असताना, अमेरिका- इराण युद्ध भडकले आणि रशियाचे फावले.

**तेलाचा ओघ सुरू** : होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यापासून साऱ्या जगात कच्च्या तेलाचा पुरवठा प्रभावित झाला. सर्वत्र तेलाचे भाव वाढले आहेत आणि याचा नेमका फायदा रशियाने उठविला. अचानक रशियाच्या तेलास मागणी वाढली. ती पूर्ण करणे रशियास जड जात आहे. रशियाने आपल्या कच्च्या तेलाच्या किमती भरमसाट वाढविल्या आहेत. भारतास तो कमी दरात तेल पुरवीत होता. मात्र, मधल्या काळात भारताने रशियाकडून तेलाची आयात कमी केली असल्याने, रशिया नाराज झाला होता. आता रशियाने पूर्वीच्या स्वस्त दरात भारताला तेल देण्यास नकार दिला असल्याचे म्हटले जाते. सध्याच्या जागतिक स्थितीचा पुरेपूर फायदा उठविण्याचा निर्णय रशियाने घेतला असल्याचे दिसते. हे युद्ध त्याच्यासाठी जणू एक पर्वणी ठरले आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेला याने एकप्रकारे संजीवनी मिळाली असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे अमेरिकेने रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या तेलाबाबत जे आर्थिक निर्बंध घातले होते, ते शिथिल केले आहेत. म्हणजे इराण युद्ध झाले नसते तर रशियाचीच आर्थिक कोंडी झाली असती. इराण युद्ध सुरू करून राष्ट्रपती ट्रम्प यांनी एकप्रकारे रशियाला मोठी मदतच केली आहे.

**दुसरी चूक** : अमेरिका-इस्रायल यांनी इराणविरोधात युद्ध सुरू करून पहिली चूक केली होती. आता होर्मुझची नाकेबंदी करुन ट्रम्प दुसरी चुक करीत आहेत. या नाकेबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती एका बॅरलमागे १२३ डॉलरपर्यंत पोहोचल्या आहेत, जो मागील चार वर्षांतील उच्चांक आहे. या नाकेबंदीचा इराणवर परिणाम होत असला तरी इराण काही गुदमरून मरणार नाही. कारण, चीन व पाकिस्तान यांनी इराणची भरपूर मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. इराण-चीन हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आहेच. या मार्गाने चीन इराणला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करू शकतो. त्यामुळे या नाकेबंदीने इराणमध्ये हाहाकार होईल व तो नाक मुठीत धरून शरण येईल अशा भ्रमात ट्रम्प यांनी राहू नये.

**पाकिस्तानचा निर्णय** : पाकिस्तानने इराणलगतची आपली सीमा खुली केली असून, या सीमामार्गाने माल वाहतूक सुरू झाली आहे. दोन्ही देशांत २००८ मध्ये झालेल्या एका करारानुसार हे करण्यात आले आहे. गब्ध व ताफतान या दोन मार्गांनी इराणमध्ये सामान पाठविणे सुरू झाले आहे. कराची, कासिम व ग्वादर या बंदरांवर मागील दोन महिन्यांपासून सामानांनी भरलेले ३ हजार कंटेनर पडून होते. ते या दोन मार्गांनी इराणमध्ये पाठविले जात आहेत. पाकिस्तान आणि इराण यांचे फार जवळचे संबंध राहिलेले आहेत. १९४७ मध्ये पाकिस्तान अस्तित्वात आल्यानंतर त्याला मान्यता देणारा इराण हा जगातील पहिला देश होता. ट्रम्प यांना याची कल्पना असणे शक्यच नाही. ट्रम्प यांनी होर्मुझ बंद केल्याने इराणची थोडीफार कोंडी होत आहे हे खरे असले तरी यामुळे इराणपेक्षा जगातील अनेक देश जादा अडचणीत येत आहेत. पण ट्रम्प यांना याची फारशी काळजी नसावी असे दिसते. कारण सध्या तरी ते होर्मुझची नाकेबंदी उठविण्याच्या मन:स्थितीत असल्याचे दिसत नाहीत.

**नवा नीचांक?** : राष्ट्रपती ट्रम्प पुन्हा युद्ध सुरू करण्याचा विचार करीत असल्याचे दिसते. जे युद्धाने साध्य झाले नाही ते नाकेबंदीने कसे साध्य होणार होते? आणि जे नाकेबंदीने साध्य झाले नाही, ते पुन्हा एकदा युद्ध सुरू करून कसे साध्य होणार? हे प्रश्न महत्त्वाचे असले तरी त्याचा विचार करण्याची गरज ट्रम्प यांना वाटत नाही. कारण, युद्धासारख्या गंभीर विषयाबाबत सखोल विचार करण्याची मानसिक क्षमता त्यांनी केव्हाच गमावली आहे. बहुधा यामुळेच त्यांना पदावरून हटविण्यासाठी २५ व्या घटनादुरुस्तीचा वापर करण्याची मागणी अमेरिकेत जोर धरू लागली आहे. तसे झाल्यास तो एक नवा नीचांक असेल. कारण, मानसिक असंतुलनासाठी आजवर कोणत्याही अमेरिकन राष्ट्रपतीस हटविण्यात आलेले नाही.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# शेतातील कचरा पेटविणे थांबवा!

शेतात कचरा दिसताच सरसकट आग लावली जाते. हीच आग मग पिकांसाठी आणि आसपास राहणाऱ्या लोकांकरिता कर्दनकाळ ठरते. आग लावल्याने लाभदायक सूक्ष्मजीव तडफडून मरतात. त्याचा फटका पिकांना बसतो अन् उत्पादनात घट होते. खतांचा खर्च वाढून शेती तोट्यात येते. एवढे शास्त्रीय संशोधन माहीत असतानाही महाराष्ट्रासह देशभरात बहुतांश शेतकरी हंगाम संपल्यावर शेतातील कचरा जाळण्यातच धन्यता मानतात. खरीप आणि रबी हंगाम संपल्यावर सर्व शेतकरी थोडा आराम करतात. त्यानंतर पुन्हा खरीप हंगामाच्या तयारीला लागतात. त्यांची तयारी एप्रिल, मे महिन्यात धुरा पेटविण्यापासून सुरू होते. पण धुरा पेटविल्याने जमिनीतील सूक्ष्म जीवजंतू मरतात. परिणामी शेतातील सुपिकता घटते. शेती तोट्यात येण्याचे हेही एक प्रमुख कारण आहे. म्हणूनच आता सरकारने शेतातील कचरा जाळण्यावर बंदी आणलीच पाहिजे. पंजाबमध्ये, तेथील शेतकरी धानाची कापणी झाल्यावर परळी जाळायचे. त्यामुळे होणारा धूर राजधानी दिल्लीत राहणाऱ्यांना जीवघेणा ठरायचा. एक तर मरा किंवा परळी जाळण्यावर सरसकट बंदी टाका असे दोनच पर्याय दिल्ली वाचविण्यासाठी समोर होते. संसदेतील खासदारांसह सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांपासून ते सामान्य माणसालाही त्याची झळ बसल्याने त्यांनी परळी जाळण्यावरच बंदी आणली. याचा अर्थ प्रशासकीय व्यवस्थेतील लोकांना जेव्हा त्रास होईल तेव्हाच त्यांनी चांगले निर्णय घ्यायचे काय, यावरही मंथन व्हायला हवे. घटना घडल्यावर हातपाय हलविण्यापेक्षा ती घडू नये, याचीच व्यवस्था अमलात आणणे काळाची गरज आहे.



नागपूर जिल्ह्यात येणाऱ्या भिवापूर तालुक्यातील धामणगावात शनिवार, २ मे २०२६ रोजी कैलास ढाकुणकर याने शेतात कचरा जाळला. त्याच्या निष्काळजीपणामुळे धामणगावातील ४५ घरांची राखरांगोळी झाली. पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पण झालेल्या नुकसानीचे काय? त्याचा विचार करता चूक करणाऱ्याकडूनच संपूर्ण आर्थिक नुकसानभरपाई वसूल करायला हवी. जेव्हा कठोर शिक्षा होईल, तेव्हाच शेतात कचरा जाळण्यापूर्वी शंभर वेळा विचार केला जाईल. तसे पाहता जोपर्यंत पृथ्वीवर माणूस राहील, तोवर शेतीचा व्यवसाय कायम राहणार आहे. शेतीशिवाय माणसाला दुसरा पर्याय नाही. हीच शेती समृद्ध करण्याचे कार्य डोळ्यांनी न दिसणारे सूक्ष्मजीव करीत असतात. याचा अर्थ ते आपले मित्रच म्हणायला हवेत. जेव्हा धुरा किंवा शेतातील कचरा पेटवला जातो तेव्हा हे सर्व सूक्ष्मजीव अक्षरशः तडफडून मरतात. यात प्रामुख्याने रायझोबियम, ॲझोस्पिरिलम, ॲझोटोबॅक्टर, निळे, हिरवे शेवाळ, ॲझोला यांचा समावेश आहे. रायझोबियम आणि ब्रॅडीरायझोबियम, जे नायट्रोजन खतांची गरज कमी करतात, मातीचे आरोग्य सुदृढ करतात. बॅसिलस सेरेयस जे वनस्पतींवरील मिठाचा ताण कमी करतात. वनस्पतींच्या वाढीस प्रोत्साहन देणारे रायझोबॅक्टेरिया बॅसिलस सबटिलिस, कृत्रिम कीटकनाशकांची गरज कमी करतात. नैसर्गिक रोग प्रतिकारशक्ती वाढवतात. पण शेतातील कचरा पेटवल्याने सूक्ष्म जिवांची हत्या होते. यासंदर्भात कुठल्याही पोलिस स्टेशनला खुनाचा गुन्हा दाखल होत नाही. मात्र निसर्ग नियमानुसार शेत उत्पादनात घट वाढते अन् तोटा होतो. निसर्ग न्यायालयाची आपली एक पद्धत आहे. त्याचे स्वत:चे चक्र आहे. मग नैसर्गिक चक्रात कचरा जाळून अडथळा आणण्याचा अधिकार शेतकऱ्यांना कुणी दिला आहे का? वस्तुतः त्यांनी शेतातील कचऱ्यापासून खतनिर्मिती करून सदुपयोग करावा. पण हा द्रविडीप्राणायाम करायचा कुणी, हळूहळू आता शेतकरीही विविध कारणांनी त्रस्त असल्याने जास्त भानगडीत पडतच नाहीत. त्यांनाही वाटते, मला काय करायचे? शेवटी शेती समृद्ध करायची असेल तर सूक्ष्म जिवांना वाचवा अन् शेती फुलवा हा मंत्र प्रत्यक्षात आणावा लागेल.

शेतातील कचऱ्याला आग लावली तर नवीन पीक आणि गवत चांगले उगवेल, अशी शेतकऱ्यांची धारणा आहे. पण ते पूर्णतः चूक असल्याची माहिती चंदनश्री पुरस्कार विजेते कृषितज्ज्ञ दिनेश ठाकरे यांनी दिली. नत्र, स्फुरद, पालाश, लोह, बोरॉन, जस्त, मंगल, मॉलिब्डेनम, तांबे, गंधक यांना अन्नद्रव्ये म्हणतात. यांचा अभाव असल्यास झाडांची पाने पिवळी पडतात. वाढ खुंटून जाते. पिकांवर प्रतिकूल परिणाम होतो. आग लागल्याने विविध अन्नद्रव्यांचा नाश होतो. एवढी मोठी हानी पाहता आग लावायचीच कशाला? शेवटी आग लावणाऱ्यांपेक्षा समाजातील सुज्ञ लोकांनी विझविणाऱ्यांनाच नेहमी सन्मान दिला आहे, नाही का?

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# संथ वाहते कृष्णामाई

नुकतेच नरसोबावाडी येथे दर्शनासाठी जाणे झाले. कृष्णा नदीच्या काठावर नृसिंह सरस्वती यांच्या पादुका आहेत. अत्यंत रमणीय आणि पवित्र असा हा परिसर आहे. संथ वाहणारी कृष्णामाई बघून 'संथ वाहते कृष्णामाई, तीरावरल्या सुखदुःखांची जाणीव तिजला नाही' या गीताच्या ओळी आठवल्या. दर्शन घेण्याच्या आधी कृष्णा नदीवर जाऊन हातपाय धुवावे असा विचार आला आणि पाच-सहा पायऱ्या उतरून पाण्यापर्यंत गेलो; परंतु पाण्याची अवस्था बघितल्यावर खरंच वाईट वाटले, कारण पाणी शुद्ध नव्हते.

आमच्या देशामध्ये नदीला अत्यंत पवित्र मानले जाते. गंगामाता, नर्मदा माता असे म्हणून आम्ही तिचा सन्मान करतो. काही वर्षांपूर्वी बसने प्रवास करीत असताना एका पुलावरून बस जात होती. खाली नदीचे विस्तीर्ण पात्र होते. माझ्या बाजूला एक साधू महाराज बसलेले होते. मी त्यांना सहजच विचारले की, ''महाराज, ही कोणती नदी आहे?'' त्यांनी नदीकडे पाहिले, पण काही उत्तर दिले नाही. मला असे वाटले की त्यांना ऐकू आले नसेल, म्हणून मी पुन्हा विचारले, ''महाराज, ही कोणती नदी आहे?'' काही वेळ थांबून ते मला म्हणाले, ''साहेब, हिला नदी म्हणू नका; ही नर्मदा मैया आहे.'' असे म्हणताना त्यांचे डोळे भरून आलेले होते. भारताच्या जनमानसात भरलेली ही भक्ती पाहून मी रोमांचित झालो. नद्यांच्या किनाऱ्यावर केवळ गावे वसलेली नाहीत, तर इथे संस्कृती वसलेली आहे. नद्यांच्या काठावर आमच्या देशातील लोकांचे जीवन फुलले आहे. पवित्र नद्यांच्या काठीच ऋषी-मुनी, संतांचे आश्रम आहेत, प्रसिद्ध देवालये आहेत. प्रत्येक नदीचे काहीतरी महत्त्व आहे. पर्वणीचा काळ जेव्हा असतो, तेव्हा वेगवेगळ्या नद्यांवर स्नान करण्याची आमची परंपरा आहे. या नदी-स्नानामागे सुद्धा कदाचित आमच्या पूर्वजांचा हेतू असेलच की, ज्या पाण्यामध्ये स्नान करायचे आहे ते पाणी शुद्ध असायला पाहिजे; म्हणून तरी लोक नद्यांचा सन्मान करतील, जलस्रोत शुद्ध ठेवतील. पूर्वी 'गंगे च यमुने चैव' असे म्हणत लोक घरीसुद्धा स्नान करायचे. नद्यांशी आमचा संपूर्ण भारतीय समाज जोडलेला होता. नद्यांमुळे देशाची सांस्कृतिक एकात्मता आणि राष्ट्रीय एकात्मता सुद्धा मजबूत झालेली आपल्याला दिसून येते.

स्वातंत्र्यानंतर देशामध्ये मोठमोठी धरणे उभी राहिली. शेतीला पाणी मिळावे, वीज निर्माण व्हावी असे अनेक हेतू त्यामागे होते ते साध्यही झाले असेल. परंतु त्यामुळे हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेली. कृषियोग्य जमीन गेली, पडीत जमीन गेली, आजूबाजूची जंगले सुद्धा गेली. माणसांचे पुनर्वसन झाले; त्यांना जमिनी मिळाल्या, पैसे मिळाले; परंतु प्राण्यांचे काय, पक्ष्यांचे काय? त्यांचे निवासस्थान असलेली जंगले नष्ट झाली; ती तर पुन्हा कोणी लावली नाहीत. प्राण्यांचे, पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाले; त्यांच्या आवागमनाचे मार्ग जलमय झाले. एका ठिकाणी मी वाचले होते की, नद्या आटल्यामुळे आजूबाजूचा हिरवागार परिसर हळूहळू नष्ट झाला. त्या परिसरात असणाऱ्या तृणभक्षी प्राण्यांचे अस्तित्वही हळूहळू समाप्त होत गेले. तृणभक्षी प्राणी तिथून निघून गेल्यामुळे मांसभक्षी प्राणी सुद्धा निघून गेले. मांसभक्षी प्राणी आणि तृणभक्षी प्राणी गेल्यामुळे त्यांच्यावर ज्या पक्षांची उपजीविका होती, त्यांनाही तो परिसर सोडावा लागला. पक्षी निघून गेल्यामुळे जंगलाची वाढ थांबली; जंगल दाट राहिले नाही व पुढे समाप्त झाले. सध्या कोणालाच वेळ नाही. माणसांना माणसांसाठी वेळ नाही, तर पशुपक्ष्यांसाठी कसा असेल? जंगले राहिली काय, संपली काय, प्राण्यांचे, पक्ष्यांचे अधिवास नष्ट झाले काय याचा विचार करायला फारसा कुणाला वेळ उरलेला नाही. तरीसुद्धा आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, हे निसर्गाचे सर्व सहकारी आपलेच आहेत. आपल्या अस्तित्वासोबत त्यांचेही अस्तित्व निर्माण झालेले आहे; त्यामुळे यांच्याही जीवनाचा काही ना काही उद्देश आहेच.

आपल्या धर्मग्रंथांमध्ये, जो वाहत्या जलाला प्रदूषित करतो, नदीकाठी मलमूत्र विसर्जन करतो, अशांना पापाचे भागीदार म्हटलेले आहे. जो हिरव्या वृक्षांना तोडतो, त्यालाही पापाचा भागीदार म्हटलेले आहे. आता सर्वत्र ही भागीदारी वाढलेली दिसत आहे. कारखान्यांमधून सोडले जाणारे पाणी नद्यांना प्रदूषित करत आहे. शहरांमध्ये सांडपाण्यामुळे नद्या या नाल्यांमध्ये परिवर्तित झालेल्या आहेत. गावोगावी हीच कथा आहे.

भारतातील पवित्र नद्यांची परिस्थिती जर खराब असेल, तर सर्वसामान्य नद्यांचे हाल कोण बघणार? 'नमामि गंगे' हा गंगा शुद्धीकरणाचा कार्यक्रम काही वर्षांपासून सुरू आहे; परंतु गंगेमध्ये सोडले जाणारे प्रदूषित पाणी, नाले, कारखान्यांचे पाणी यांचा जोपर्यंत बंदोबस्त केला जात नाही, तोपर्यंत गंगा शुद्ध कशी होणार, हाही एक प्रश्न आहे. यमुनोत्रीवरून येणारी यमुना ही सुद्धा शुद्ध असते; परंतु दिल्लीमध्ये प्रवेश केल्यावर मात्र यमुनेची परिस्थिती नाल्यापेक्षाही वाईट होते. काही दिवसांपूर्वी एका गावी जाणे झाले. तिथे गेल्यावर लक्षात आले की, वैनगंगेचे पात्र गावापासून खूपच जवळ आहे. स्वाभाविकच त्या ओढीने जवळपास अर्धा किलोमीटरचे अंतर कापून पाण्यापाशी गेलो आणि चेहऱ्यावर थोडे थंडगार पाणी मारावे म्हणून ओंजळीत घेतले; आणि चेहऱ्यावर पाणी मारणार, तोच त्या पाण्याकडे लक्ष गेले आणि खूपच धक्का बसला. ओंजळीत घेतलेले ते पाणी अत्यंत निराशेने पुन्हा सोडून दिले इतके ते खराब होते.

जंगलातले नाले, नद्या मात्र आपली शुद्धता टिकवून आहेत. काही वर्षांपूर्वी मध्यप्रदेशला जाताना घनदाट जंगल लागले. त्या जंगलातून जाताना एक खळाळत वाहणारा जलप्रवाह दिसला. तिथे आम्ही थांबलो आणि त्या थंडगार व अत्यंत शुद्ध पाण्याने कितीतरी वेळा चेहरा धुतला. एकदम शांतीचा अनुभव होता तो. शहरातल्या गर्दीने, धावपळीने त्रस्त झालेल्या लोकांना अशा पद्धतीचा अनुभव जर शहराच्या काही अंतरावर येऊ शकला, तरीसुद्धा त्यांचा थकवा निवळून जाईल. नद्यांचे हे पावित्र्य, स्वच्छता, शुद्धता, शीतलता टिकवण्याचे कार्य आम्हाला सगळ्यांना मिळूनच करायचे आहे.

ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीमध्ये म्हटले आहे ''कां फेडित पाप ताप । पोखीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥'' समाजाचे पाप आणि ताप यांचे हरण करण्याचे कार्य ज्या पवित्र गंगेला करायचे आहे, तिचे ते जीवितकार्य तिने करावे या साठी सुज्ञ समाजाने विचार आणि कृती करण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### कवी आणि कविता : एक विचारमंथन

दि. १० मे च्या अंकातील 'रविवारची पत्रे' अंतर्गत उपरोक्त मथळ्याखालील संजय वसंत पातुरकर यांनी काव्यरचनेबाबत ज्या विश्लेषणात्मक सूचना केल्या आहेत त्या समस्त काव्यछंदी कवी लोकांनी अनुसराव्या असे वाटते. जेणेकरून आधुनिक काळात होऊन गेलेल्या दिग्गज कवींनी जे मराठी साहित्य समृद्ध केले व आपल्या काव्यप्रतिभेने मराठी काव्यविश्व उजळून टाकले त्याचे आपल्या क्षमतेनुसार अनुसरण करून अधिक सक्षम, अर्थपूर्ण आणि प्रभावी काव्यरचना; सामान्य काव्य रसिक वाचकांना समजतील अशा अर्थसुलभ रचना कराव्या. गूढ व गर्भित अर्थांच्या शब्दयोजना असणाऱ्या काव्यरचना सामान्य आकलन क्षमता असणाऱ्या वाचकांना समजत नाहीत. उघड अर्थवाही, सोपी शब्द रचना मानवी स्वभावाच्या, सुखदुःखाच्या भावभावना व अनुभवांचे गुंफण असणाऱ्या काव्यरचनांचाही प्रसिद्धीत समावेश असावा असे विनंतीपूर्वक सुचवावे वाटते.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

### इस्रायलला इटलीचा दणका

इटलीच्या तडफदार पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि त्यांचे सरकार सातत्याने युद्धाला विरोध करत आले आहेत. इटलीने अलिकडेच घेतलेल्या एका निर्णयाने संपूर्ण युरोपात खळबळ उडाली आहे. आजपर्यंत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे जॉर्जिया मेलोनी यांचे सरकार आता मात्र उघडपणे इस्रायलच्या विरोधात निर्णय घेत आहे. इस्रायलच्या युद्धखोरीबद्दल अतिशय परखड भाषेत टीका करणाऱ्या राष्ट्रप्रमुखांमध्ये जॉर्जिया मेलोनी या अग्रस्थानी होत्या. आता त्यांनी इस्रायलबरोबरचा संरक्षण सहकार्य करारदेखील स्थगित करण्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे. गाजापट्टीमधील पॅलेस्टिनी जनतेचा प्रदीर्घ संघर्ष, वेस्ट बँकमधील इस्रायली आणि स्थानिक नागरिकांपर्यंत वाढता वाद तसेच लेबनॉनवर सुरू असलेले इस्रायलचे विनाशकारी हल्ले आदी गोष्टींमुळे जॉर्जिया मेलोनी यांनी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट होत आहे.

अलिकडच्या कारवायांमुळे इस्रायलशी जगभरातील देश संबंध तोडून टाकण्याचे निर्णय घेत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा तणाव निर्माण झालेला असतानाही इस्रायलकडून लष्करी कारवाया सुरूच राहिल्यामुळे तसेच इराण आणि अमेरिका यांच्यातील शांती वार्तेमध्ये खोडा घालत असल्यामुळे बेंजामिन नेत्यानाहू यांच्या विरुद्धचा जागतिक रोष वाढत आहे. गेल्या काही दिवसांअगोदर इस्रायली सैन्याकडून लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमेत सहभागी असलेल्या इटालियन जवानांवर गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत प्राणहानी झाली नसली तरी लष्करी वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. त्याचा इटलीने तीव्र निषेध नोंदवला तसेच इस्रायली राजदूताला पत्राद्वारे जाबही विचारला होता. त्यानंतर इटलीचे परराष्ट्रमंत्री ताजानी यांनी लेबनॉनची राजधानी असलेल्या बैरुत शहराला भेट देत लेबनॉनला जाहीर पाठिंबा दर्शविला.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### महिला व मुलींवरील अत्याचाराची वाढती प्रकरणे

भारत देश हा प्रेम संबंधांवर आधारित देश आहे. सर्व जगामध्ये भारतीय संस्कृती ही उच्च प्रतीची आहे. येथील सभ्यता जगात प्रसिद्ध आहे. भारतात नद्यांना माता म्हटलेले आहे तर दगडालाही भारतीय लोक देव स्वरूप समजतात. येथील लोक नरामध्ये राम व नारीमध्ये सीता पाहतात. अशा या पवित्र भारताच्या महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षात सुमारे ९४ हजार महिला व मुली बेपत्ता झाल्याची आकडेवारी जाहीर झालेली आहे. यांची कारणे शोधताना संबंधित यंत्रणा आजवर काही मीमांसा करताना दिसत आहेत. या बेपत्ता होणाऱ्यांपैकी काही प्रकरणे प्रेमसंबंधाशी जोडली गेली असतात, तर काही प्रकरणांमध्ये घरगुती वादातून महिला, मुली घराबाहेर पडत असल्याचे दिसून येते. अत्याचार, दडपण अशा कारणांनी घर सोडून निघून जाण्याची मानसिकता एखाद्या क्षणी बळावते असेही या यंत्रणांना वाटत होते. काही महिला बेपत्ता होण्याचा प्रकरणात मानवी तस्करी करणाऱ्या व महिलांना अनैतिक धंद्याच्या जाळ्यात ओढण्याच्या टोळ्यांचा सहभाग असावा असेही निष्कर्ष काढले गेले होते. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनात सक्तीच्या धर्मांतराविरोधात विधेयक पारित झाले आहे. याचे कायद्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशी किती प्रकरणी पुढे येत राहणार अशी भीती मात्र समाजाला सतावते आहे. महिला व मुलींवरील अत्याचाराची प्रकरणे अलिकडे का वाढली आहेत? अत्याधुनिक होण्याच्या लालसेने आम्ही अमेरिकेतील लोकांच्या फॅशनचे अंधानुकरण करत आहोत का? याचाही विचार होणे आवश्यक वाटतो.



**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### प्रेमाच्या अनुभूतींनी रंगली काव्य संध्या

**सोलापूर, दि. १० मे -**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे च्यावतीने ८ मे रोजी साप्ताहिक बैठकीत ''प्रेम एक अनुभूती'' या विषयावरील काव्य संध्या झाली. काव्यसंध्येची संहिता डॉ. संध्या रघोजी यांनी लिहिली होती. तेजस्विनी चांदणे, श्रीधर खेडगीकर, डॉ. सुमेधा कंदलगावकर आणि विकास धांडोरे यांनी प्रेमाच्या भावछटांवर आधारित कविता सादर केल्या. अध्यक्षस्थानी धनश्री केळकर होत्या, निलेश फोफलिया यांनी संयोजन केले. नियुक्त प्रांतपाल जयेश पटेल, डॉ .राजीव प्रधान, डॉ. ज्योती चिडगुपकर, मंजुषा गाडगीळ, डॉ. वैशाली जोशी, शांता येलंबकर, परिचिता शहा, सौम्या जक्कल, शोभा बोल्ली, अण्णासाहेब कोतली, रो. सलाम शेख आणि सिद्धांत बाबरे आदींची उपस्थिती लाभली. मराठी भाषेला अभिजात बनविणाऱ्या साहित्याविषयी कार्यक्रमांचे आयोजन वारंवार व्हावे अशी अपेक्षा धनश्री केळकर यांनी व्यक्त केली.



### ज्येष्ठ कवी माधव पवार यांना श्रद्धांजली

**सोलापूर, दि. १० मे -**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सोलापूर शाखा आणि म हाराष्ट्र साहित्य परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत कवी माधव पवार यांना नाट्य परिषदेच्या पद्माकर देव सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली. सोलापूरच्या साहित्य आणि नाट्य क्षेत्रातील दिग्गजांनी पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. शोकसभेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवारयांनी माधव पवार यांच्या साहित्यातील योगदानाचा गौरव केला. विजयकुमार साळुंखे यांनी पवार यांच्या सामाजिक बांधिलकीवर प्रकाश टाकला. पद्माकर कुलकर्णी यांनी त्यांच्या काव्यरचनेतील साधेपणा आणि खोली यावर भाष्य केले. प्रा. डी. आर. गायकवाड, भीमाशंकर शेटे यांनी सहवासातील आठवणी सांगितल्या. प्रशांत देशपांडे, मारुती कटकधोंड, आशुतोष नाटकर, डॉ. स्मिता पाटील, शरद कुमार एकबोटे, व्यंकटेश रंगम, विद्या काळे, अपर्णा जोशी, शांता येळंबक यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक आणि संचालन प्रा. ज्योतिबा काटे यांनी केले. यावेळी नाट्य व साहित्य परिषदेचे पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साल्हेर किल्ल्यावर यंदाचा प्रतापी संस्कार सोहळा

### हभप बंडातात्या कराडकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० मे -**

व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र यांच्या वतीने प्रत्येक वर्षी आयोजित केला जाणारा प्रतापी संस्कार सोहळा या वर्षी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील किल्ले साल्हेर गडाच्या पायथ्याशी युवकांसाठी प्रतापी संस्कार सोहळा होणार असल्याचे हभप. बंडातात्या कराडकर यांनी सांगितले.

सुमारे २६ वर्षांपासून युवकांना व्यसनमुक्त करण्यासाठी व्यसनमुक्त युवक संघ प्रयत्न करीत आहे. यंदा वीर सूर्याजीराव काकडे यांनी अतुलनीय लढवलेला किल्ला साल्हेर येथे हा सोहळा साजरा होत आहे. यामध्ये काकडा, प्रार्थना, सूर्यनमस्कार, योगासने, चर्चासत्र, व्यक्ती परिचय, शिवचरित्रगीत, सांघिक खेळ, स्पर्धा, ऐतिहासिक व्याख्यान, कीर्तन असे उपक्रम होणार असून हा कार्यक्रम दिनांक ११ मे ते १५ मे या कालावधीत होणार आहे.

११ मे रोजी शालेय जीवनात वाढत चाललेली व्यसनाधीनता यावर खुले चर्चासत्र होणार आहे. दादासाहेब नरळे व प्रा. धनंजय देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. किल्ले साल्हेर, शिवरायांचे आरमार, शिवधर्म या वेगवेगळ्या विषयावर प्रमोद भापकर यांचे सलग तीन दिवस दुपारी ३ ते ४ यावेळेत व्याख्यान होणार आहे. संध्याकाळी ५ ते ६.३० या वेळेत, युवक व आध्यात्म यावर आचार्य तुषार भोसले यांचे व्याख्यान होणार आहे. संध्याकाळी ७ ते ९ यावेळेत हभप भगीरथ महाराज काळे यांचे कीर्तन होणार आहे.

मंगळवार १२ मे रोजी किल्ले साल्हेर दर्शनासाठी युवकांना नेले जाणार आहे. दुपारी सांघिक खेळ आयोजित केले आहेत. सायंकाळी अविनाश शिरोडे यांचे अनंतातील एक धुलिकण या विषयावर व्याख्यान आहे. संध्याकाळी हभप संजय धोंडगे यांचे कीर्तन आहे. बुधवारी सकाळी युवा छावा संघटनेसाठी रिअल टू रियालिटी यावर युवक खुले चर्चासत्र होणार आहे. शंभु सूर्यवंशी व अतिश कोल्हे हे चर्चासत्राचे नेतृत्व करणार आहेत. सायंकाळी माझी शाळा हीच माझी कर्मभूमी.. या विषयावर केशव गावित व्याख्यान देणार आहेत. संध्याकाळी हभप.श्रावण महाराज अहिरे यांचे कीर्तन आहे.

गुरुवार दि. १४ मे रोजी मी असा घडलो यावर चर्चासत्र आहे. सायंकाळी ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार ॲड पोपटराव तांबे यांना प्रा. जी. बी. शहा यांचे हस्ते देणार आहे. प्रमुख उपस्थितीमध्ये सूर्याजी काकडे यांचे वंशज संतोष काकडे हे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रबंधू राजीव दीक्षित पुरस्कार बसवेश्वर झाडबुके, मेडशिंगी सांगोला यांना हभप बंडातात्या कराडकर यांच्याहस्ते देणार आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच यावेळी संघटनेतील युवकांना क्रीडारत्न, उद्योगरत्न, कृषिरत्न हे पुरस्कार सर्वश्री संताजी गोरे इंदापूर, बबन बोडेकर, संतोष जाधव, वाई यांना दिले जाणार आहेत. संध्याकाळी हभप कृष्णा महाराज चवरे, पंढरपूर यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार दि. १५ मे रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत हभप बंडातात्या कराडकर काल्याचे कीर्तन आहे. सर्व उपक्रमात राज्यभरातून संघटनेचे सर्व शिलेदार व वैष्णव उपस्थित राहणार असल्याचे संघटनेचे राज्य अध्यक्ष दिपक जाधव, उपाध्यक्ष नवनाथ मालुसरे, सचिव योगेश जाधव यांनी सांगितले.

# ब्रह्मपुरी परिसरात ८२ हजार रुपयांचा गांजा जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

### पाच जणांविरूध्द गुन्हे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० मे -**

मंगळवेढा-सोलापूर राष्ट्रीय मार्गावर ब्रह्मपुरी पुलाजवळ गांजा विक्रीस घेऊन जाणाऱ्या शाहूअली रतिलाल धावड (वय २७ रा. ब्रह्मपुरी) याला सोलापूरच्या स्थानिक गुन्हे शाखेने पकडून त्याच्याजवळून ८२ हजार ५६० रुपयांचा गांजासह एकुण १ लाख २७ हजार ६६० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.





शाहूअली रतिलाल धावड, सौरभ इंगोले( रा.औंढी), सूर्यकांत भाकरे, रा. पिसेवाडी, ब्रह्मदेव जुगदर रा. वाकी शिवनी, जब्बार हमजेखान मुल्ला रा. करगणी या पाच जणांविरुद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी शाहूआली धावड हा बेगम पूरवरुन ९ मे रोजी सायंकाळी ४.२५ वाजता ब्रह्मपुरी गावच्या पुढे ब्रिज सर्व्हिस रोड वरून गांजा घेऊन जाणार असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगताप यांना मिळाली. त्यांनी मार्गावर सापळा लावला असता आरोपी धावड म ोटरसायकलवर पाठीवर मोठी बॅग बांधून येत असताना दिसला. पोलिसांनी त्याला इशारा केला मात्र तो न थांबता तो पुढे निघाला. त्यानंतर पोलिसांनी त्याला पाठलाग करून पकडले. तपासणीदरम्यान पोलिसांना धावडकडील प्रवासी बॅगमध्ये चार किलो १२८ ग्रॅम वजनाचा म्हणजेच ८२ हजार ५६० रुपये किमतीचा गांजा सापडला. पोलिसांनी गांजासह मोटारसायकल, मोबाईल व गांजा असा एकुण १ लाख २७ हजार ६६० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

तीन महिन्यापासून आरोपी गांजा विक्री व्यवसाय करीत असल्याची माहिती समोर आली आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी तो गांजा विक्रीच्या तस्करीत अडकल्याची चर्चा होती. तो आरोपी सौरंभ इंगोले (रा.औंढी) याच्याकडुन गांजा घेऊन विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ही कामगिरी ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. संजय जगताप, अमित बाबर, सहाय्यक पोलिस निरीक्षक व पोलिस अंमलदार नीलकंठ जाधवर, सलीम बागवान, विरेश कलशेट्टी, जयवंत सादुल, राहुल दोरकर, हरीश थोरात, अन्वर आतार, सुनील पवार,बाळराजे घाडगे,राजेंद्र गवेकर आदींनी केली.

# फिजिओथेरपी बाहेरुन तर योग शरीराच्या आतून उपचार करतो

### डॉ. संदीप भागवत; शिवस्मारकमध्ये योग सेवा मंडळाच्या वतीने कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

फिजिओथेरपी ही शरीराच्या बाहेरुन शरीरातील व्याधी, वेदना किंवा व्यंग दूर करणारी उपचार पद्धती आहे, तर योगामध्ये बाह्य साधन न वापरता शरीरातल्याच गोष्टींचा वापर करून शरीर निरोगी व सुदृढ बनवता येते, असे प्रतिपादन फिजिओथेरपिस्ट डॉ. संदीप भागवत यांनी केले.

योग सेवा मंडळाच्या वतीने शिवस्मारक येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. सुरुवात दीपप्रज्वलन आणि महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. सुरुवातीला केवळ मसाज किंवा शेक देण्यापुरती मर्यादित असलेली फिजिओथेरपी आता विकसित



झाली आहे. डॉ. भागवत २५ वर्षांपासून सोलापुरात निरामय पुनर्वसन केंद्र चालवतात. तिथे जर्मनीहून आणलेली अत्याधुनिक यंत्रे वापरली जातात. सोलापूरसह पुणे व मुंबई येथेही त्यांच्या शाखा आहेत. या कार्यक्रमात डॉ. भागवत यांनी योग सेवा मंडळाच्या उपक्रम ांची प्रशंसा केली. संस्थेसोबत निरामय फिजिओथेरपी केंद्रामध्ये आरोग्यविषयक लोकांभिमुख कार्यक्रम घेण्याची घोषणा केली.

या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष संतोष सासवडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. मनमोहन भुतडा यांनी डॉ. भागवत यांचा परिचय करून दिला. यावेळी सोमनाथ चौगुले, मोहिते व डॉ. राधेश्याम अग्रवाल यांचा लग्नाच्या वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला योग प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. भागवत यांनी समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमासाठी सुभाष जोशी, प्रसाद चावरे, वैजनाथ देवगण, वासंती निंबाळकर, शारदा जोशी, सुनीता न्यामने यांनी परिश्रम घेतले.दत्तगुरु वेदपाठक यांनी आभार मानले.

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी; १९ वर्षांखालील जिल्हा निवड बुध्दिबळ स्पर्धा

### स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चषक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व सोलापूर चेस अकॅडमी तसेच चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या म ान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाखालील जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली.



मुलांच्या गटात अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू मानस गायकवाड, श्रेयस कुदळे, आदिराज म्हेत्रे, ओम राऊत, आयुष जानगवळी, श्रेयांश इंगळे, मयूर स्वामी, हिमांशू व्हनगावाडे, सार्थक राऊत, श्लोक चौधरी, देवदत्त पटवर्धन, नैतिक होटकर, युवराज गायकवाड, नागेश राजमाने, कृष्णराज पताले व सानिध्य जमादार यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत शानदार विजय मिळविला.

मुलींच्या गटात बार्शीची राष्ट्रीय खेळाडू सानवी गोरे, सृष्टी गायकवाड, अनन्या उलभगत तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त स्वराली हातवळणे, मनस्वी क्षिरसागर व संस्कृती जाधव यांनी आकर्षक खेळाचे प्रदर्शन करत विजयी सुरुवात केली.

छत्रपती शिवाजी प्रशाला व ज्युनिअर आणि सिनियर नाईट कॉलेज येथील राजर्षी शाहू सभागृहात सुरू असलेल्या या स्पर्धेत १०१ खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या चार मुले व चार मुलींची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्य निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धा अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडत असून उपस्थितांना अनेक प्रेक्षणीय लढती पाहण्याची संधी मि ळत आहे. विशेष म्हणजे सात वर्षीय उदयोन्मुख खेळाडूंनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले आहे.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन माजी म हापौर मनोहरपंत सपाटे यांनी पटावरील अश्वाची चाल करत केले. यावेळी स्पर्धेचे संयोजक विद्यापीठ सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य व स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. अरुण सोनकांबळे, डॉ. नागेश गायकवाड, प्रा. संतोष गवळी, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय खेळाडू दीक्षा कुलकर्णी हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील, प्रास्ताविक आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड तर आभार प्रा. संतोष गवळी यांनी मानले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा-राठी, प्रशांत पिसे, पद्मजा घोडके आदी काम पाहत आहेत.

### ३५ टक्के गुणांसह अनिकेत मगरचे लक्षवेधी यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० मे-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील प्रतापसिंह विद्यालयातील अनिकेत मगर



याला दहावी परीक्षेत सर्वच विषयात प्रत्येकी ३५ गुण मिळाले आहेत. सर्वच विषयात ३५ गुण मिळविण्याची ही एक अनोखी किमयाच त्याने करुन दाखवली आहे. त्याला मराठी, इंग्लिश, हिंदी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र या सर्वच विषयात ३५ गुण मिळाले आहेत. पिलीव केंद्रात खरेतर असे गुण मि ळण्याची पहिलीच वेळ असल्याचे बोलले जात आहे. अनिकेतला गुण कमी असले तरी त्याने हा दुर्मिळ योगायोग साधला आहे.


# रस्ता रुंदीकरण करून पथदिवे बसवा

### सदाशिव नगरमधील महिलांसह नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १० मे-**

बाजारतळ ते पालखी मुक्काम ठिकाणापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करावे व पथदिवे बसवावेत अशी मागणी सदाशिवनगरमधील महिला वर्गातून होत आहे. तसेच अन्यही कामे व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा शहराबाहेर मुक्कामाला असतो. शहरासह अनेक खेड्यातील नागरिक दर्शनासाठी येत असतात. बाजार तळ ते मुक्काम ठिकाणाचा रस्ता अपुरा असून या रस्त्यावर दोन्ही बाजूने पालखी सोहळ्यातील व्यापारी बसल्याने या रस्त्यावरून दर्शनासाठी जाण्या-येण्यासाठी महिलांना नाहक त्रास सहन करावा लागतो. बाजारतळापासून मुक्काम ठिकाणी जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस मोकळी जागा आहे. यापूर्वी या जागेत नगर पंचायत आपला कचरा टाकत होती. परंतु नगर पंचायतीने दुसरी जागा घेतल्याने याठिकाणी आता कचरा टाकत नाही. त्यामुळे ही जागा मोकळी आहे. या जागेत रस्त्याचे रुंदीकरण केल्यास रस्ता मोठा होणार आहे. त्यामुळे पालखी मुक्कामाच्या वेळी दोन्ही बाजूस व्यापाऱ्यांनी दुकाने टाकली तरी मध्ये मोठा रस्ता राहणार आहे. त्यामुळे महिलांना दर्शनास जाण्या- येण्यासाठी अडचण भासणार नाही. अरुंद रस्त्याचा फायदा घेत रोड रोमिओ त्याठिकाणी उभा राहून महिलांना त्रास देतात.



#### अरुंद रस्त्यामुळे महिलांना त्रास

रस्ता रुंद झाल्यास माऊलीच्या पालखीचे दर्शन घेणे सोपे होणार आहे. अरुंद रस्त्यामुळे या ठिकाणी गर्दी होते. महिलांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

**- नंदा पंचवाघ, नागरिक, माळशिरस**

#### नागरिकांसाठी सोयीस्कर नियोजन करणार

बाजारतळ ते पालखी मुक्काम ठिकाणी मुरूम टाकून सपाटीकरण करण्यासाठी पाठपुरावा करून नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊ.

**- सुमित जाधव, मुख्याधिकारी, नगर पंचायत माळशिरस**

# ‘देऊळ बंद-२’ चित्रपटाच्या टिझरचे इंगळे यांच्या हस्ते अनावरण

### अभिनेते मोहन जोशी, प्रविण तरडे यांची उपस्थिती

### २१ मे रोजी राज्यभरात होणार प्रदर्शित

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मे -**

दहा वर्षांपुर्वी श्री स्वामी समर्थांच्या अवतार कार्यावर आधारित देऊळ बंद हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. प्रेक्षकांनी त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्यामुळे देऊळ बंद २ या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाच्या टिझरचा अनावरण सोहळा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात झाला.

चित्रपटाचे दिग्दर्शक - अभिनेते प्रविण तरडे, अभिनेत्री स्नेहल तरडे, अभिनेते मोहन जोशी, निर्माते कैलाश वाणी, जयश्री वाणी, कैवल्य वाणी, जुईली वाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते ऑनस्क्रीन बटन दाबून टिझरचे अनावरण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी २१ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपट प्रदर्शित होणार असून त्यालाही चांगला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले आहे. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, मंदार महाराज पुजारी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, कोरिओग्राफर नंदकुमार जाधव, कुणाल मांजरेकर, चैतन्य दळवी, प्रद्युम्न जोशी, अभियंता नवनाथ बनकर, सुनिल नाईकवडी, सागर गोंडाळ, रमेश शिंदे, विपूल जाधव, श्रीकांत मलवे, सुनिल पवार, ओंकार महाडीक, अविनाश क्षीरसागर आदींसह चित्रपटाची संपूर्ण टीम व भाविक उपस्थित होते.



देऊळ बंद २ या चित्रपटाची टॅगलाइन ‘आता परीक्षा देवाची’ अशी आहे. पहिल्या भागात भक्ताची परीक्षा होती, आता देवाची परीक्षा आहे. थोडक्यात देऊळ बंद हे नाव श्रद्धा विरुध्द अश्रद्धा या संघर्षाचं प्रतीक आहे. देव नाकारणारा माणूस शेवटी देवाला शरण जातो हीच सिनेमाची थीम आहे.

**- महेश इंगळे, चेअरमन, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान**

#### स्वामींची व्यक्तिरेखा हा आशीर्वाद

मुळातच मी स्वामी भक्त असल्याने स्वामींची व्यक्तीरेखा साकारणं हा म ाझ्यासाठी खुप मोठा आशिर्वाद आहे. देऊळ बंद २ या चित्रपटात शेतकरी कुटूंबानं घेतलेली देवाची परीक्षा हा अद्भुत प्रसंग हाताळला आहे. स्वामी भक्तांना नक्कीच भावेल.

**- मोहन जोशी, अभिनेता, मुंबई,**

#### ‘देऊळ बंद’ चे ११ भाग काढणार

माझ्यासारख्या नास्तिक माणसाला स्वामींनी भक्तीमार्ग दाखवून माझे जीवन व संसार उभा केला. स्वामींच्या भक्तीपोटी देऊळ बंद या शीर्षकावर स्वामींच्या विविध भक्तीमार्गावर मी भविष्यात एकूण ११ भाग प्रदर्शित करणार आहे. त्याला स्वामी भक्त निश्चितच दाद देतील

**- प्रविण तरडे - दिग्दर्शक, पुणे**




## महत्त्वाचे

### झ्वेरेव्हची ब्लॉकवर मात



**रोम** : इटालियन ओपन टेनिस स्पर्धेत अॅलेक्झांडर झ्वेरेव्हने आपली सातत्यपूर्ण वाटचाल कायम राखली आहे. रविवारी रोममध्ये सुरू असलेल्या या मास्टर्स १००० स्पर्धेच्या चौथ्या फेरीत त्याने आपले स्थान निश्चित केले. यासाठी त्याने बेल्जियमच्या अलेक्झांडर ब्लॉकचा ६-१, ६-४ अशा फरकाने पराभव केला. एका आठवड्यापेक्षा थोड्याच अधिक कालावधीत झ्वेरेव्हने या २१ वर्षीय बेल्जियन खेळाडूला दुसऱ्यांदा पराभूत केले आहे. या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या माद्रिद ओपन २०२६ च्या उपांत्य फेरीतही त्याने ब्लॉकचा सरळ सेट्समध्ये पराभव केला होता. कॅस्पर रूडने जिरी लेहेकाविरुद्धचा आपला अपराजित विक्रम कायम राखत ६-३, ६-४ अशा विजयासह पुढील फेरीत प्रवेश केला. रोम स्पर्धेत तीन वेळा उपांत्य फेरी गाठणाऱ्या या नॉर्वेजियन खेळाडूचा पुढील सामना आता लॉरेन्झो मुसेटी किंवा फ्रान्सिस्को सेरुंडोलो यांच्यापैकी एकाशी होईल.

# उर्विलच्या खेळीने चेन्नईची झेप

### लखनौ सुपर जॉयण्ट्सवर ५ गड्यांनी विजय

◆ **चेन्नई, १० मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी दुपारच्या सत्रात येथील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात उर्विल पटेलने झळकावलेल्या सर्वात वेगवान अर्धशतकाच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने (सीएसके) लखनौ सुपर जायण्ट्सवर ४ चेंडू शिल्लक ठेवित ५ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या सलग तिसऱ्या विजयाबरोबरच सीएसकेने १२ गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे.

सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून आपल्या घरच्या मैदानावर प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर जोश इंग्लिसच्या ३३ चेंडूंतील ८५ धावांच्या आधारावर लखनौ सुपर जायण्ट्सने ८ गडी गमावून २०३ धावांपर्यंत मजल मारली आणि सीएसकेसमोर विजयासाठी २०४ धावांचे लक्ष्य ठेवले, ते त्यांनी १९.२ षटकांत ५ गडी गमावित गाठले. इंग्लिसची मोठी खेळी व्यर्थ ठरली.




जोश इंग्लिसने मिचेल मार्शच्या साथीने ७७ धावांची सलामी भागीदारी करून लखनौच्या डावाची झकास सुरुवात केली. मार्श (१०) अंशुल कम्बोजच्या गोलंदाजीला बळी पडला. मात्र त्यानंतर सीएसकेच्या गोलंदाजांनी लखनौला धक्के दिले. नूर अहमदने आपल्या मनगटी फिरकीने चांगली कामगिरी केली आहे. आणि ओव्हर्टनने आपल्या वेगवान गोलंदाजीने तीन बळी घेतले. निकोलस पूरन (१), कर्णधार ऋषभ पंत (१५) व एडन मार्कराम (६) हे नियमित अंतराने तंबूत परत गेले. नंतर अक्षत रघुवंशीच्या रुपाने ओव्हर्टनने आपला तिसरा बळी टिपला. तोपर्यंत लखनौने १२.१ षटकांत ५ बाद १३० धावांचा टप्पा गाठला होता. त्यानंतर शाहबाज अहमदने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत सहकारी हिम्मत सिंग (१७), मोहम्मद शमी व आवेश खान यांच्या मदतीने लखनौला २० षटकांत ८ ब ाद २०३ धावा रचून दिल्या. शाहबाज अहमदने २५ चेंडूंत ३ चौकार व तेवढेच षट्कार ठोकत नाबाद ४३ धावांची खेळी केली.

सीएसकेकडून जेमी ओव्हर्टनने ३८ धावांत ३ बळी, अंशुल कम्बोजने ४७ धावांत २ बळी, तर नूर अहमदने २४ धावांत एक बळी टिपला. अकील हुसेन व मुकेश चौधरीने एकही बळी न घेता धावा वाटण्याचेच काम केले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सीएसकेच्या संजू सॅमसन व ऋतुराज गायकवाडने ४५ धावांची सलामी भागीदारी केली. दिग्वेश राठीच्या फिरकीच्या जाळ्यात अडकण्यापूर्वी सॅमसनने १४ चेंडूंत २८ धावांची भर घातली. पुढे गायकवाड व उर्विल पटेलची जोडी खेळपट्टीवर चांगलीच रमली. गायकवाडच्या सहकार्यामुळे उर्विलने अवघ्या १३ चेंडूंत आपले जलद अर्धशतक पूर्ण केले, मात्र त्यानंतर शाहबाज अहमदने त्याला आवेश खानकडून झेलबाद केले. उर्विलने अवघ्या २३ चेंडूंत २ चौका व तब्बल ८ षट्कारांच्या मदतीने ६५ धावांची देखणी खेळी केली. पुढे गायकवाड अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असताना तो सुद्धा शाहबाज अहमदच्या गोलंदाजीला बळी पडला. ऋतुराज गायकवाडने २८ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ४२ धावांचे योगदान दिले व संघाला १२.५ षटकांत ३ बाद १४९ धावांवर पोहोचवले. पुढे कार्तिक शर्मा (२०) व डेवाल्ड ब्रेव्हिसने (१०) संयमाने खेळ करत चेन्नईच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या. शिवम दुबे (१५) व प्रशांत वीरने (१७) नाबाद खेळी करत सीएसकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. लखनौकडून दिग्वेश राठी व शाहबाज अहमदने प्रत्येकी २ बळी, तर आवेश खानने एक बळी टिपला.

**मैदान कर्मचाऱ्यांचे कौतुक**

दुपारी सामना सुरू होण्यापूर्वी पाऊस आला होता. पावसामुळे सामन्याच्या तयारीत अडथळा आला असला तरी, मैदान कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य चोखपणे बजावून सामन्यासाठी मैदान सुज्ज केले. त्यामुळे मैदान कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले. त्यामुळे सलामीवीर जोश इंग्लिसने सहज धावा केल्या व आम्ही दोनशेच्या वर धावा काढू शकलो, अशी भावना लखनौ संघ व्यवस्थापनाने व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

## उर्विल पटेलची सर्वांत वेगवान आयपीएल अर्धशतकाशी बरोबरी

◆ **चेन्नई, १० मे**

चेन्नई सुपर किंग्सचा फलंदाज उर्विल पटेलने आयपीएलच्या इतिहासातील सर्वात जलद अर्धशतकाच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. रविवारी चेन्नई येथे लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध खेळताना त्याने अवघ्या १३ चेंडूंमध्ये हा टप्पा गाठला. उर्विल पटेलने यशस्वी जयस्वालच्या विक्रमाशी बरोबरी केली.

उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या उर्विलने आयपीएलमध्ये सर्वात जलद अर्धशतक ठोकण्याच्या बाबतीत भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या पंक्तीत स्थान मिळविले आहे. जयस्वालने २०२३ मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळताना कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध हा विक्रम प्रस्थापित केला होता.

आयपीएलच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात जलद अर्धशतक (चेंडूंच्या संख्येनुसार - १४) ठोकण्याचा विक्रम के.एल. राहुल, पॅट कमिन्स आणि रोमारियो शेफर्ड यांच्या नावावर संयुक्तपणे जमा आहे.

**लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध पटेलची स्फोटक खेळी**

तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या उर्विलने, आवेश खानच्या गोलंदाजीवर सलग तीन षट्कार ठोकत आपल्या खेळीची धडाकेबाज सुरुवात केली. त्यानंतर त्याने डावातील सहावे षटक टाकणाऱ्या दिग्विजय राठीच्या गोलंदाजीवर २५ धावा कुटल्या; यात त्याने आणखी तीन षट्कार आणि एका चौकाराचा समावेश होता.

त्याने भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीलाही लक्ष्य केले आणि त्याच्या डोक्यावरून एक जोरदार फटका मारला, तसेच मिड-विकेटच्या दिशेने आणखी एक उत्तुंग षटकार ठोकला. त्यानंतर, डावातील आपल्या १३व्या चेंडूवर ऑफ-साइडला एक धाव घेत त्याने आपले अर्धशतक पूर्ण केले.

**वडिलांना समर्पित**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये गुजरात संघाचे प्रतिनिधित्व करणारा आणि इंडिया-ए संघाकडूनही खेळलेला २७ वर्षीय उर्विलने सर्व षट्कार सरळ रेषेत मारले; यासाठी त्याने प्रामुख्याने लॉन्ग-ऑन आणि मिड-विकेट या क्षेत्रांना लक्ष्य केले होते.

उर्विलने आपली ही कामगिरी आपल्या वडिलांना समर्पित केली. त्याने आपल्या खिशातून कागदाचा एक तुकडा बाहेर काढला, ज्यावर 'हे तुझ्यासाठी आहे, बाबा' असे लिहिलेले होते. (वृत्तसंस्था)

# पंजाब किंग्सची कामगिरी सुधारण्यावर नजर

◆ **धर्मशाला, १० मे**


१९ व्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये सोमवारी धर्मशालाच्या नयनरम्य वातावरणात पजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आयपीएलच्या निर्णायक टप्प्यावर आपली कामगिरी अचानक खालावत असताना, हा घसरता आलेख रोखण्यासाठी पंजाब किंग्स संघ सर्वस्व पणाला लावेल, तिकडे दिल्ली कॅपिटल्ससुद्धा वाईट फॉर्मशी संघर्ष करीत आहे.

आयपीएलच्या गुणतालिकेत सध्या पंजाब किंग्स १३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, तर दिल्ली कॅपिटल्स ८ गुणांसह आठव्या स्थानावर आहे.

१७ मे पर्यंत धर्मशालेच्या स्टेडियमवर होणाऱ्या तीन सामन्यांसह आपल्या घरच्या मैदानांवरील सामन्यांचा शेवट करताना पंजाब किंग्स संघ आपल्या मागील तीन साखळी सामन्यांमधील पराभवांनंतर



श्रेयस अय्यर



अक्षर पटेल

खेळाच्या सर्वच विभागांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील असेल. काही काळापूर्वी पंजाब किंग्स हा स्पर्धेतील एकमेव अजिंक्य आणि क्रमवारीतील अव्वल संघ होता, परंतु आता पंजाबला आपली स्थिती सुधारण्यासाठी खेळाच्या मूलभूत बाबी पुन्हा एकदा नीट जुळवून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

हैदराबादमधील सामन्यात पंजाब किंग्सचे क्षेत्ररक्षण अत्यंत सुमार होते; अर्शदीप सिंगच्या नेतृत्वाखालील वेगवान गोलंदाज मोठ्या प्रमाणात धावा देत आहेत, तर दुसरीकडे प्रियांश आर्या आणि प्रभसिमरन सिंग या सलामीच्या जोडीकडून सुरुवातीला सहजतेने धावा निघत होत्या, त्या आता पूर्णपणे थांबल्या आहेत.

**पंजाबला प्ले-ऑफसाठी दोन विजयांची गरज**

श्रेयस अय्यरने पंजाब किंग्सचे नेतृत्व आघाडीवरून केले आहे. प्ले-ऑफमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी अजूनही किमान दोन विजयांची आवश्यकता आहे. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पंजाबने जसे यश मिळविले, तसेच यश उत्तरार्धातही मिळवावे, अशी त्याची इच्छा आहे.

**दिल्ली कॅपिटल्सचे लक्ष भविष्यावर**

दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सने आपल्या गत सहा सामन्यांपैकी पाच सामने गमावले आहेत, त्यामुळे ते गुणतालिकेत तळाच्या स्थानाकडे ढकलले गेले आहेत; परिणामी, त्यांचे लक्ष आतापासूनच पुढील हंगामावर केंद्रित झाले आहे.

दोन्ही संघांसमोरील आव्हाने

घरच्या मैदानावर या संघांची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली आहे; त्यामुळेच, पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यासाठी मैदानाचे ठिकाण बदलत असल्याचा त्यांना नक्कीच दिलासा वाटेल.

संघाचा प्रमुख फिरकी गोलंदाज कुलदीप यादव याची साधारण कामगिरी त्यांच्या अडचणींमध्ये भर घालणारी ठरली आहे, तर मिचेल स्टार्कचा संघात समावेश होणे कदाचित खूप उशिरा घडलेली घटना ठरू शकते. पंजाब किंग्जप्रमाणेच, क्षेत्ररक्षणानेही या संघाला दगा दिला आहे. (वृत्तसंस्था)

> **आजचा सामना**
>
> पंजाब किंग्स वि. दिल्ली कॅपिटल्स
>
> **स्थळ** : हिमाचल प्रदेश रक्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाला
>
> **वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# भारतीय महिलांचा रिकर्व्ह सांघिकमध्ये सुवर्णभेद

### तिरंदाजी विश्वचषक

◆ **शांघाय, १० मे**

रविवारी शांघाय येथे झालेल्या तिरंदाजी विश्वचषकाच्या दुसऱ्या टप्प्यात दीपिका कुमारी, अंकिता भाकत आणि किशोरवयीन कुमकुम मोहोड या भारतीय त्रिकुटाने तणावपूर्ण शूट-ऑफमध्ये संयम राखत यजमान चीनवर मात केली आणि महिलांच्या रिकर्व्ह सांघिक सुवर्णपदकावर नाव कोरले.

अस्थिर निकालांनी गाजलेल्या अंतिम सामन्यात चार सेटचा निर्धारित वेळ ४-४ असा बरोबरीत सुटल्यानंतर झालेल्या शूट-ऑफमध्ये भारताने यजमान संघावर ५-४ (२८-२६) असा निसटता विजय मिळविला.



सुवर्णपदकाचे मानकरी अंकिता भाकत, दीपिका कुमारी व कुमकुम मोहोड

**सिमरन कौरला धक्का**

सिमरनजीत कौरला स्पर्धेत एक मोठा धक्का बसला. उपांत्य फेरीत सिमरनला दक्षिण कोरियाच्या जागतिक क्रमवारीत अव्वल आणि अंतिम विजेती ठरलेल्या कांग चेयॉन्गकडून सरळ सेट्समध्ये पराभव पत्करावा लागला, तर कांस्यपदकासाठीच्या प्ले-ऑफमध्ये ती आणखी एक कोरियन खेळाडू, जांग मिन्हीकडून पराभूत झाली.

अशाप्रकारे भारताने दोन पदकांसह आपल्या स्पर्धेचा शेवट केला, यात एक सुवर्ण आणि एक कांस्यपदकाचा समावेश आहे. शनिवारी साहिल जाधवने पुरुषांच्या वैयक्तिक कम्पाऊंड प्रकारात मिळविले. हा विजय विशेषतः अधिक गोड होता, कारण त्याआधी उपांत्य फेरीत भारताने विक्रमी १० वेळा ऑलिम्पिक विजेत्या दक्षिण कोरियाला पराभवाचा धक्का देत २०२१ नंतरचे पहिले विश्वचषक महिला सांघिक सुवर्णपदक पटकावले.

**भारताच्या विजयातील महत्त्वाचे क्षण**

२०२१ मध्ये ग्वाटेमाला सिटी आणि पॅरिस येथे विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघांचा भाग असलेल्या दीपिकाच्या नावावर, २०१० पासून आतापर्यंत विश्वचषकातील सांघिक प्रकारातील सात सुवर्णपदके जमा झाली आहेत. (वृत्तसंस्था)

### केरळ ब्लास्टर्सचा मोहम्मदन स्पोर्टिंगवर ३-१ ने विजय

**कोची** : केरळ ब्लास्टर्स एफसीने रविवारी येथे झालेल्या सामन्यात उत्तरार्धात वर्चस्वपूर्ण खेळ करत मोहम्मदन स्पोर्टिंगवर ३-१ असा विजय मिळवला आणि इंडियन सुपर लीगमध्ये आपली अपराजित मालिका पाच सामन्यांपर्यंत वाढवली.महितोष रॉयने (४२व्या मिनिटाला) पाहुण्या संघाला काही काळासाठी आघाडी मिळवून दिल्यानंतर, फ्रान्सिस्को फ्युइलासियर (४४व्या मिनिटाला), व्हिक्टर बर्टोमेउ (५८व्या मिनिटाला) आणि श्रीकुट्टन एम एस (७४व्या मिनिटाला) यांच्या गोलांनी यजमान केरळ ब्लास्टर्स संघाला तीनही गुण मिळवून दिले. या निकालामुळे अॅशले वेस्टवूडचा संघ १२ सामन्यांतून १४ गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर पोहोचला आहे, तर मोहम्मदन एससी ११ सामन्यांतून केवळ तीन गुणांसह तळाशीच आहे. मेहराजुद्दीन वाडू संघाचे भवितव्य आता चेन्नईयिन एफसीच्या निकालावर अवलंबून आहे, कारण चेन्नईयिनला एक गुण जरी मिळाला, तरी मोहम्मदन एससी पुढील हंगामासाठी इंडियन फुटबॉल लीगमध्ये खाली घसरण्याची शक्यता आहे.

### टी-२० विश्वचषकात बांगलादेश संघाचे नेतृत्व निगार सुलतानाकडे



**ढाका** : बांगलादेशने रविवारी आगामी आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी आपला १५-सदस्यीय संघ जाहीर केला. अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज निगार सुलताना ज्योती पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व करेल. या जागतिक स्पर्धेत सातव्यांदा सहभागी होण्याच्या तयारीला लागलेल्या बांगलादेश संघाने, फिरकी गोलंदाज नाहिदा अख्तरची उपकर्णधारपदी निवड केली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ ग्लोबल क्वालिफायर स्पर्धेतील दमदार कामगिरीनंतर, हा संघ पूर्ण आत्मविश्वासाने स्पर्धेत उतरत आहे. बांगलादेश संघः निगार सुलताना ज्योती (कर्णधार), नाहिदा अख्तर (उपकर्णधार), शर्मिन अख्तर सुप्ता, शोभना मोस्तारी, शोर्ना अख्तर, रितू मोनी, राबेया खान, फहिमा खातून, फरिहा इस्लाम त्रिस्ना, मारुफा अख्तर, संजिदा अख्तर मेघला, सुलताना खातून, दिलारा अख्तर, जुवैरिया फेरदौस आणि ताजनहार.

## विश्वचषक नेमबाजीत नीरू धांडा, विवान कपूरला कांस्यपदक

◆ **अल्माटी, १० मे**

रविवारी कझाकस्तानमधील अल्माटी येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक शॉटगन स्पर्धेत नीरू धांडा आणि विवान कपूर या जोडीने ट्रॅप मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक जिंकून भारताच्या मोहिमेचा सकारात्मक शेवट केला.



**भारतीय संघाचे पहिले विश्वचषक पदक**

हे पदक नीरू आणि विवान यांचे ऑलिम्पिक प्रकारातील पहिले आयएसएसएफ विश्वचषक पदक होते आणि गत वर्षी मिश्र सांघिक ट्रॅपचा ऑलिम्पिक कार्यक्रमात समावेश झाल्यापासून भारताचे हे दुसरे पदक होते.

अंतिम फेरीत नीरू व विवानने पहिल्या ३० पैकी २४ लक्ष्ये भेदली आणि इटलीची अव्वल जोडी सिल्व्हाना स्टँको व माउरो डी फिलिपिस यांच्याशी बरोबरी साधूनही, पात्रता फेरीत रौप्यपदक विजेत्या इटालियन जोडीनंतर दुसऱ्या स्थानी राहिल्याने त्यांना अधिक चांगल्या पदकापासून वंचित राहावे लागले.

**चीन तैपेईला सुवर्णपदक**

चीन तैपेईच्या कुन-पी यांग आणि वान-यू लिऊ यांनी अंतिम फेरीत ३६ गुणांच्या विश्वविक्रमी स्कोअरसह दुसरे विश्वचषक सुवर्णपदक जिंकले. विवान व नीरूने पात्रता फेरीत १४३ गुण मिळवले होते, आणि ते पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती सिल्व्हाना व या स्पर्धेतील माजी विश्वविजेता मौरो यांच्यापेक्षा केवळ दोन गुणांनी मागे राहिले. (वृत्तसंस्था)

## राष्ट्रीय मानांकन स्पर्धेला हरयाणाच्या कुस्तीपटूंचा उत्तम प्रतिसाद

◆ **गोंडा, १० मे**

सध्या येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धेत हरयाणाच्या कुस्तीपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे, असे भारतीय कुस्ती महासंघाचे (डब्ल्यूएफआय) अध्यक्ष संजय सिंह यांनी रविवारी सांगितले.

महासंघ राज्याविरुद्ध कोणताही पक्षपात करीत नाही, असेही ते म्हणाले. तसेच स्पर्धेच्या ठिकाणी वापरलेल्या सिरिंज सापडल्याने भारतीय कुस्ती अजूनही डोपिंगच्या गंभीर समस्येचा सामना करत असल्याचेही त्यांनी मान्य केले.

या तीन दिवसीय स्पर्धेसाठी सुमारे १,४०० कुस्तीपटूंनी नोंदणी केली असून, त्यापैकी जवळपास ८० टक्के कुस्तीपटू देशातील कुस्तीचे पारंपरिक केंद्र असलेल्या हरयाणाचे आहेत.

रविवारी येथे पुरुषांच्या फ्रीस्टाइल प्रकारात दिवसभरात नियोजित असलेल्या ५९३ लढतींमध्ये तब्बल ६५० कुस्तीपटू सहभागी होत आहेत.

राष्ट्रीय स्पर्धेचे महत्त्व

राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धा ही एक महत्त्वाची देशांतर्गत स्पर्धा आहे, कारण यातून राष्ट्रीय शिबिरे आणि भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निवडीचा मार्ग निश्चित होतो. तसेच, क्रमवारीमध्ये मागे पडलेल्या प्रस्थापित खेळाडूंना पुन्हा आपले स्थान मिळवण्याची ही एक संधी असते. (वृत्तसंस्था)

## धोनी चेन्नईच्या विजयाची लय बिघडवू इच्छित नाही : कुंबळे

◆ **चेन्नई, १० मे**

अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज एम.एस. धोनी पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी कठोर परिश्रम करत असला, तरीही लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या सामन्यात तो चेन्नई सुपर किंग्सकडून कदाचित खेळणार नाही; कारण पाच वेळा विजेतेपद पटकावलेल्या या संघाची विजया यशस्वी सांगड बिघडवू इच्छित नाही, असे मत : भारताचा माजी कर्णधार अनिल कुंबळेने व्यक्त केले.

हा असा संघ आहे जो सातत्यावर ठाम विश्वास ठेवतो आणि आपल्या विजयी एकादशमध्ये क्वचितच बदल करतो, असे कुंबळे सामन्यापूर्वी म्हणाला.

हा अशा प्रकारचा संघ आहे ज्यांना आपली विजयाची मालिका खंडित झालेली आवडत नाही. ते आपल्या विजयी सांगडीमध्ये फारशी छेडछाड करत नाहीत आणि ते आपल्या खेळाडूंना खंबीर पाठिंबा देण्यावर विश्वास ठेवतात, असे कुंबळेने सांगितले.

धोनी पडद्याआड राहून अतिरिक्त मेहनत घेत आहे, यात सराव सत्रांदरम्यान फलंदाजी आणि यष्टीरक्षणासाठी बराच वेळ देण्याचा समावेश आहे, असे भारताच्या या माजी फिरकीपटूने म्हटले आहे. सध्या, एम.एस. धोनी नेट्समध्ये खूप फलंदाजी करीत आहे. तो नेट्समध्ये यष्टिरक्षणाचाही सराव करीत आहे, ही अत्यंत आश्चर्यकारक बाब आहे; कारण तो सहसा नेट्समध्ये यष्टीरक्षण करणारा खेळाडू नाही. तो सध्या तसे करीत आहे आणि पूर्णपणे तंदुरुस्त होऊन मैदानात परतण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहे, असे त्याने नमूद केले. (वृत्तसंस्था)

# तिलक वर्माचे अर्धशतक, मुंबई ७ बाद १६६

◆ **रायपूर, १० मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या आयपीएल सामन्यात भुवनेश्वर कुमारने डावाच्या प्रारंभी तीन जबरदस्त हादरे दिल्यानंतर तिलक वर्माने झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर मुंबई इंडियन्सने २० षटकांत ७ बाद १६६ धावांचा टप्पा गाठला. त्यामुळे आता आरसीबीसमोर विजयासाठी १६७ धावांचे लक्ष्य राहिले.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित बंगळुरूच्या गोलंदाजांनी विशेषतः मध्यम गती गोलंदाज भुवनेश्वर कुमारने अचूक मारा करीत मुंबई इंडियन्सच्या अव्वल फळीला खिंडार पाडले. भुवनेश्वरने पहिल्याच षटकात



भुवनेश्वर कुमारचे ४ बळी

रायन रिकेल्टनला (२) पाटीदारकडून झेलबाद केले, तर तिसऱ्या षटकादरम्यान त्याने रोहित शर्माला (२२) जितेश शर्माकडून व हंगामी कर्णधार सूर्यकुमार यादवला (०) विराट कोहलीकडून झेलबाद केले. मुंबई इंडियन्सची ३ षटकांत ३ बाद २८ धावा अशी स्थिती झाली, मात्र त्यानंतर नमन धीर व तिलक वर्माने



तिलक वर्मा-नमन धीरने डाव सावरला : ८२ धावांची भागीदारी

बंगळुरूच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना केला व आपल्या संघाचा डाव सावरला.

या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ८२ धावांची भागीदारी करत मुंबईला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला, याचवेळी रसिख खानने नमन धीरचा त्रिफळा उडविला. नमन धीरचे थोडक्यात अर्धशतक हुकले, त्याने ३२ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ४७ धावांची खेळी केली. तिलक वर्माला साथ देण्यात आलेल्या विल जॅक्सला (१०) रोमारिओ शेफर्डने बाद केले. तिलक वर्माने राजा बावाच्या साथीने अर्धशतक साजरे केले, परंतु याचदरम्यान भुवनेश्वर कुमारने तिलकच्या रुपाने आपला चौथा बळी मिळविला. त्यामुळे मुंबईची धावगती कमी झाली. तिलक वर्माने ४२ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ५७ धावांची खेळी केली व संघाला १८ षटकांत १५५ धावांचा टप्पा गाठून दिला. नंतर जोश हेझलवूडने राजा बावाला (१६) बेथेलकडून झेलबाद केले. कॉर्बिन बॉश (५) व दीपक चहरने (१) नाबाद खेळी करत मुंबई इंडियन्सला २० षटकांत ७ बाद धावा रचून दिल्या.

आरसीबीकडून भुवनेश्वर कुमारने ४ बळी, जोश हेझलवूड, रसिख खान व रोमारिओ शेफर्डने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# भारतीय भारोत्तोलक सज्ज

### आशियाई भारोत्तोलन स्पर्धा

◆ **गांधीनगर, १० मे**

येथे सोमवारपासून होणाऱ्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत आपली छाप पाडण्यासाठी भारतीय भारोत्तोलक सज्ज झाले आहे. राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धांच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून ते या स्पर्धेचा उपयोग करणार आहेत तसेच ते आगामी वर्षासाठी आपली कामगिरीची गती वाढवण्याचा प्रयत्न करतील. आंतरराष्ट्रीय स्तरावर पात्रता गुण आणि कामगिरीची गती मिळवू पाहणाऱ्या खेळाडूंसाठी या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आशियातील बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांसमोर आपली छाप पाडण्यासाठी भारत



आपला एक मोठा संघ या स्पर्धेत उतरवत आहे, यात अनुभवी खेळाडू आणि नवोदित नावांच्या मिश्रणावर भर देण्यात आला आहे. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू या स्पर्धेत सहभागी होणार नाही, कारण ती सध्या खांद्याच्या दुखापतीतून सावरत आहे. तिच्या अनुपस्थितीत, राष्ट्रकुल पदक विजेते बिंद्याराणी देवी, हरजिंदर कौर आणि लवप्रीत सिंग यांसारख्या अनुभवी खेळाडूंवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. भारताने या स्पर्धेसाठी १६ सदस्यांचा संघ निवडला आहे, यामध्ये पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांत प्रत्येकी आठ खेळाडूंचा समावेश आहे; याशिवाय यजमान देश म्हणून भारताला आणखी चार खेळाडूंना सहभागी करून घेण्याची संधी मिळाली आहे. या संघात अनेक उदयोन्मुख खेळाडूंचाही समावेश आहे. या आठवडाभर चालणाऱ्या स्पर्धेदरम्यान, बेदाब्रत भराली आणि ज्ञानेश्वरी यादव यांसारख्या आश्वासक युवा खेळाडूंच्या कामगिरीकडे सर्वांचे विशेष लक्ष असेल. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...




# अभिसिद्ध संघास विजेतेपद

### अभिसिध्द पेरेंट्स लीग : अटीतटीच्या सामन्यात टाइम्स संघाचा पराभव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

पार्क मैदान येथे झालेल्या अभिसिद्ध पेरेंट्स लीगच्या चुरशीच्या अंतिम सामन्यात अभिसिद्ध संघाने शानदार विजय मिळवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अभिसिद्ध विरुद्ध टाइम्स यांच्यात झालेल्या या सामन्यात अभिसिद्ध संघाने प्रथम फलंदाजी करताना १५ षटकांत ९ बाद १०९ धावा उभारल्या. यामध्ये कुणाल झवर याने ३२ धावांचे तर अतुल परदेशी याने १६ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. टाइम्स संघाकडून अयुब पट्टेवाले, प्रविण यादव (३ बळी) आणि आनंद खमीतकर (२ बळी) यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. विजयासाठी ११० धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या टाइम्स संघाला अभिसिद्धच्या अचूक गोलंदाजीसमोर १५ षटकांत ७ बाद ९६ धावांपर्यंतच मजल मारता आली. टाइम्सकडून प्रविण यादव याने २१ आणि प्रतीक बाकळे याने १५ धावा केल्या, मात्र अजय माळी आणि अतुल परदेशी (२ बळी) यांच्या भेदक माऱ्यामुळे अभिसिद्ध संघाने १३ धावांनी विजय मिळवला. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास जयंत प्रजापती, नंदकुमार टेळे, श्री. मेहता , आजीवन वाटर्सचे सिईओ डॉ. अनुज घोरपडे, सूर्यकांत खंडेलवाल, सोहेल मुन्शी, अतिक शेख, मकरंद बसवंती, नीरज वेलानी, काका सुरवसे आणि चिराग वेलानी या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. विजेत्या अभिसिद्ध संघाला २१ हजार रुपये व ट्रॉफी, तर उपविजेत्या टाइम्स संघाला १५ हजार रुपये व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. वैयक्तिक कामगिरीमध्ये प्रविण यादव याने 'मालिकावीर'चा बहुमान पटकावला, तर काशिनाथ कोळी 'बेस्ट बॅट्समन' आणि अयुब पट्टेवाले 'बेस्ट बॉलर' ठरले. अंतिम सामन्यात चमकलेल्या कुणाल झवर याला 'सामनावीर' म्हणून सन्मानित करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नवीन माने, अजय माळी, अतुल परदेशी, सुरज शाह आणि प्रसाद शावांतुल यांनी परिश्रम घेतले.

# कुमार-मुली जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा वाडीकुरोलीत

**सोलापूर, दि. १० मे-**

कुमार-मुली जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथील वसंतराव काळे प्रशालेच्या कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर मैदानावर १६ व १७ मे रोजी होईल. ही स्पर्धा सोलापूर सोलापूर खो खो म्युचर असोसिएशन यांच्या मान्यतेने के. के. स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे. या स्पर्धेतून सोलापूर येथे ३ ते ६ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेसाठी जिल्ह्याचे संघ निवडण्यात येणार आहेत.

१६ मे ला मुलींच्या गटाचे तर १७ मेला कुमार गट (मुले) स्पर्धा होतील. या स्पर्धेसाठी कुमार-मुली १८ वर्षाखालील म्हणजेच २५ ऑक्टोंबर २००८ रोजी अथवा त्यानंतर जन्मलेले असावेत. तसेच कुमार-मुलीसाठी वय (वर्ष) उंची (से.मी.) वजन (कि. ग्रॅ.) २५० असे मूल्यांकन असेल. कुमार-मुली खेळाडू जास्तीत जास्त बी.ए., बी.कॉम., बी.एससी. प्रथम वर्ष अथवा त्याखालील वर्गात शिकत असला पाहिजे. जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जे कुमार-मुली दहावी उत्तीर्ण आहेत त्यांनी त्यांचे दहावीच्या परीक्षेचे हॉल तिकीट व जे १२ उत्तीर्ण व त्याखालील इयत्तेत आहेत, त्यांनी दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व त्याखालील वर्गातील शिकत असलेल्या खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड दाखवणे बंधनकारक आहे. संबंधित कुमार व मुली हे हे सोलापूर जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयात शिकणारे असले पाहिजेफ प्रवेश शुल्क भरल्याशिवाय भाग्यपत्रिकेत संघाचे नाव समाविष्ट करण्यात येणार नाही याची इच्छुक संघानी नोंद घ्यावी. संलग्न जिल्हा संघानी संघटनेचे खजिनदार श्रीरंग बनसोडे (मो. ९६९९१ ७५७९८) यांच्याकडे प्रवेश शुल्कासह नोंदणी करावी, असे आवाहन सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव उमाकांत गायकवाड यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### ज्येष्ठ संघ स्वयंसेवक सुधाकर कुलकर्णी



**सोलापूर, दि. १० मे-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि सरस्वती मंदिर प्रशालेचे माजी शिक्षक सुधाकर केशवराव कुलकर्णी (मिरीकर) तथा एस. के. कुलकर्णी सर यांचे शनिवार दिनांक ९ मे रोजी दुपारी दोन वाजता बंगळुरू येथे वृद्धापकाळाने निधन झाले. निधन समयी ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे, भाऊ, भावजय असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा रविवार दि. १० मे रोजी सकाळी साडेआठ वाजता सोलापुरातील सुपर मार्केट परिसरातील जुनी मिल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, आहेरकर बजाजच्या पाठीमागील निवासस्थानापासून सकाळी साडेआठ वाजता निघेल. एस.के. कुलकर्णी हे बालपणापासून संघ स्वयंसेवक होते. आणीबाणीच्या कालावधीत त्यांनी नाशिक, येरवडा आदी ठिकाणी कारावास भोगला होता. त्यांनी सावरकरांचे जीवनावर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. विज्ञान शिक्षक म्हणून ते विद्यार्थी प्रिय होते. आकाशवाणी आणि दूरदर्शन वरून त्यांनी व्याख्यानेही दिली होती. आदर्श शिक्षक म्हणून अनेक पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले होते.

### प्रमोद खिस्ते



**पंढरपूर, दि. १० मे-**

येथील प्रसिध्द केटरर्स तथा उद्योजक प्रमोद उर्फ (नंदू) भगवान खिस्ते (६४, रा. लक्ष्मीनगर, टाकळी रोड) यांचे शनिवारी ०९ मे रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. येथील वैकुंठ स्मशानभूमीत संध्याकाळी त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (कै.) खिस्ते यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून असा परिवार आहे. येथील प्रणव व डॉ. पार्थ खिस्ते यांचे ते वडील होते.

# अधिकमासानिमित्त करमाळ्यात शिव महापुराण कथा सप्ताह

## स्नेहगंगा शृंगारे माई आळंदीकर यांच्या सुमधुर वाणीतून शिवकथांचा ज्ञानयज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १० मे -**

अधिकमासानिमित्त करमाळा शहरात भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांची अनोखी पर्वणी अनुभवायला मिळणार आहे. दि. १५ मे ते २१ मे या कालावधीत भव्य शिव महापुराण कथा ज्ञानयज्ञ सप्ताह होत आहे. स्नेहगंगा शृंगारे माई आळंदीकर यांच्या सुमधुर वाणीतून शिवकथांचा ज्ञानयज्ञ मांडला जाणार असल्याचे संयोजक श्रेणीक खाटेर व रंजना कुरलकर यांनी सांगितले.

श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती संत गजानन महाराज भक्त परिवार यांच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. शुक्रवार दि. १५ मे ते गुरुवार दि. २१ मे या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत हा धार्मिक ज्ञान यज्ञ पार पडणार आहे. करमाळ्यातील संत गजानन महाराज मंदिर एसटी कॉलनी श्रीदेवीचा माळ रोड करमाळा येथे हा सप्ताह होत आहे. कार्यक्रमासाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून करमाळा नगरी शिवमय झाल्याचे दिसून येत आहे.

शिवमहापुराणातील विविध प्रसंग, भगवान शंकरांचे चरित्र, भक्ती, अध्यात्म, संस्कार आणि जीवनमूल्यांचे प्रभावी निरूपण स्नेहगंगा शृंगारे माई आळंदीकर आपल्या अभ्यासपूर्ण शैलीतून करणार आहेत. सात दिवस चालणारा हा कथा सप्ताह भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरणार आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित नियोजन बैठकीत कार्यक्रम पत्रिका प्रकाशन व मंडप पूजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. मुख्य यजमान श्रेणिक खाटेर, संगीता खाटेर तसेच रंजना कुरलकर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. बैठकीत कथा सप्ताहाचे नियोजन, मंडप व्यवस्था, भक्तांसाठी सुविधा, प्रसाद वितरण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमासाठी समितीच्या सदस्यांनी जबाबदाऱ्या निश्चित केल्या. यावेळी सर्वांनी शिवपुराण महाकथा भव्य दिव्य स्वरूपात करण्याचा मानस व्यक्त केला आहे .

भाजपचे ज्येष्ठ नेते विठ्ठल भणगे, जगदीश शिगची, कविता नीळ आटोळे यांनी धार्मिक उपक्रम समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करतात, असे मत व्यक्त केले. दरम्यान, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार संघटनेच्या करमाळा तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दिनेश मुथ्था यांचा विशेष सत्कार करण्यात आला. श्री संत गजानन महाराज भक्त परिवार व समितीच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ आणि गणपतीची मूर्ती देऊन गौरविण्यात आले. हा सत्कार मुख्य यजमान श्रेणिक खाटेर यांच्या हस्ते केला.

नियोजन बैठकीस रवींद्र विद्वत, जगदिश शिगची, प्रदीप देवी, नारायण पवार, सुरेश चव्हाण, कचरू मंडालेचा, अर्जुन गंधे, गणेश बोरा, शंकर रासकर, दिनेश मडके, विजय साळुंखे, दिनेश मुथ्था, ॲड. संकेत खाटेर, वर्धमान खाटेर, गिरीश शहा, बापू शिरगिरे, वैभव दोशी यांच्यासह संगिता खाटेर, स्वाती मसलेकर, कविता नीळ, छाया देवकर, वैशाली कोळी, रत्नमाला शिंदे, कमल चव्हाण, आशाबाई देशमुखे, संगीता गुंड, वीणा विद्वत, शिंदे, चव्हाणा, सातपुते, आडकर ,मनिषा कानडे, श्रध्दा जोशी, आरती बोकन, सोनु बोकन यांच्यासह भक्त परिवार उपस्थित होते.

# दहावी परीक्षेत चाटे क्लासेसची उत्तुंग भरारी

## यशाची दैदिप्यमान परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे-**




दहावी परीक्षेत चाटे कोचिंग क्लासेसने पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही २०२६ च्या परीक्षेत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाचे नवीन शिखर सर केले असून २७९ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवत 'चाटे पॅटर्न'चा दबदबा कायम राखला आहे. चाटे क्लासेसचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून, सर्वच विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. गणित, विज्ञान, इंग्रजी आणि संस्कृतसारख्या कठीण विषयांत चाटेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.

अभिनंदन नवले याने ९९.२० टक्के गुण मिळवून चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेत प्रथम येण्याचा मान मिळवला. अभिनंदनने आपल्या यशाचे श्रेय चाटे क्लासेसच्या अभ्यासू शिक्षकांना आणि त्यांच्या 'परफेक्ट नोट्स'ला दिले आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल बोलताना संस्थेचे संचालक प्रा. पांडुरंग घाडगे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश साध्य झाले आहे.

भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी हे विद्यार्थी सज्ज आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते बोलताना पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न, चाटे क्लासेसची 'टेस्ट सीरिज' आणि शिक्षकांचे वैयक्तिक मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे.

निकाल जाहीर होताच चाटे क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. योग्य नियोजन आणि वेळेवर घेतलेल्या सराव परीक्षांमुळे मुख्य परीक्षेचा आत्मविश्वास वाढला, अशी भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

पालकांनीही आपल्या पाल्याच्या यशाचे श्रेय चाटे क्लासेसच्या शिस्तबद्ध वातावरणाला दिले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे चाटे शिक्षण समूहाच्यावतीने अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# गृहिणी ते नर्सिंग असा प्रेरणादायी प्रवास

## खेडेभाळवणीच्या प्रियांका दामोदरे यांची जिद्दीने यशप्राप्ती

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १० मे-**

जिद्द आणि चिकाटी असेल तर आभाळही ठेंगणे वाटते, याची प्रचिती पंढरपूर तालुक्यातील खेडेभाळवणी येथील प्रियांका दामोदरे यांनी दिली आहे. सामान्य कुटुंबातील गृहिणी, त्यानंतर अंगणवाडी मदतनीस आणि आता नर्सिंगच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रियांका यांचा प्रवास हा संघर्षातून यशाकडे कसा जावा, याचा वस्तुपाठच आहे.



प्रियांका दामोदरे यांनी लग्नानंतर कौटुंबिक जबाबदारी पेलत 'नर्सिंग'च्या अंतिम वर्षापर्यंत मजल मारली आहे. अंगणवाडी भरती प्रक्रियेतून आपली निवड सार्थ ठरवत 'मदतनीस' म्हणून शासकीय सेवेत प्रवेश मिळवला. 'उमेद' अभियानांतर्गत बचत गटाचे यशस्वी नेतृत्व केले. त्यांच्या कौशल्यामुळे त्यांची इंटरनल कम्युनिटी रिसोर्स पर्सन (आयसीआरपी) म्हणून निवड झाली, ज्याद्वारे त्यांनी अनेक महिलांना आर्थिक प्रवाहात आणले. आज बँक कर्ज मंजुरी, उद्योग मार्गदर्शन आणि गावच्या विकास प्रक्रियेत त्यांचा शब्द प्रमाण मानला जातो. गावात आणि बँकेत त्यांना मिळणारे मानाचे स्थान हीच त्यांची खरी कमाई आहे.

मूळच्या करमाळा येथील प्रियांका यांचा विवाह खेडेभाळवणी येथे झाला. वडिलांच्या पश्चात कुटुंबाची ओढाताण होत असताना पती राहुल दामोदरे यांनी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. २०१७-१८ मध्ये 'उमेद' अभियानाशी जोडल्या गेल्यावर त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. अनेक तांत्रिक अडचणी आणि सामाजिक आव्हानांना सामोरे जात त्यांनी काम आणि शिक्षण सुरू ठेवले. सध्या त्या एकता महिला मंचच्या माध्यमातून गावातील इतर महिलांना सक्षम करण्याचे काम करत आहेत.

आरोग्य, शिक्षण आणि महिलांचे कायदेशीर अधिकार या विषयावर काम करत आहेत. प्रियांका यांच्या या यशाबद्दल खेडेभाळवणीचे सरपंच संतोष साळुंखे, एकता महिला मंचचे सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

### महिलांना सक्षम करण्याचे ध्येय

माझ्या आयुष्यात 'उमेद'ने बदलाची पायाभरणी केली. एकता महिला मंचमुळे मला पंख मिळाले आहेत. समाजातील शेवटच्या महिलेला सक्षम करणे, हेच माझे आता साध्य आहे.

**- प्रियांका राहुल दामोदरे**

# एसएसए उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल ९२.३२ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**



सोशल असोसिएशन ऑफ उर्दू हायस्कूलमधील एस. एस. सी. परीक्षेत ३७८ पैकी ३४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेत प्रथम यल्नाज सुहेल अहमद बिजापूरे ९६ टक्के, द्वितीय ऐमन इम्रान नालवार ९४ टक्के तर तृतीय मोहम्मद फरजान नफीस अख्तर नाईकवाडी ९३.४० टक्के प्राप्त केले.

निकालात उर्दू माध्यमाचा ९३.५२ टक्के आणि मराठी माध्यमाचा निकाल ८१.५७ टक्के निकाल लागला. यात १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त तर ६७ विद्यार्थी विशेष प्राविण्य तसेच १२१ विद्यार्थी प्रथम श्रेणी आणि ११५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत यश संपादन केले. उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक रसूल चौधरी, उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे, रिजवान शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांना शोएब उटकूर, जुनैद शेख, तौसिफ देवनी, रशीद मुल्ला, तन्वीर बिजापूरे, मोईन शेख, दिलदार शेख, शकील शेख, महंमद हुसेन तांबोळी, मुस्तफा सरदार, इरफान शेख, शकील खैरदी, रजाक पटेल, अल्लाउद्दीन शेख, जुल्किफ्ल बागबान, वजाहत सगरी, जहिर शेख, इरफान बानकरी, राहिल मुल्ला, वसीम सागर, अझरोद्दीन चितापूरे, शाहरूख माडी यांनी मार्गदर्शन केले.



# साक्षी भैरामडगी एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १० मे -**

वळसंग (ता.द. सोलापूर) शासनातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजेच एन एम एम एस परीक्षेत श्री शंकरलिंग प्रशालेतील इयत्ता आठवीमधील ३३ पैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

साक्षी भैरामडगी ही शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे. तिला शासनातर्फे दर वर्षी १२ हजार रुपयांप्रमाणे पाच वर्ष सदर शिष्यवृत्ती मिळणार आहे.

साक्षीला संजयकुमार धनशेट्टी, विजयालक्ष्मी थळंगे, सिध्दाराम भैरामडगी, श्रीमंत भोसले, बसवराज दुधगी, सिद्धारूढ हिरेमठ, स्नेहा हळगोदे, गंगाधर बिराजदार, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव आदींसह शिक्षक व पालकांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, सदस्य शिवशरण प्याटी, रामेश्वर बिज्जरगी, प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, रमेश दुधगी, शंकर केशट्टी, संजय दुधगी यांच्यासह प्राचार्य विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.

तिच्या यशाबद्दल प्रशालेतर्फे बुके व शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. परीक्षेसाठी परीक्षा विभाग प्रमुख बाळकृष्ण गुंड यांना कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी व सहशिक्षक बसवराज दुधगी यांचे सहकार्य लाभले.

# पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचा गुणवत्ता, संस्कारांचा विजयध्वज!

## दहावीच्या निकालात तीन विद्यार्थी राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० मे -**









ज्ञानाची परंपरा, संस्कारांची श्रीमंती आणि गुणवत्तेचा अखंड दीप प्रज्वलित ठेवणाऱ्या पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाखांनी यंदाच्या दहावीच्या निकालात भरघोस यश मिळवले. संस्थेच्या तिन्ही शाखांमधील गुणवंत विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुणवत्तेने संस्थेच्या गुणवत्ता, संस्कारांचा विजयध्वज फडकवला आहे. निकालात संस्थेतील तीन विद्यार्थ्यांनी सर्व विषयात १०० टक्के गुण मिळवत राज्यात पहिला येण्याची मोठी कामगिरी केली.

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन करत संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक विश्वात पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाचा सुवर्ण ठसा उमटवला आहे. द.ह. कवठेकर प्रशाला, कवठेकर प्रशाला व पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल या संस्थेच्या शाखांनी यंदाही गुणवत्ता, संस्कार आणि शिस्त या त्रिसूत्रीचा तेजस्वी प्रत्यय घडवत दैदिप्यमान यशाची परंपरा अबाधित राखली आहे.

कवठेकर प्रशालेचे मिहिर बडवे आणि रुद्र उत्पात तसेच द.ह. कवठेकर प्रशालेतील अथर्व वाडेकर यांनी शंभर पैकी शंभर गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या यशामुळे संपूर्ण पंढरपूर शहर अभिमानाने उजळून निघाले आहे. कवठेकर प्रशालेचा निकाल यंदाही गौरवास्पद ठरला. एकूण २७० विद्यार्थ्यांपैकी तब्बल २६० विद्यार्थी उत्तीर्ण होत प्रशालेने ९६.५० टक्के निकालाची मानाची पताका फडकावली. साक्षी वांगीकरने ९७.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर आदित्य उत्पातने ९५.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे, संस्कृत विषयात चार विद्यार्थ्यांनी शंभर पैकी शंभर गुण मिळवत प्रशालेच्या गुणवत्तेच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला. ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या २५ विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीची आणि बुद्धिमत्तेची झळाळी दाखवून दिली.

पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलनेही शंभर टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी करत संस्थेच्या यशोमालिकेत मानाचा दुवा जोडला. अनुष्का लेंडवेने ८६ टक्के गुणांसह प्रथम, मृणाली शिनगारेने ८३.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर अनुष्का काळुंगेने ८३.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. सर्व शाखांचे हे उज्ज्वल यश म्हणजे केवळ निकालाची आकडेवारी नसून, विद्यार्थ्यांमध्ये रुजवलेले संस्कार, शिस्तबद्ध शिक्षणपद्धत आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमांचे तेजस्वी फलित आहे. ८० वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या या संस्थेने केवळ गुणवंत विद्यार्थीच घडवले नाहीत, तर समाजाभिमुख, संस्कारक्षम आणि कर्तृत्ववान नागरिकांची पिढी घडवण्ली आहे.

दैदिप्यमान यशाबद्दल गौरव समारंभ अत्यंत उत्साहात पार पडला. संस्थेचे अध्यक्ष नाना कवठेकर, मानद सचिव सु.र. पटवर्धन, संस्था सदस्य डॉ.मिलिंद जोशी, एस.पी. कुलकर्णी, संजय कुलकर्णी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. मानद सचिव सु.र.पटवर्धन यांनी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अखंड परंपरा अशीच सुरू राहील आणि या प्रशाला राष्ट्रासाठी कर्तृत्ववान नागरिकांची सशक्त पिढी घडवत राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

संस्थेच्या चेअरमन विणा जोशी, अध्यक्ष नाना कवठेकर, मानद सचिव सु.र.पटवर्धन, सु.त्री.अभ्यंकर आणि सर्व संस्था सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय.पाटील, पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका मोहोळकर यांची शैक्षणिक वाटचाल अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे. कार्यक्रमास उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग तसेच पंढरपूरमधील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण पंढरपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्कारातून गुणवत्ता आणि गुणवत्तेतून यश या संस्थेच्या ध्येयवाक्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे.

# सरकारच्या धोरणानुसार तहसीलदारांनी ज्या-त्या गावात जाऊन तेथील प्रश्न जागीच मार्गी लावावेत : ना. चंद्रशेखर बावनकुळे






## सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

राज्यात पूर्वीपासून गृह खाते हे जनतेच्या जीवाचं रक्षण करते, तर महसूल खाते जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करत असते, या सरकारच्या धोरणानुसार तहसीलदारांनी ज्या-त्या गावात जावून तेथील प्रश्न जागीच मार्गी लावावेत, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. करमाळा येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार नारायण पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, जि.प.सदस्य गणेश चिवटे, रश्मी बागल, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार शिल्पा ठोकडे, सह दुय्यम निबंधक एस.एस. कोकाटे आदी उपस्थित होते. ना.चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाले, जनतेने गाऱ्हाणी घेऊन मंत्रालयात जाण्याऐवजी मंत्र्यांनी गावात जाऊन जनतेचे निवेदन तक्रारी स्वीकारणे व सोडवणे हे या सरकारचे धोरण आहे. पुढील चार महिन्यात जिल्ह्यातील एकही गाव यातून सुटणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी पालकमंत्र्यांशी समन्वय साधून जिल्ह्यातील पाणंद व वहिवाटीचे रस्ते शोधून त्यांची मोजणी करुन शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी सुरु करावेत. झाडे तोडली जावू नयेत व रस्ताही बंद होणार नाही. यादृष्टीने रस्त्याच्या कडेने झाडे लावावीत. रस्ता अडविल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी २४ तास लाईट आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून दिले तर शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी मागण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे शेतकरी सधन व समृध्द होईल. अनधिकृत रहिवासी घरे कायमस्वरुपी त्यांच्या नावे करुन रजिस्ट्रीचा खर्च शासन करेल. हे सरकार जनतेच्या हितासाठी असून जनतेचे प्रश्न सोडवणे हे सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### खा.सुप्रिया सुळे यांच्या गाडीला मुंबई-पुणे महामार्गावर अपघात



**पुणे, दि. १० मे-**

बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या गाडीला मुंबई-पुणे महामार्गावर किरकोळ अपघात झाला आहे. याबाबत त्यांनी स्वतः द या सोशल मीडियावरून माहिती दिली आहे. तसंच, ज्या वाहनाने त्यांच्या वाहनाला धडक दिली त्या वाहनाचा नंबर प्लेटही सुप्रिया सुळेंनी शेअर केला आहे.



### मॉडेल पब्लिक स्कूलमध्ये ईशा रणसुभे प्रथम

**सोलापूर दि. १० मे-**

जुळे सोलापुरातील मॉडेल पब्लिक स्कूलचा इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला. ३७ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. ईशा रणसुभे ही ९८.४० टक्के गुण मिळवून प्रशालेतून प्रथम आली आहे. श्रेया बिराजदार व आर्यन पारगोंडे (९७.४० टक्के) गुण मिळवून प्रशालेतून द्वितीय आले तर श्रध्दा कळकोटे (९७.२० टक्के) गुण मिळवून तृतीय आली. आयेशा अवटे व निखील सुंटे (९६.४० टक्के) चौथे व तनिष्का आमले (९६ टक्के) प्रशालेतून पाचवी आली. गणित विषयात आर्यन पारगुंडे व निखील सुंटे यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले. विज्ञानमध्ये आयेशा अवटे व निखील सुंटे यांनी यांनी ९९ गुण मिळवले. समाजशास्त्र विषयात इशा रणसुभे, श्रेया बिराजदार, आर्यन पारगुंडे, श्रध्दा कळकोटे, आयेशा अवटे, स्वरुप म्हसकर यांनी ९८ गुण तथ संयुक्त हिंदी-संस्कृत या विषयात श्रेया बिराजदार व स्वरुप म्हसकर यांनी ९७ गुण मिळवले. इंग्रजी विषयात इशा रणसुभे हिने ९६ गुण तर मराठीमध्ये श्रेया बिराजदारने ९४ गुण मिळवले आहेत.



वाढत्या तापमानामुळे सोलापूर शहरातील डीआरएम ऑफिससमोरील रस्त्यावरील दुभाजकात झाडांची दुरवस्था झाल्याचे दिसून येत आहे. (छायाचित्र-केवल तिवारी)

## लघुशंका करायला थांबलेल्या शेतकऱ्याला लुबाडले

### चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे -**

लघुशंका अर्थात नैसर्गिक विधीसाठी थांबलेल्या एका शेतकऱ्याला चार जणांनी चाकूचा धाक दाखवून लुटले. हैदराबाद महामार्गावरील मार्केट यार्ड परिसरातील शेतकी फार्मजवळ ८ मे रोजी सकाळी ही घटना घडली. या प्रकरणी चौघांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

हनुमंत यशवंत कोळी (वय ३५, रा. येणकी, ता. मोहोळ) यांनी फिर्याद दिली आहे. ते ७ मे रोजी कांदे विक्रीसाठी सोलापूर मार्केट यार्ड येथे आले होते. ८ मे रोजी सकाळी ७:३० च्या सुमारास ते आपल्या दुचाकीवरून हैदराबाद रोडवरील शेतकी फार्मच्या मोकळ्या जागेत नैसर्गिक विधीसाठी थांबले होते. त्यावेळी अचानक अनोळखी चार जण त्यांच्याजवळ आले. एकाने त्यांच्या दुचाकीची चावी काढून घेतली, तर दुसऱ्याने पोटाला चाकू लावून जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपींनी मारहाण करून हनुमंत यांच्याकडून त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड जबरदस्तीने घेतला. एका आरोपीने मोबाईलमधील यूपीआय उघडून फिर्यादीच्या बँक खात्यातून ७३५ रुपये दुसऱ्या खात्यावर वर्ग केले. तसेच फिर्यादीच्या खिशातील ३०० रुपये रोख काढून घेतले. लुटमार करणाऱ्यांपैकी एकाच्या छातीवर 'महाकाल' असे मराठीत गोंदवलेले होते. त्याने ३००० रुपये दे तरच तुझी गाडी आणि मोबाईल देतो अशी मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी ३० हजार रुपयांची दुचाकी, मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ३५ हजार ३०० रुपयांचा ऐवज घेऊन पळ काढला. घटनेनंतर ते घाबरुन गावाकडे गेले. तेथे भावाशी चर्चा करून ९ मे रोजी सोलापूरला येऊन जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू गायकवाड हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.




## ठिबक सिंचन संच चोरणारी टोळी जेरबंद, ६ गुन्हे उघड

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० मे-**

अकलूज व माळशिरस तालुक्यातील शेती साहित्याची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अकलूज पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे.या कारवाईत पोलिसांनी ६ विविध चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून एकूण २ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दि.६ मे २०२६ रोजी सकाळी फिर्यादी महादेव मारुती एकतपुरे (रा.चौंडेश्वरवाडी) यांच्या शेतातून ठिबक सिंचनाचे पाईप चोरून नेत असताना एका व्यक्तीला रंगेहात पकडण्यात आले होते.याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता चोरीचे मोठे रॅकेट समोर आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव विकास नाना उर्फ रावसाहेब चोरमले वय २३ (रा.६१ फाटा माळशिरस) असे आहे. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने चौंडेश्वरवाडी परिसरातून ५५ हजार रुपये किमतीचे पाईप चोरल्याची कबुली दिली.इतकेच नाही तर मागील काही महिन्यांत त्याने अकलूज, माळशिरस आणि वेळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या अनेक चोऱ्यांची माहिती दिली.



अकलूज पोलिसांनी आरोपीकडून १००% मुद्देमाल हस्तगत केला असून यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे. एकूण रोख मूल्य: २,४४,००० रुपये (विविध ६ गुन्ह्यातील मुद्देमाल), चोरीसाठी वापरलेली तीन चाकी रिक्षा वाहन (चक ४५ छ ६१०९) आणि एक 'एच.एफ. डिलक्स' मोटारसायकल इतर औषध फवारणीसाठी वापरले जाणारे एसटीपी मशीन जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज पोलीस ठाण्याचे प्रभारी निरज उबाळे व त्यांच्या टीमने केली आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम,पोलीस हवालदार विनोद साठे,अभिजीत कुंभार,अमोल मिरगणे,सुनिल माने आणि पंडीत गवळे यांनी या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करत आहेत.

## स्नेहा साठेची नवोदय विद्यालयासाठी निवड



**वेळापूर :** वेळापूर येथील लोकविकास शिक्षण प्रसारक संस्था संचलित लोकविकास मराठी मिडीयम स्कूल या शाळेची इयत्ता १० वी ची विद्यार्थिनी स्नेहा हनुमंत साठे हिची नवोदय विद्यालय, पोखरापूर येथे इयत्ता अकरावीसाठी निवड झाली. त्यामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक सुनिल पताळे, मुख्याध्यापक अमोल पांढरे, मुख्याध्यापक अजित बनकर यांनी स्नेहा साठे हिचे अभिनंदन केले.

## १० दिवसांत जिल्ह्यात २४,५७२ स्वयंगणना

**सोलापूर, दि. १० मे-**

संपूर्ण भारतात १ मे २०२६ पासून स्व:गणना करण्यास सुरुवात झालेली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वत:ही जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतः ची डिजिटल गणना यशस्वीरित्या पूर्ण केली. व जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी १५ मे २०२६ पर्यंत दिलेल्या https://se.census.gov.in या संकेतस्थळावर स्वतः ची माहिती भरून स्व जनगणनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्ह्यात डिजिटल जनगणना २०२७ अंतर्गत स्वयं गणनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १० मे २०२६ रोजी च्या अहवालानुसार, सोलापूर जिल्ह्यात एकूण २४५७२ स्वयं गणना प्रक्रिया सुरू करण्यात आल्या असून, त्यापैकी २० हजार ०८४ गणना यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिक डिजिटल माध्यमातून स्वत:ची माहिती नोंदवून शासनाच्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद देत असल्याची माहिती आरडीसी अभिजित पाटील यांनी दिली.

## सलग तीन वर्ष १०० टक्के निकालाने कामतकर क्लासेसची हॅट्ट्रिक



### सलग 3 वर्षे शहरात प्रथम यण्याची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे -**

नुकत्याच जाहीर केलेल्या दहावी परीक्षेच्या निकालात कामतकर क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले. क्लासेसचा निकाल सलग तीन वर्ष १०० टक्के लागला ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे क्लासेसच्या वतीने सांगण्यात आले.

यंदा क्लासेसच्या ५३ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. सई पिंपळनेरकर आणि अर्णव राऊत यांनी १००% गुण मिळवत क्लासमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला. सई पिंपळनेरकरने गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले. गणित विषयामध्ये ४४ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले. शास्त्र विषयांत ३९ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले. इंग्रजी विषयांत २९ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले.

समाजशास्त्र विषयात ३७ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले. या यशाचे संपूर्ण श्रेय विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचा विश्वास आणि आमच्या अध्यापन पद्धतीला जाते, अशी माहिती क्लासेसच्यावतीने देण्यात आली. आमच्या क्लासेसमध्ये आम्ही फक्त पुस्तकातील अभ्यासावर भर देत नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याला कॉन्सेप्ट क्लिअरटी मिळावी यासाठी विशेष प्रयत्न करतो. शेवटच्या ९० दिवसांत ६० चाचणी परीक्षांबरोबर शंका निरसन सत्र घेतली जातात, त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. विद्यार्थ्यांना यश मिळवण्यासाठी हार्डवर्क बरोबर स्मार्ट स्टडी कसा करायचा हे कामतकर क्लासेसमध्ये शिकवले जाते. गुणवंत विद्यार्थ्यांना कामतकर, कदम, हलकुडे, तावसे, अंबादास जाधव, अनुजा जोशी, आडकी, पांडे, प्राजक्ता कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | सोमवार, ११ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## ▶▶ महत्वाचे...

### बहिणीबरोबर भांडण, मेहुणीने भावजीवर केला वार

**सोलापूर, दि. १० मे-**

बहिणीबरोबर का भांडतोस असे म्हणून एका मेहुणीने आपल्या भावजीला लोखंडी वस्तूने मारून जखमी केल्याची घटना न्यू बापूजी नगरात घडली.




धनराज नागनाथ उकरंडे (वय-३५, रा.न्यू बापूजी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. धनराज व त्याच्या बायकोचे भांडण झाले होते. त्यामुळे त्यांची मेहुणी सुजाता क्षीरसागर हिने बहिणी बरोबर का भांडण करता, असे म्हणत लोखंडी वस्तूने गळ्यावर मारून जखमी केले. त्यामुळे तो उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात रात्री स्वतः दाखल झाला.

### कुत्रा आडवा आल्याने रिक्षा झाली पलटी, चालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १० मे-**

कुत्रा आडवा आल्याने धावती रिक्षा पलटी होवून रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना तुळजापूर नाका येथील कचरा डेपो समोर घडली. नितीन नारायण माने (वय-३७, रा.पसारे वस्ती, जुना तुळजापूर नाका, सोलापूर) असे मयत रिक्षाचालकाचे नाव आहे. सदर रिक्षाचालक राहत्या घराकडून रिक्षा घेऊन निघाला असताना कचरा डेपोजवळ अचानक रिक्षा समोर कुत्रा आडवा आला. त्यामुळे रिक्षावरील नियंत्रण सुटून रिक्षा डिव्हायडरला धडकून पलटी झाली. रिक्षा अंगावर पडल्यान ते बेशुध्द पडले. त्यांना उपचारासाठी त्यांचा भाचा कपिल सुरवसे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### दुचाकी स्लीप होऊन जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १० मे-**

दुचाकी स्लिप होऊन जखमी झालेल्या सलगर गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. सोमनाथ चंद्रय्या स्वामी (वय-३३, रा.सलगर, ता.मंगळवेढा) मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. सलगर गावाकडून मंगळवेढाकडे दुचाकीवरुन निघाले असताना वाटेत दुचाकी स्लिप होऊन डोक्याला व पोटाला मुकामार लागून बेशुध्द होऊन पडला. खासगी दवाखान्यात उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्याचा शनिवारी सायंकाळी मृत्यू झाला.

### पैशाच्या व्यवहारातून महिलेस दगड, लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. १० मे-**

पैशाच्या व्यवहारातून एका महिलेला दगड व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे घडली. निलाबाई बाबू जानकर (वय-४६, रा.मंद्रूप) असे त्या महिलेचे नाव आहे. मंद्रूप गावात पैशाच्या व्यवहारातून मारुती शिंदे याने लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार व हाताला जखम झाल्याने त्या मंद्रूपच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात रात्री स्वतः दाखल झाल्या.

# पाच अल्पवयीन मुली बालविवाहाच्या विळख्यातून बाहेर

- पाचही मुलींची बालगृहात रवानगी
- यात दोन सख्ख्या बहिणींचा समावेश
- मोहोळ, वळसंग, पंढरपूर, वैराग येथे कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

बालविवाह करणे हा कायदयाने गुन्हा आहे; हे माहित असूनही अनेक ठिकाणी सर्रासपणे अशा विवाह लावल्या जात आहेत. 'बालविवाह'सारखा गंभीर समस्या दिवसागणिक वाढीस लागत आहे. या समस्येच्या विरोधात पोलिस प्रशासन कठोर पावले उचलत, एकाच दिवशी जिल्हाभरातील तब्बल पाच मुलींना बालविवाहाच्या विळख्यातून बाहेर काढले.



सोलापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने ग्रामीण पोलिस, स्पेशल ज्युवेनाईल पोलिस युनिट अर्थात बालक विशेष पोलिस पथक आणि बालकल्याण समितीने संयुक्तरित्या ही कारवाई केली. या पाचही मुलींना संरक्षणाची गरज असल्याने त्यांची बालगृहात रवानगी करण्यात आले.

मोहोळ पोलीस स्टेशन हद्दीत दोन सख्या अल्पवयीन बहिणींचा विवाह होणार असल्याची माहिती स्पेशल ज्युवेनाईल पोलिस युनिटचे प्रमुख संकेत देवळेकर यांना मिळाली. त्यानुसार पोउनि सचिन माळी, पोशि उमेश पवार, सिंधू थोरात, मपोशि अश्विनी घोलप यांच्या पथकाने तिकडे धाव घेत दोन अल्पवयीन मुलींना ताब्यात घेत बालविवाह रोखला

वळसंग पोलिस ठाण्याचे सपोनि राहुल डोंगरे यांना व्हॉट्सॲपद्वारे १४ वर्षीय मुलीचा विवाह होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोउनि रविराज कांबळे, पोह बसवराज अष्टगी, मपोह अश्विनी गोटे, चापोशि संतोष कुंभार यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला.

पंढरपूर येथे एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह झाल्याची माहिती मिळाल्यानंतर सातत्याने पाठपुरावा सुरु होता. मात्र संबंधित बालक व तिचे पालक बालकल्याण समितीसमोर उपस्थित राहत नव्हते. समितीने पंढरपूरचे सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्याशी संपर्क साधला. अखेर शनिवारी संबंधितांना समितीसमोर हजर करण्यात आले.

वैराग पोलिस स्टेशन हद्दीतही एका अल्पवयीन मुलीचा होऊ घातलेला बालविवाह रोखण्यात आला. या कारवाईत वैरागचे पोनि कुंदन गावडे, पोउनि प्रतापसिंग जाधव यांनी प्रभावी भूमिका बजावली. पोनि बालाजी पवार, पोनि कुंदन गावडे, सपोनि राहुल डोंगरे, पोउनि प्रतापसिंग जाधव आदींनी ही कामगिरी बजाविली.

#### छुप्या पध्दतीने होताहेत बालविवाह

या कारवाई दरम्यान मोहोळ येथे दोन, वळसंग, पंढरपूर, वैराग येथे प्रत्येकी एक असे एकूण पाच बालविवाह रोखण्यात पोलिस प्रशासनाला यश आले. यातील दोन मुली ह्या सख्खी बहिणी असल्याचे निदर्शनास आले. छुप्या पध्दतीने बालविवाह करण्यात येत असल्याचे प्रकार अनेक ठिकाणी दिसून येत आहे.

## पंढरपुरातील जडवाहतुकीचा आणखी एक बळी, भक्त पुंडलिक पुलावर भाविकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० मे-**

पंढरपुरातील जडवाहतुकीचा शनिवार, दि.९ मे २०२६ रोजी आणखी एक बळी ठरला. भक्त पुंडलिक पुलावर एका भाविकाचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली. शहरातून जडवाहतूक पूर्णपणे बंद करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. परंतु प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.


शनिवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास भक्त पुंडलिक महाराज पुलावरुन पायी चालत जाणाऱ्या एका भाविकाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. माजी नगरसेवक विक्रम शिरसट व कार्यकर्त्यांनी पोलिसांना ही घटना कळविली. मृत व्यक्तीची ओळख पटविणे, अज्ञात वाहनाचा शोध घेण्याचे काम सुरु आहे.




## पाण्याच्या बादलीसह पडलेल्या वृध्देचा उपचारादरम्यान मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

पाण्याची बादली उचलताना पडून जखमी झालेल्या गावडी दारफळ गावच्या वृध्द महिलेचा उपचार दरम्यान सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. कांताबाई अंकुश गाडेकर (वय-७५, रा.गावडी दारफळ, वैराग, ता.बार्शी) असे मयत महिलेचे नाव आहे. दि.२२ एप्रिल रोजी सकाळी राहत्या घरात पाण्याची बादली उचलताना पाय घसरुन पडून त्या जखमी झाल्या होत्या. त्यांना खासगी दवाखान्यात उपचार करुन पुढील उपचारार्थ सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान आज सकाळी मृत्यू झाला.



## सोलापूर जिल्ह्यातील जलसंधारण कामांना बुस्टर डोस

**४,९९१ लाखांचा निधी, ५३ टक्के खर्च पूर्ण**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

सोलापूर जिल्ह्यात जलसंधारण आणि सिंचन क्षमतेत वाढ करण्यासाठी विविध योजनांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून, २०२५-२६ या आर्थिक वर्षात हजारो लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. जलसंधारण विभागाच्या अहवालानुसार, विविध योजनांतील कामांना गती मिळाली असून अनेक प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

जलसंधारण विभागाच्या उपलब्ध माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण ८६७ कामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १९८ कामे प्रगतीपथावर आहेत. तर ३२८ कामे पूर्ण झाली असून काही कामे निविदा स्तरावर आहेत. याशिवाय काही प्रस्तावित आणि रद्द करण्यात आलेल्या कामांचाही समावेश आहे.

आर्थिक बाबींचा आढावा घेतला असता, १ एप्रिल २०२५ रोजी अखर्चित निधीसह सन २०२५-२६ मध्ये मंजूर झालेला निधी मिळून एकूण ४९९९.५७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यापैकी आतापर्यंत २१९०.१४ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ५३.२३ इतकी नोंदविण्यात आली आहे.

#### ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत

जलसंधारण विभागाच्या या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार असून, भूजल पातळी वाढीसह शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्धतेचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

#### अटल भूजल योजना, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण

अटल भूजल योजना, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार यांसारख्या योजनांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १९८ कामांना मंजुरी देण्यात आली. गाळमुक्त धरण योजनेंतर्गतही शेतकऱ्यांना फायदा होईल, अशा जलसाठा वाढविणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.

'लघु पाटबंधारे योजना' अंतर्गत ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कामांवर विशेष भर देण्यात आला आहे. या योजनेसाठी सर्वाधिक निधी उपलब्ध झाला असून अनेक कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. त्याचबरोबर जिल्हा परिषद उपकरातून कोल्हापुरी बंधारे, गाव तलाव दुरुस्ती आणि सिमेंट बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामेही सुरू आहेत.

## बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करा : आ. आवताडे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० मे-**

कृषी विभागाच्या सर्व योजना प्रत्येक गावातील सर्व शेतकऱ्यांना पोहोचतील अशा पद्धतीने सतर्क राहून कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी काम करावे. बांधावर जाऊन शेतकऱ्यांना आपत्कालीन उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करावे, असे आवाहन आमदार समाधान आवताडे यांनी केले.

तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेमध्ये लक्षांक वाढवून जास्तीत जास्त शेतकरी उद्योजक तयार करण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न वाढवावेत. तसेच पर्जन्यमान, पीक निवडणे ,वाण निवडणे, पीक उत्पादन वाढवणे यासाठी महाविस्तार प चा प्रचार आणि प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात करावी. तसेच अल निनो च्या परिणामामुळे होणारे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आपत्कालीन नियोजन म्हणून स्प्रिंकलर संच ठिबक संच वापर वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सदर आढावा बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी पंढरपूर बाळासाहेब लांडगे तसेच नूतन पंचायत समिती मंगळवेढा सभापती, दिपाली ताड,उपसभापती अर्जुन मल्हाळे, जिल्हा परिषद , सोलापूर सदस्य प्रदीप खांडेकर, रमेश भांजे, नूतन पंचायत समिती सदस्य विनायक यादव, सौ जयश्री कवचाळे, सुरेश कांबळे,

उद्योजक जनार्दन शिवशरण, उद्योजक हनुमंत दुधाळ, श्रीकांत गणपाटील, उपनगराध्यक्ष येताळा भगत, नगरपालिका सदस्य प्रवीण खवतोडे, कृषीभूषण अंकुश पडवळे, उद्योजक संजय कट्टे, आदी मान्यवर उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा मनीषा मिसाळ- जाधव यांनी खरीप हंगामाबाबतचे गतवर्षीचा मागोवा बाबत सविस्तर माहिती दिली व पुढील वर्षाचे नियोजन बाबत चे सादरीकरण केले. त्यानंतर खरीप हंगाम नियोजन बाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर खरीप हंगाम पीक स्पर्धा २०२४-२५ विजेते शेतकरी अशोक खताळ शिरनांदगी तुर, ताजुद्दीन शेख सिद्धापूर उडीद ,बसवंत पाटील सिद्धापूर उडीद, सुनील कोरे सिद्धापुर उडीद, आबासो खंडागळे भाळवणी बाजरी, पद्मिनी गायकवाड भाळवणी बाजरी, अंकुश गायकवाड भाळवणी सूर्यफूल, धर्मराज मोरे पाटखळ मका, प्रमोद येणपे नंदुर मका , अनिकेत मुंगसे बोराळे मका, विश्वनाथ पाटील मुंढेवाडी तुर, श्रीकांत निकम तळसंगी तुर, विजयकुमार मंटूर डोनज तुर, त्याबरोबर

वरद पाटील मुंढेवाडी ज्वारी व करडई, सुमन सावंजी मंगळवेढा करडई, भारत कसबे खडकी ज्वारी, ज्ञानू लेंडवे गोणेवाडी ज्वारी, संजय जाधव मरवडे गहू, आनंदा देवकते हजापूर गहू, अमोल पवार अकोले हरभरा इत्यादी पिकांच्या पीक स्पर्धा विजेते शेतकऱ्यांचा सन्मान आमदार समाधान दादा अवताडे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच उपविभागीय कृषी अधिकारी पंढरपूर बाळासाहेब लांडगे यांचा कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कामकाज केल्याबद्दल सेवापूर्ती निमित्त आमदार समाधानदादा आवताडे यांचे हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर आत्मा अंतर्गत उत्कृष्ट शेतकरी म्हणून चंद्रकांत माळी , मंगळवेढा, नवनाथ हेंबाडे, ढवळस तसेच पी एम एफ एम इ योजना डी आर पी, भास्कर कुसुमडे व भारतीय कृषी विमा कंपनी तालुका प्रतिनिधी जावेद सुतार यांचा उत्तम कामगिरी बद्दल सत्कार करण्यात आला.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रशांत काटे उपकृषी अधिकारी मंगळवेढा यांनी केले व आभार प्रदर्शन बालाजी टेकाळे मंडळ कृषि अधिकारी नंदेश्वर यांनी केले. त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने कार्यक्रमाची सांगता झाली.



## टाकळीतील सिमेंट रस्त्यात मोठा घोटाळा?

**४० एमएम ऐवजी २० एमएम खडी वापरल्याचा आरोप**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १० मे :**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप दिपकभाऊ निकाळजे सामाजिक विकास संघटनेने केला असून, या प्रकरणाची तिसऱ्या पक्षामार्फत चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष नरेश कांबळे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, टाकळी येथे शिवप्पा कोळी घर ते बी.एस. कॅम्प या मार्गावर सुमारे ५ लाख रुपयांचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता मंजूर करण्यात आला होता. मात्र काम करताना शासनाच्या इस्टिमेटनुसार पहिल्या लेअरसाठी ४० एम.एम. खडी वापरणे आवश्यक असताना संबंधित ठेकेदाराने २० एम.एम. खडी वापरून काम पूर्ण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे रस्त्याचा दर्जा खालावला असून, अनेक रस्ते कामे अशाच पद्धतीने निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या एका वर्षाच्या आतच रस्ते खराब होत असल्याने शासनाच्या निधीची उधळपट्टी होत असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला.

विशेष म्हणजे, संबंधित कामाचे बिल ऑगस्ट २०२५ मध्ये मंजूर झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराला बिल अदा करण्यात आले काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर

डिसेंबर २०२५ मध्ये ५ टक्के कालदोष बिल अदा करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शासन नियमानुसार हे बिल काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षानंतर देणे अपेक्षित असताना ते कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आले, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे.

तसेच या कामाचे एम.बी. (मोजमाप पुस्तिका) लिहिणारे अधिकारी व ५% बिल मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, तसेच निकृष्ट दर्जाचे झालेले रस्त्याचे काम पुन्हा इस्टिमेटप्रमाणे करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास जिल्हा परिषद पूनम गेटसमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही दिपकभाऊ निकाळजे सामाजिक विकास संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## जिल्हा परिषदेच्या महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार २.० ला वेग; सोलापूर विभागात ३२०८ कामांना मंजुरी

- २३१ कामांसाठी तब्बल ११५३.२७ लाख रुपयांचा निधी
- २०३ कामांवर सुमारे ७८१.२० लाख रुपये खर्च
- १७४ कामांवर ३०८.७२ लाख रुपयांचा प्रत्यक्ष खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अंतर्गत सोलापूर विभागात जलसंधारणाच्या कामांना गती मिळत असून, विविध योजनांमधून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कृषी विभागाच्या अभिसरणातून राबविण्यात येणाऱ्या कामांमध्ये हजारो जलसंधारण प्रकल्पांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असून, अनेक कामे पूर्णत्वाकडे पोहोचली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम विभागाचे सभापती इंद्रजीत पवार यांनी दिली आहे.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२५-२६ अंतर्गत विविध जलसंधारण प्रकल्पांसाठी मोठा निधी मंजूर करण्यात आला आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार,



२३१ कामांसाठी तब्बल ११५३.२७ लाख रुपयांचा निधी नियोजित करण्यात आला असून त्यापैकी २०३ कामांवर सुमारे ७८१.२० लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. तसेच १७४ कामांवर ३०८.७२ लाख रुपयांचा प्रत्यक्ष खर्च झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

'आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना' अंतर्गतही विविध विकासकामांना चालना मिळाली आहे. मार्च २०१५ ते मार्च २०१८ या कालावधीत मंजूर झालेल्या योजनांमध्ये निधी खर्चाचे प्रमाण वाढले असून ग्रामीण भागातील जलसाठा वाढविणे, मृदसंधारण आणि सिंचन क्षमता वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात आला आहे. 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अंतर्गत सोलापूर विभागात एकूण ३२०८ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी २७०१ कामांना तांत्रिक मंजुरी मिळाली असून सर्व कामांसाठी जवळपास १८३५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यातील ३१८८ कामांना कार्यादेश देण्यात आले असून २१५२ कामे प्रत्यक्ष सुरू आहेत. आतापर्यंत २३५२ कामांवर सुमारे १४३२ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.

#### शेतीसाठी शाश्वत पाणीसाठा

अभियानांतर्गत शेततळी, गाळ काढणे, नाला खोलीकरण, सिमेंट बंधारे, मृदसंधारण, जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार असून शेतीसाठी शाश्वत पाणीसाठा निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

#### भूजल पातळी वाढविण्यावर भर

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार, जलयुक्त शिवार अभियानामुळे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढविण्यावर भर दिला जात आहे. यामुळे आगामी काळात शेती उत्पादनवाढीसह ग्रामीण भागातील पाणी प्रश्नावर मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १४३७

**नगरेंचि रचावीं ।जलाशयें निर्मावीं ।।**
**महावनें लावावीं । नानाविधें ।।**

सत्वगुणी, रजोगुणी, तमोगुणी यांचे वर्णन करता, करता माउली अतिशय सुंदर व आवश्यक अशा विषयाकडे वळले आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे प्रचंड समस्या आपल्यासमोर निर्माण झाल्या आहेत. राहण्यासाठी निवारा म्हणून माणूस कसलाही विचार न करता, जागा मिळेल तेथे घर, वस्ती करुन राहू लागला आहे. आपल्या आजू बाजूला वृक्ष, जलाशये आहेत का १ आपणाला पिण्यासाठी पाणी उपलब्ध आहे का ? आवश्यक ती वृक्ष, वेली आहेत का ? इत्यादी महत्वपूर्ण प्रश्नांचा विचार न करता माणूस कोठेही घरे बांधून, नगर निर्माण करीत आहे. माऊलींचा काळ म्हणजे सुमारे सातशे वर्षापूर्वी पेक्षाही जुना आहे. त्या काळात वृक्षांची, जलाशयांची प्रचंड उपलब्धता होती. चोहीकडे वृक्ष, पाणी उपलब्ध होते. तरी



पण माऊलींनी तुमच्या आमच्या म्हणजे आजच्या काळात निर्माण होणा-या अडचणींची कल्पना करुन, आपणाला वृक्ष, जलसाठयाच्या अनुषंगाने अंत्यत सुंदर असा सल्ला दिला आहे. ते म्हणतात, नगरेंची रचावीं । जलाशयें निर्मावीं । महावने लावावीं । नानाविधें ।।. अर्थात, आपण नगर, शहर, गांव वसविण्यास हरकत नाही. पण हे वसविण्याच्या अगोदर मोठया प्रमाणावर जलसाठे तयार करावेत, जलाशये निर्मावीत, आणि हेच किंवा तेच वृक्ष न म्हणता, विविध प्रकरचे झाडे लावून मोठी वने निर्माण करावीत. जलसाठयामुळे पाहिजेल तेंव्हा, पाहिजे तेवढे पाणी मिळू लागेल. त्याचबरोबर वृक्षामुळे मुळ, कंद, फळे, फुले, लाकुड, पान, इत्यादी मिळेल, त्यामुळे मानवाची अत्यावश्यक गरज पूर्ण होईल. जलसाठयामुळे, विविध प्रकरचे झाडे लावल्यामुळे माणसांवर पाण्यासाठी भटकंतीची वेळ येणार नाही. माऊलींची दुरदृष्टी आज आपल्याला प्रत्ययाला येत आहे. माऊलींच्या उपरोक्त ओवीचा आपण योग्य तो विचार केला नाही. त्यामुळे वूक्षाची लागवड तर दूरच गेली, पण मोठया प्रणावर वृक्षतोड झाल्याने मोठया प्रमाणावर प्राणी नष्ट झाल्याचे आपण पाहतो आहोत. याचा विपरीत परिणाम म्हणून प्रदुषणात फार मोठी वाढ होत आहे. जलसाठे निर्माण न केल्याने म्हणजेच पाणी अडवा, पाणी जिरवा ही मोहिम पाहिजे तशी यशस्वी न केल्याने, पाण्यासाठी फार भटकंती करावी लागत आहे. पाण्यासाठी सध्या हाणामा-या चालूच आहेत, पण ही परिस्थिती अशीच राहिली तर , उदया चालून पाण्यासाठी युध्दही होऊ शकतात. हा सर्व आपल्या चुकीचा परिणाम आहे. माउलीची दूरदृष्टी जर आपण कृतीत उतरविली असती, तर आज या समस्या आपल्यासमोर उभ्याच राहिल्या नसत्या! आपण स्वत:ही कांही करीत नाही, आणि इतरांनी सांगीतले तरी कांही ऐकत नाही, असाच याचा अर्थ होतो. आपण कोणाचे ऐका अथवा नको, पण आपले सदगुरु श्री ज्ञानेश्वर माऊलींचे तर आपणाला ऐकावेच लागेल. आपण आपल्या सदगुरुचे ऐकुण जलाशये निर्माण केली, वृक्ष लागवड केली तर आपल्यासारखा सुखी कोणी असणार नाही. याची जाण ठेवायला हकरत नाही. या सुखासाठी आपल्या घरावरील, अंगणातील पाणी अडवून आपल्या घरात जिरविले, बोरमध्ये / विहिरीमध्ये पुनर्भरण केले तरी बराच फरक पडेल व भविष्यामध्ये उद्‌भवणारी पाणी समस्या व पर्यावरण समस्या निर्माण होणार नाही. तसेच प्रत्येकांनी किमान चार- पाच वृक्ष मोठी केली, तरी वातावरणात खूप बदल झालेला दिसेल. हा चांगला व हितकारक बदल घडवून आणणे आपल्याच हातात आहे, हे विसरु नये. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. ११ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. नवमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- शततारखा (२५.२)**
**योग - ऐंद्र (२५.०३)**
**करण - वणिज (२७.१४)**
**राहू काल : सोमवार**
**दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
**महात्मा ज्योतिबा फुले जयंती (१८२७): भारतीय महान समाजसुधारक, विचारवंत आणि सत्यशोधक समाजाचे संस्थापक यांची जयंती..**
**अग्नी-२ क्षेपणास्त्र यशस्वी चाचणी (१९९९): भारताच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात म हत्त्वाची कामगिरी.अपोलो-१३ अंतराळ यान प्रक्षेपण (१९७०): चंद्राच्या मोहिमेसाठी अपोलो-१३ चे उड्डाण.**

## चित्रकार स्नेहल व गोरख यांचे पेन्सिल व पोर्ट्रेटचे चित्रप्रदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**


सोलापूरचे डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस विजय कबाडे यांच्या हस्ते पु. ना. गाडगीळ डफरीन चौक, सोलापूर येथे RT VENTURE या चित्रप्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी, माजी नगरसेवक रमेश व्हटकर, चित्रकार मनोहर नारायणकर, नितीन खिलारे, जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले, राज्य सचिव शांतप्पा काळे यांच्या उपस्थित मध्ये उदघाटन करण्यात आले. या चित्रप्रदर्शनास कला रसिकानी मोठया संख्येने उपस्थित राहून कलाकृती पाहायला यावे असे नवोदित चित्रकार स्नेहल नारायणकर, गोरख निंबाळकर व पु. ना. गाडगीळ अँड सन्सचे जितेंद्र जोशी यांनी केले. या कार्यक्रमास सिद्धाराम नालवार, शांताराम शिंदे, वर्षा निरंजन यांचे मोलाची मदत मिळाली. सूत्रसंचालन संतोष धारेराव यांनी केले.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 'अवकाळी'चे वाटतंय भय

### दोन दिवसानंतर पुन्हा तापमानाचा पारा चढला

### सोलापूरकर रविवारी उकाड्याने झाले हैराण




गेल्या दोन दिवसांपूर्वी सायंकाळी मोहोळ आणि उत्तर सोलापूर तालुक्यांत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली. दिवसभर कडक ऊन आणि ढगाळ वातावरण अशा संमिश्र हवामानामुळे उकाडा प्रचंड वाढला होता. या दोन दिवसांत ३९.७ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान नोंदविले होते. हवामान विभागानुसार, शनिवार, दि. ९ मे रोजी देखील अंशतः ढगाळ वातावरण राहून पावसाची शक्यता व्यक्त केली होती मात्र पाऊस झाला नाही. १० मे नंतर मात्र उष्णतेचा कडाका वाढून पारा ४३ अंशांच्या पुढे जाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यानुसार दि. १० रोजी ४२ अंशाच्या घरात तापमानाचा पारा गेला आहे. यामुळे सोमवारी पुन्हा तापमान वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या काळात पाऊस पडू लागल्याने काढणीला आलेल्या पिकांचे आणि फळबागांचे मोठे नुकसान होत आहे. एकतर उत्पादित मालाला (कांदे) बाजारात भाव मिळत नाही आणि आहे त्या शेतातील मालाची नासाडी वादळी वारे आणि गारांचा पाऊस करीत असल्याने शेतकऱ्यांनी जगावे का नाही? असा सवाल जाणकार शेतकरी बांधवातून उठत आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी ढगाळ वातावरण होते आणि सायंकाळच्या सुमारास काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. २ ते ३ दिवस सलग सायंकाळी आभाळ येत असल्याने जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना पुन्हा अवकाळी पावसाचे भय वाटत होते मात्र किरकोळ पावसाच्या सरी पडल्याने कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसल्याचे जिल्हा आपत्ती विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, गतवर्षी १५ मे रोजीपासून पाऊस सुरू झाला आणि मे महिन्यातच मुसळधार होवून १०४ मिमीच्या पुढे पाऊस नोंदला गेला होता. यंदाही अवकाळी अशीच घाई करतो की काय? याची भीतीही जाणकार शेतकरी बांधवांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, सध्या पाऊस गायब झाला असला तरी गेल्या दोन दिवसांपूर्वी घटलेले तापमान पुन्हा वाढले आणि रविवारी तापमानाचा पारा ४१.६ अंश इतका झाला आणि सोलापूरकर रविवारी दिवसभर उकाड्याने झाले हैराण झाले.

सध्या महाराष्ट्रात ढगाळ वातावरणासोबतच उष्णतेची लाट आणि अवकाळी पावसाचे दुहेरी संकट कायम आहे. उत्तर प्रदेशातील चक्रीवादळ प्रणाली आणि छत्तीसगड ते कर्नाटकपर्यंतच्या ट्रफ लाईनमुळे राज्यात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह गारपिटीचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मे महिन्यात १५ तारखेनंतर अपेक्षित असलेला पाऊस यंदा ९ दिवस आधीच ढगाळ वातावरण निर्माण करत असल्याने गतवर्षीप्रमाणेच मे च्या १५ पासूनच पावसाळा सुरू होणार की काय? अशीही चर्चा सध्या शेतकरी बांधव करू लागले आहेत.

## ५४ मीटर येथे नवीन एस.टी. थांबा सुरू




### एकात्मता संस्थेच्या मागणीची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक ते मरिआई चौक दरम्यानचा थांबा पूल पाडल्याम ुळे बंद झाल्याने देगाव, बसवेश्वर नगर, दमाणी नगर व देशमुख पाटील वस्ती परिसरातील प्रवाशांचे हाल होत होते. त्यानंतर ५४ मीटर येथे नवीन एस.टी. थांबा सुरू करण्यात आला आहे.

एकात्मता बहुउद्देशीय संस्थेच्या मागणीची दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर, एकात्म ता बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक सचिन शिराळकर यांनी सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांच्याकडे निवेदनाद्वारे ५४ मीटर रस्त्यावर नवीन थांब्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत येथे नवीन एस.टी. थांबा मंजूर करण्यात आला असून त्याचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

या थांब्याचे उद्घाटन जीएम ग्रुपचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, एस.टी. स्थानक प्रमुख मल्लिकार्जुन अंजुर्गी आणि वाहतूक नियंत्रण अधिकारी संतोष जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या नवीन सुविधेमुळे तिऱ्हे, हिरज, कामती, शिंगोली तसेच मिरज, सांगली आणि कोल्हापूरकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

यावेळी बजरंग जाधव, सचिन हक्के, रसूल पठाण, दत्ता जाधव, विजय कंदलगावकर, दिगंबर सर्वगोड, विनायक धोत्रे, योगेश माने व विकी बनसोडे उपस्थित होते. एकात्मता बहुउद्देशीय संस्थेच्या पाठपुराव्याला यश आल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## खवणी येथे अवैध दारू वाहतूक पकडली

### २० लाखांचा मुद्देमाल जप्त; तीन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने मोहोळ तालुक्यातील खवणी येथे अवैध दारू वाहतुकीवर धडक कारवाई करत तब्बल १९ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

धनराज अविनाश भोसले (रा. पोखरापूर, ता. मोहोळ), ज्ञानेश्वर धर्मा उन्हाळे (रा. पोखरापूर, ता. मोहोळ) व अमर मोहन गिड्डे (रा. मोडनिंब, ता. माढा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे दरम्यान ८ मे रोजी मोहोळ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना खवणी येथील नागनाथ नर्सरीजवळ वरील तिघे आरोपी हे विनापरवाना दारूची वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता वरील तिघे आरोपी हे एका वाहनातून दुसऱ्या वाहनात अवैध दारू उतरविताना आढळून आले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपींना ताब्यात घेऊन देशी दारू टँगो पंच कंपनीचे ९० मिलीचे ७७ बॉक्स, बोलेरो कॅम्पर, स्विफ्ट कार तसेच दोन मोटारसायकली असा १९ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक अमित बाबर, पो. कॉ. हरिदास थोरात, घाडगे, दोरकर, शिंपाळे व चालक पवार यांनी पार पाडली.

## घरगुती भांडणात तणनाशक पिऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १० मे -**

घरगुती भांडणात तणनाशक पिऊन एका ४१ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना तळे हिप्परगा येथील राजदीप नगरात घडली.

नागराज कलच्या स्वामी (वय ४१ वर्ष , रा. मशरूम गणपती जवळ , तळे हिप्परगा सोलापूर) असे त्या मयत इसमाचे नाव असून त्यांनी आठ मे रोजी सकाळी घरामध्ये घरगुती भांडणाच्या कारणावरून पिकावर फवारणी करण्याचे तणनाशक औषध पिले होते. याचा त्रास होऊ लागल्याने तो उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाला असता त्याचा उपचारादरम्यान शनिवारी सायंकाळी सहा वाजता मृत्यू झाला.



## राष्ट्रीय लोक अदालतीत ४,३९२ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे शनिवार, दि. ९ मे रोजी वर्षातील दुसरी 'राष्ट्रीय लोकअदालत' घेण्यात आली. या लोकअदालतीत एकूण ६५,०५७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यातील ३५,८२० प्रलंबित आणि २९,२३७ दाखलपूर्व ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४,३९२ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली.

येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयांमध्ये या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ५५ कोटी ५२ लाख ८० हजार ८०६ रुपये रक्कमेची तडजोड करण्यात आली. यात २ वैवाहिक प्रकरणात तडजोड झाली. तालुका निहाय कामगिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मोठ्या संख्येने प्रकरणे निकाली काढण्यात आली. यात बार्शी तालुक्यात सर्वाधिक २,४५७ प्रकरणे निकाली निघाली, तर सोलापुरात ६३२ प्रकरणांत तब्बल ३९.८३ कोटींची तडजोड झाली. विशेष मोहिमेसाठी लोकअदालतीच्या दि. ४ मे ते ८ मे दरम्यान जिल्ह्यात 'विशेष मोहिम' राबवण्यात आली होती.

रोड एक्सीडेंट मध्ये मयत झालेल्या एका व्यक्तीच्या वारसांना जिल्हा न्यायाधीश व्ही. एस. मलकलपट्टे-रेड्डी व पॅनेलने विमा कंपनीसोबत यशस्वी तडजोड घडवून प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या हस्ते या कुटुंबाला नुकसान भरपाई म्हणून १९ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

लोकअदालतीत विविध बँका, बीएसएनएल, महावितरण, शहर वाहतूक शाखा आणि विविध पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुनील शिंदे यांच्यासह सर्व पॅनेल विधीज्ञ, लोकअभिरक्षक आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## 'आषाढी'चे यंदाही 'हायटेक' नियोजन



पंढरीत आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अनेक संतांच्या पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भावीक पंढरीत पायी चालत येतात. या आलेल्या भाविकांना सुलभ दर्शन व्हावे, त्यांची कोणतीही गैरसोय होणार; याची काळजी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. आतापासूनच घेत असून, या वारीचे हायटेक नियोजन सुरू झाल्याचे दिसून येत आहे.



गत दोन वर्षात आषाढी वारीचे नियोजन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अत्यंत नेटके केले होते. त्यांच्या कामाचे कौतुक मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विभागीय आयुक्तांनीही केले होते. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकीत नवीन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनीही वारीचे तगडे नियोजन आतापासूनच सुरू केले आहे. ऐनवेळी वारकऱ्यांची गैरसोय होवू नये यासाठी आतापासूनच त्यांनी पंढरपूर आणि पालखी मार्गातील सोयी-सुविधा पाहणीसाठी काही भेटीही दिल्या आहेत. वारीतील नियोजन समजून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मंदिर समितीचे पदाधिकारी, विश्वस्त, १० मानाच्या दिंडीचे प्रमुख यांची बैठक घेवून सविस्तर माहितीही घेतली आहे. काही पालखी म ार्गाची प्रत्यक्षात पाहणी करून प्रशासनातील सहकाऱ्यांना काही सुचनाही केल्या आहेत; पंढरपूर नगरपालिका, जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांना आतापासूनच त्यांनी कामाला लावले आहे. गतवर्षीच्या सप्टेंबरमधील अतिवृष्टी, महापुरात वाहून गेलेल्या रस्त्यांची डागडुजी चालू केली आहे, आवश्यक त्या ठिकाणी मुरमीकरण सुरू केले आहे. यासाठी पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी कार्तिकेयन हे प्रशासनातील सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवून त्यांना कामाची जबाबदारी वाटून देणार आहेत. एकंदरीत, मागील वारीतील राहिलेल्या त्रुटी पुन्हा समोर येवू नयेत यासाठी जिल्हाधिकारी आतापासूनच सुक्ष्म नियोजन करीत असल्याचे दिसून येत आहे. एकंदरीत, वारीत आलेल्या तमाम वारकऱ्यांना पंढरीत कसलीही अडचण येवू नये या हिशोबानेच त्यांची तयारी सुरू आहे.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे यंदा वारीचे पहिले वर्ष असल्याने त्यांनी वारीकडे लवकर लक्ष दिले आहे आणि त्यांनी नेटके नियोजन सुरू केले आहे. यंदाही जून म हिन्यात समाधानकारक पाऊस झाल्यास आणि खरिपाची पेरणी वेळेत झाल्यास पंढरीला जाणाऱ्या भाविकांची संख्या गतवर्षीप्रमाणे वाढण्याची शक्यता आहे. हा दृष्टीकोण समोर ठेवूनच जिल्हा प्रशासनाकडून नियोजन सुरू झाले आहे. भाविकांना पिण्याचे स्वच्छ पाणी, टॉयलेटची सोय, पावसाच्या भीतीपोटी जागोजागी जर्मन हँगर, रेनप्रुफ मंडप आदी सोय केली जाणार आहे. वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ, वाळवंट, दिंडी मुक्काम ाच्या ठिकाणांवर सुविधा देण्यासाठी कोणतीही कम तरता भासू नये, अशी नूतन जिल्हाधिकाऱ्यांची इच्छा आहे. गतवर्षीही मागील जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आषाढी वारी उत्साही वातावरणात व निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी ५३६ अधिकारी, ४२१२ कर्मचारी वृंद वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत ठेवले होते. त्याच धर्तीवर यंदाही प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी काम करणार आहेत. याचबरोबर जिल्हा पोलिस दलातील हजारो पोलिस अधिकारी-कर्मचारी वारी सोहळ्यासाठी तगडा बंदोबस्त ठेवणार आहेत. दरम्यान, सध्या गतवर्षीच्या वारीतील पेंडिंग कामांना गती दिली जात आहे.




गेल्यावर्षी ९४ ठिकाणी वॉटरप्रुफ मंडप उभारणी सुरू केली आहे. हे मंडप पालखी म ार्गावर ४ ते ५ किमीच्या अंतरावर उभारण्यात आले होते; यंदाही यामध्ये थोडी वाढच केली जाणार आहे. गर्दी वाढणार असल्याने पालखी मार्गावर शौचालयांमध्ये मोठी वाढ केली जाणार आहे. फिरती शौचालये वाढविली आहेत. जेटींग, सक्शन मशीन, सफाई कर्मचारी वाढविले आहेत. मोठ्या पावसाने चिखल होवू नये यासाठी जागोजागी मुरमीकरण केले जाणार आहे. एकंदरीत, पावसाचा अंदाज पाहून यंदा हे मुरमीकरण केले जाणार आहे.

भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शुध्द पाणीबॉटल, लिंबू शरबत वाटप, ओआरएसची भाविकांना सोय जाणार आहे. बाईक ॲम्बुलन्स, मेडिसीन कीट, दक्षता कक्ष, ॲम्बुलन्सची सोय केली जाणार आहे.



इतकेच नाहीतर दक्षता कक्ष, व्हिआयपी कक्ष, यात्रा नियंत्रण कक्षही निर्माण केले जाणार आहेत. भाविकांची गर्दी होवून चेंगराचेंगरी होवू नये यासाठी काही हॉटस्पॉट शोधून त्या ठिकाणी प्रत्येकी काही पोलिस कर्मचारी तैनात करण्याचे नियोजन सुरू केले आहे. चंद्रभागेतील ओव्हरलोड होडीधारकांवर कारवाई करण्यासाठी कर्मचारी नेमले जाणार आहेत, वारकऱ्यांना गॅस कनेक्शन नीट जोडून देणे, वीज कनेक्शनसाठी वीज कर्मचारी, भाविकांसाठी वायरलेस टेलिफोन बुथ, वायफाय सुविधा देण्यात येणार आहेत. इंटिग्रेटेड कंट्रोल रूम, वायरलेस टेलिफोन (२ जी) आमच्या अधिकाऱ्यांकडे देण्यात येणार आहेत. तर पंढरीत विविध ठिकाणी वायफायची सुविधा करण्यात येणार आहे. एकंदरीत, शासनाकडूनही वारीसाठी अनुदान मागणी करणार आहोत आणि या अनुदानातून भाविकांना चांगल्या सोयी देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रयत्न राहणार आहे.

वारंवार वारीसाठी बैठका घेणे, स्पॉट पाहणी करणे, पालखी मार्गाची पाहणी करून अधिकाऱ्यांना वारंवार सुचना देणे, आषाढी वारी मध्ये सर्व मानांच्या पालख्या व अन्य पालख्या प्रमुख व विश्वस्त यांच्या सूचनेप्रमाणे पालखी मार्ग, पालखी मुक्काम ठिकाण, विसावा ठिकाणी व रिंगण व पंढरपूर शहरात वाखरी येथे आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही जिल्हा प्रशासनाची टीम सतत काम करताना दिसणार आहे. एकंदरीत, प्रतिवर्षी या सर्व कामांत जिल्हाधिकाऱ्यांना त्यांचे सहकारी, अधिकारी, कर्मचारीही तितकीच साथ देत असतात. या समन्वयामुळेच वारीचा हा सुखसोहळा यंदाही देखणाच करून दाखविणार असल्याचा आत्म विश्वास जिल्हाधिकारी कार्तिकेयन व्यक्त करीत आहेत. नूतन जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर यंदा कॉरिडॉरचा विषयही आहे आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शन रांगेत दर्शन मंडप व स्काय वॉकच्या माध्यमातून भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी, यासाठी १२९ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला होता. त्या कामाचे भूमिपूजन आजच सोमवार, दि. ११ रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते केले जाणार आहे. यामुळे भाविकांना सोयी-सुविधा देताना मंदिर कॉरिडॉर, दर्शन मंडप व स्काय वॉक आदी कामांकडेही जिल्हाधिकाऱ्यांना यंदा लक्ष द्यावे लागणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### संतोष ठोंबरे यांना डिजिटल मीडिया संपादक संघटनेचा राष्ट्रीय महागौरव पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. १० मे-**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील केटी ट्रॅक्टर्स उद्योग समुहाचे प्रमुख उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते संतोष ठोंबरे यांना कृषी, उद्योग व सामाजिक कार्याबद्दल महागौरव पुरस्कार २०२६ गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते गोवा कला अकादमीच्या सभागृहात प्रदान करण्यात आला. डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या येथे पार पडलेला तिसऱ्या राष्ट्रीय महाअधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, विविध क्षेत्रातील १२ विभूतींचा महागौरव २०२६ हा राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. त्यात संतोष ठोंबरे यांचा ट्रॅक्टर उद्योग-व्यापार क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरी, कृषी व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष व गोव्याचे समाजकल्याण मंत्री सुभाष देसाई, महाराष्ट्र राज्याच्या आयुष्मान भारत योजनेचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, महाराष्ट्र भाजप किसान मोर्चाचे अध्यक्ष रामकृष्ण वेताळ, डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने उपस्थित होते.



### ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून चार किलो गांजासह तरुणास अटक

**सोलापूर, दि. १० मे-**

ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने माचनूर (मंगळवेढा ) येथे एका दुचाकी स्वारास अटक करून सव्वा लाख रुपये किमतीचा ४ किलो गांजा जप्त केला आहे. शाहू आली धावड (रा. ब्रह्मपुरी तालुका मंगळवेढा) असे त्या अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे इसमांची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करणे बाबत आदेशित केले होते.या दरम्यान पोलीस पथकातील पो. कॉ. राहुल देवकर यांना वरील आरोपी हा ९ मे रोजी माचनूर येथील उड्डाणपुलाचे बाजूस अमली पदार्थ गांजा घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी माचनूर येथील उड्डाणपुलाचे बाजूस सर्विस रोडवर सापळा लावला असता वरील आरोपी हा मोटरसायकल आला तेव्हा पोलिसांनी त्याला पकडले. माहितीप्रमाणे त्याच्या जवळील सॅकमध्ये गांजा आढळून आला. पोलिसांनी ४ किलो १२८ ग्रॅम गांजासह मोटरसायकल, मोबाईल व सॅक असा एकूण १ लाख २७ हजार ६६० किमतीचा मुद्देमाल जप्त करून मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप ,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित बाबर व पोलीस अंमलदार नीलकंठ जाधवर, सलीम बागवान, विरेश कलशेट्टी, जयवंत सादुल, राहुल दोरकर, हरीश थोरात, अन्वर आतार, सुनील पवार, बाळराजे घाडगे, राजेंद्र गवेकर यांनी पार पाडली आहे.






### लोकविकास स्कूलचा दहावीचा ९३.३३ टक्के निकाल; जोया तांबोळी प्रथम

**वेळापूर, दि. १० मे-**

लोकविकास मराठी मिडीयम स्कूलचा दहावी परीक्षेचा निकाल यंदा ९३.३३ टक्के लागला. परीक्षेस बसलेल्या ३० विद्यार्थ्यांपैकी २८ विद्यार्थी यशस्वी ठरले. जोया सुरज तांबोळी हिने ९४.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. काजल धर्मेंद्र निषाद हिने ९३ टक्के गुणांसह द्वितीय, सायली सचिन मुंगुसकर हिने ८६.८० टक्के गुणांसह तृतीय, तर पायल चांगदेव नवले हिने ८६.६० टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक मिळविला. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, मुख्याध्यापक अमोल पांढरे, अजित बनकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापक सुनिल पताळे तसेच विजया चापले, सिनाप्पा शेंडगे, राया वाघमारे आणि ऋषिकेश राऊत या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

### रस्ते अपघातात बोरामणी येथील वृध्द ठार

**सोलापूर, दि. १० मे-**

रस्ते अपघातात बोरामणी येथील एका ७८ वर्षीय वयोवृद्ध इसमाचा मृत्यू झाल्याची घटना सोलापूर पुणे महामार्गावर कोळेगाव येथे आर के हॉटेल समोर शनिवारी रात्री घडली . जयवंत निवृत्ती कांबळे (वय ७८ वर्ष , राहणार वरळेगाव, बोरामणी दक्षिण सोलापूर ) असे त्या मयत वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. शनिवारी संध्याकाळी साडेसात वाजता मोहोळ सोलापूर महामार्गावर कोळेगाव शिवारात सदर वृद्ध व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या अवस्थेत आढळून आला .त्यास रुग्णवाहिकेतून इरेश कसा यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान मध्यरात्री मृत्यू झाला.

### कासेगाव येथे वृध्द पित्यास चाकूने मारहाण

**सोलापूर :** शेतीच्या कारणावरून वृद्ध वडीलाच्या डोक्यात चाकूने मारून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी जखमीचा मुलगा मदार गुलाव तांबोळी (रा. कासेगाव) याच्याविरुद्ध सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुलाब महंमद तांबोळी (वय ७८. ग. कालेगाव) असे जखमीचे नाव आहे. ते सकाळी सोलापुरान वॉचमनची ड्युटी करून कासेगाव येथे घरी निघाले होते. महादेव मंदिरासमोर सकाळी आठ वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा मदार हा त्याच्या मोटरसायकलवरून तेथे आला आणि शेतीच्या कारणावरून त्यांना शिवीगाळ करीत चाकूने मारून जखमी केले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत तिरुपती बालाजी देवदर्शन

## रावगावच्या लक्ष्मण बुधवंत यांचा पुढाकार; सलग बाराव्या वर्षी यशस्वी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १० मे-**

करमाळा तालुक्यातील रावगाव येथील लक्ष्मण बुधवंत यांच्या संकल्पनेतून आणि हैदराबाद येथील सामाजिक कार्यकर्ते वेणूकुमार चुक्ला यांच्या सहकार्याने दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत तिरुपती बालाजी देवदर्शन घडवून आणणारा प्रेरणादायी व सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम यंदाही यशस्वीरीत्या पार पडला.

श्री अष्टोदरा शताः १०८ चुक्ला चॅरिटेबल ट्रस्ट, हैदराबाद आणि वेणू व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट, रावगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंध्र प्रदेशातील पिरमलु येथील १०८ दिव्यांग विद्यार्थ्यांची श्री तिरुपती बालाजी देवदर्शन यात्रा भक्तिभावपूर्ण वातावरणात आणि काटेकोर



नियोजनात पार पडली. हा उपक्रम केवळ यंदाच मर्यादित नसून, गेल्या सलग बारा वर्षांपासून लक्ष्मण बुधवंत यांच्या पुढाकारातून दिव्यांग विद्यार्थ्यांना तिरुपती बालाजी देवदर्शनाचा लाभ देण्यात येत आहे. दरवर्षी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद आणि भक्तीभाव पाहिल्यावर खऱ्या अर्थाने ईश्वरसेवा केल्याचे समाधान मिळते, अशी भावना लक्ष्मण बुधवंत यांनी व्यक्त केली.

यात्रेदरम्यान दिव्यांग विद्यार्थ्यांना तिरुमला येथील श्री वेंकटेश्वर (बालाजी) भगवानाचे मनोभावे दर्शन घडले. दर्शनावेळी गोविंदा गोविंदा, जय बालाजी जय जय बालाजी या जयघोषांनी संपूर्ण तिरुमला परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद पाहून उपस्थित भाविकही भावूक झाले.

यात्रेच्या आयोजनात प्रवास, निवास, भोजन तसेच देवदर्शनाची संपूर्ण व्यवस्था अत्यंत काळजीपूर्वक आणि शिस्तबद्धरीत्या केली होती. यात्रेप्रसंगी चुक्ला चॅरिटेबल ट्रस्टचे सर्वेसर्वा वेणू कुमार चुक्ला, लक्ष्मण बुधवंत, डॉ. योगेश पाटील यांच्यासह ट्रस्टचे कर्मचारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानमचे अध्यक्ष, सर्व ट्रस्टी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुलभ देवदर्शनाचा लाभ मिळाला.

दिव्यांगांच्या जीवनात आत्मिक समाधान, सकारात्मकता आणि आत्मविश्वास निर्माण करणारा हा उपक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण ठरत आहे. चुक्ला चॅरिटेबल ट्रस्ट आणि वेणू व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या या स्तुत्य कार्याबद्दल समाजातील विविध स्तरांतून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## घटस्फोटित पुनर्विवाह काळाची गरज : चंद्रकांत पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने शिवस्मारक सभागृह येथे विधवा विधुर घटस्फोटीत पुनर्विवाह परिचय मेळावा पार पडला.

शिवस्मारक सभागृहांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली संभाजी ब्रिगेडच्या वतीने पहिल्यांदाच सोलापूर मध्ये विधवा विदुर घटस्फोटीत पुनर्विवाह परिचय मेळाव्याचे



आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ५७ विधवा विदुर यांनी मेळाव्यास उपस्थित राहून नोंदणी केली.

या मेळाव्यास चंद्रकांत पवार वसुंधरा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पाश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, विक्रम वानकर, दिलीप भोसले, मराठा सेवा संघाचे रमेश जाधव, मनीषा कोळी, माधुरी चव्हाण, अंजली पवार, विशाल साळुंके, प्रशांत चौरे, मिलिंद मस्के, शिवाजी थोरात, ओंकार कदम, शिरीष जगदाळे, तात्या इंगोले आदी उपस्थित होते.



## पंढरपुरात दोन ठिकाणी अवैध दारुसाठ्यावर कारवाई

### १५ हजारांचा दारुसाठा जप्त; दोन जणांना घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मे-**

पंढरपूर तालुका पोलिसांनीतालुक्यातील पोहोरगाव व शेगाव येथे अवैध दारूसाठ्यावर कारवाई केली. या कारवाई मध्ये एकूण पंधरा हजारदोनशे रुपयांचा दारू साठा जप्त केल्याचीमाहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

या कारवाई संदर्भात माहिती देताना पोलिस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले की, ९ मे २०२६ रोजी पंढरपूर तालुका पोलिसांनी आगामी यात्रा, सण आणि उत्सवच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पोहोरगाव आणि शेगाव याठिकाणी अचानक छापामारी केली. या कारवाई दरम्यान अवैध दारू साठ्यावर रेड करून एकूण पंधरा हजार दोनशे रुपयांचा देशी-विदेशी दारू साठा जप्त केलेला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीं बंडू यासीन सय्यद ( वय ५२, रा.पोहोरगाव ) आणि नरेश सुरेश दुध्दम(वय ४०, रा. शेगाव ) याचे विरुद्ध मुंबई दारूबंदी कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असल्याची देखील माहिती त्यांनी दिली.

दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे, आबासाहेब शेंडगे, पोलीस हवालदार गावडे पोलीस हवालदार सुजित उबाळे, सुभाष देशमुख, दीपक भोसले, पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ यांच्या पथकाने केली.

## बुधवारपासून रामलिंग चौडेश्वरी यात्रेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १० मे-**



वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथील ग्रामदैवत श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रेस बुधवार दि. १३ मे पासून सुरुवात होत आहे. यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

दि. १३ मे रोजी पहाटे पाच वाजता रुद्राभिषेक पूजेने सुरुवात होऊन रात्री आठ वाजता वामनायक मिरवणूक निघणार आहे. दि. १४ मे रोजी रात्री आठ वाजता नरसिंह मिरवणूक होईल. दि. १५ मे रोजी बाळबट्टल मिरवणूक मध्यरात्री १२ वाजता ढोल ताशाचा गजरात मिरवणूक निघून संपूर्ण गावाला प्रदक्षिणा घालत मंगळवार दि. १६ मे रोजी सकाळी सात वाजता श्री चौडेश्वरी मंदिर येथे परत पोहोचतील. त्याच दिवशी दुपारी १२ वाजता चौडेश्वरी देवीच्या मंदिरापासून ते हनुमान मंदिरापर्यंत कुंभ मिरवणूक, चौडेश्वरी मुकुट मिरवणूक होईल. रात्री आठ वाजता नागफणी (बाशिंग) व नंदीध्वज तसेच पालखीचे मिरवणूक निघणार आहे. दि. १७ मे रोजी सायंकाळी सात वाजता रथोत्सव व नागफणी, नंदीध्वज तसेच श्री चौडेश्वरी मातेची मुकुट मिरवणूक होईल. याच दिवशी रात्री करमणूक म्हणून माळी समाजाच्या वतीने कन्नड नाटकाचे आयोजन केले आहे. दि. १८ मे रोजी रात्री करमणूक म्हणून हटगार(कोष्टी) समाज कडून कन्नड नाटकाचे कार्यक्रम होईल. दि.१५ तारखेपासून १७ तारखेपर्यंत २४ तास महाप्रसाद सेवा करण्यात येणार आहे. यात्रेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टीचे अध्यक्ष श्री चनबसप्पा खैराटे व ट्रस्टीचे विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

> वळसंग ग्रामदैवत चौडेश्वरी यात्रेसाठी वळसंग पोलीस शांती व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी घेतली आहे. यात्रेत कोणताही प्रकारची अनुचित कार्य होणार नाही याकडे पोलिसांची नजर राहतील तसेच पोलिसांकडून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याकडे सुद्धा लक्ष देण्यात येईल. पोलिसांना नागरिकांनी सहकार्य करावे,
>
> **- राहुल डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक**

## पिलीव येथील जवाहरलाल शेतकी विद्यालयाचा दहावीचा निकाल ९४ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या जवाहरलाल शेतकी विद्यालयाचा मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीचा बोर्ड परीक्षेला ५१ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर तिन विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असुन विद्यालयाचा निकाल ९४.११ टक्के एवढा लागला आहे. यामध्ये प्रथम तीन विद्यार्थी (१) स्नेहल शिकारे ८३.४० टक्के, वैष्णवी शिकारे ७७.६० टक्के, अक्षदा कोळेकर ७४.८० टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे चेअरमन अमरसिंह देशमुख, पिलीव शाखेचे राजेंद्रसिंह जहागिरदार, तसेच संस्थेचे सचिव एच.यु पवार, चौगुले, गायकवाड, नामदास, मुख्याध्यापक देशमुख यांनी अभिनंदन केले.

## जुळ्या भावंडांचे दहावीतील यश चमकदार

### स्नेहा माळगेला ९१.२० टक्के, समर्थ माळगेला ७७ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

आई-वडिलांचे शिक्षण दहावीपर्यंतच वडील सार्वजनिक बांधकाम विभागात वाहनचालक, आई गृहिणी, तर आजी आजही शेतात राबणारी. अशा साध्या, कष्टकरी कुटुंबातील जुळ्या भावंडांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत जिद्दीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

स्नेहा माळगे हिने ९१.२० टक्के, तर तिचा जुळा भाऊ समर्थ माळगे याने ७७ टक्के गुण मिळवत दहावीची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. स्नेहा हिने श्री सिद्धेश्वर कन्या प्रशाला, तर समर्थ याने






श्री सिद्धेश्वर प्रशाला येथे पहिलीपासून शिक्षण घेतले. घरातील परिस्थिती साधी असली तरी शिक्षणाबाबत कुटुंबाने कधीही तडजोड केली नाही.

वडील नोकरीनिमित्त दिवसभर कामात व्यस्त असायचे.

> **शिकवणी न लावता स्व-अभ्यासावरच भर**
>
> आई रुपाली माळगे घरची जबाबदारी सांभाळून सासू रत्नाबाई माळगे यांना मदत करण्यासाठी मूळ गावी दोड्याळ (ता. अक्कलकोट) येथे शेतकामासाठी जात असत. अशा परिस्थितीतही दोन्ही भावंडे दररोज रिक्षाने शाळेत जाऊन अभ्यासात सातत्य ठेवत राहिली. खाजगी शिकवणी न लावता स्व- अभ्यासावरच त्या दोघांनी भर दिला. कष्ट, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे माळगे कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. दोघांच्या या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते मल्लिनाथ करपे यांच्यासह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बार्शीत राष्ट्रीय लोकअदालत २ हजार ४५७ प्रकरणे निकाली

## २ कोटी २७ लाखांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर श्री. एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर श्री. एस. एस. शिंदे यांचे सहकार्याने, बार्शी तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ बार्शी यांच्या संयुक्त विदयमानाने तसेच अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती बार्शी तथा जिल्हा न्यायाधीश १ श्री. विक्रमादित्य के. मांडे यांचे अध्यक्षतेखाली बार्शी न्यायालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीत ७८ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पूर्व २३७९ असे एकुण २४५७ इतकी प्रकरणे राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये तडजोडीने मिटवुन त्यात सुमारे प्रलंबित प्रकरणात अनुक्रमे १ कोटी ५१ लाख ६६ हजार १९१ रुपये व दाखलपूर्व प्रकरणांत



७५ लाख ६६ हजार ७४ रुपयांची वसुली झाली.

या राष्ट्रीय महालोकअदालतीत बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ३७२१ व दाखलपूर्व ६५०४ असे एकुण १०२२५ प्रकरणे लोकअदालत पॅनलमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयातील एकुण चार पॅनल करण्यात आले होते. त्यात जिल्हा न्यायाधीश १ श्री. विक्रमादित्य के. मांडे, सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर श्रीमती पी. व्ही. राऊत, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर श्रीमती एच. यु. यु. पाटील, ४ थे सहदिवाणी न्यायाधीश क स्तर श्रीमती आर.पी. बागडे असे एकुण चार पॅनल होते.

तसेच २रे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर श्रीमती जी. एस. पाटील यांचे गुन्हा कबुलीचे विशेष न्यायालय चालु ठेवण्यात आले होते. विशेष बाब म्हणजे पॅनल क. ४. श्रीमती आर. पी. बागडे, सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे पॅनलसमोर वयोवृध्द पक्षकार सखुबाई शंकर गवळी यांचे तडजोडीकामी न्यायाधीश स्वता दालनाबाहेर गेले व तडजोडीबाबत पूर्तता केली. जिल्हा न्यायालयातील मोटार अपघात प्रकरणांत एकुण १ प्रकरण तडजोडीने मिटुन त्यात सुमारे १२ लाख हजार इतक्या रक्कमेची नुकसान भरपाई मंजुर करण्यात आली. एन. आय. क्ट १३८ च्या एकुण १३ प्रलंबित प्रकरणांत तडजोड होवुन त्यात सुमारे २० लाख १७ हजार ६०० रुपयांची वसुली तर रक्कम वसुलीच्या १ प्रकरणांत तडजोड होवुन त्यात १० लाख १९ हजार ८८१ रुपयांची वसुली झाली.

न्यायालयातील प्रलंबित कबुलीची ५७ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे ४१ हजार २०० रुपयांची दंड वसुल करण्यात आला. सदर लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी मोठ्या प्रमाणांत सहभाग नोंदविला. राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये यशस्वी करणेकामी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, पॅनल विधीज्ञ, सर्व न्यायालयातील कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँका तसेच फायनान्स कंपन्या, पंचायत समिती बार्शी, वीज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सोहम शेंडे याची भारतीय वनसेवा अधिकारीपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १० मे-**

सोहम शेंडे यांनी यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत ७५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होत भारतीय वनसेवा अधिकारीपदाला गवसणी घातली आहे.



भारतीय वनसेवा अधिकारी म्हणून त्याची निवड होणे ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बाब आहे. लोकविकास शिक्षण संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर यांच्या भगिनी वैशाली शेंडे यांचे ते सुपुत्र असून सध्या फलटण तालुक्यात कोळकी या ठिकाणी राहत आहेत. बनकर कुटुंबासाठी ही अभिमानाची बाब आहे. संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, सोमनाथ बनकर, आनंद बनकर, भागवत गायकवाड, मुख्याध्यापक सुनील पताळे, अमोल पांढरे, अजित बनकर यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या

## महत्त्वाचे...



### अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने पंचागकर्ते मोहन दाते यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १० मे-**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आयोजित ब्राह्मण मेळाव्यात समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचे सन्मान करण्यात आले. यामध्ये सोलापुरातील सुप्रसिद्ध दाते पंचागकर्ते मोहन दाते यांचा सन्मान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आला. याप्रसंगी महंत सुधीर दास, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष गोविंद कुलकर्णी, आ. भीमराव तापकीर, प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, पंचांगकर्ते मोहन दाते, प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, महेश चिटणीस, मंदार रेडे आदी मान्यवर आणि समाज बांधव उपस्थित होते.



### दहावी परीक्षेत सुलाखे हायस्कूलचे उज्वल यश

**बार्शी, दि. १० मे-**

येथील सुलाखे हायस्कूल, बार्शीचा दहावीचा निकाल ९६ टक्के लागला. अभिनंदन नवले याने ९९.२० टक्के गुणांसह प्रशालेत प्रथम क्रमांक पटकाविला. प्रिती टोणगे हिने ९७.८० टक्के गुणांसह द्वितीय तर प्रज्ञा तोडकरहिने ९७.४० टक्क्यांसह तृतीय क्रमांक पटकाविला. परीक्षेसाठी प्रशालेतील बसलेल्या ३५० विद्यार्थ्यांपैकी ४७ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले. १३९ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ९१ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ७३ विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर ३३ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे, मुख्याध्यापक रामकृष्ण इंगळे, उपमुख्याध्यापक, प्रसन्न देशपांडे, पर्यवेक्षिका उर्मिला जावळे व पर्यवेक्षक वैभव कदम यांनी केले.



### बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त एसटीच्या सवलतीचे पास काढण्याचे शिबीर

**सोलापूर, दि. १० मे-**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त शिवसेना शाखा प्रभाग क्र. पाच वसंत विहारच्यावतीने महिलांसाठी एसटीच्या सवलतीचे पास काढण्याचे शिबीर आयोजित केले होते. यांप्रसंगी २५० महिलांचे पास काढून त्याचे वितरण जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण महानगरप्रमुख महेश धाराशिवकर यांच्या हस्ते करण्यात आले. उपक्रमाचे महिलांतून स्वागत करण्यात आले. यांप्रसंगी विधानसभा संघटक सुरेश जगताप, शहर उपप्रमुख आबा सावंत, जिल्हा संघटिका मंगल थोरात, शहर संघटिका स्वाती रुपनर, शाखाप्रमुख राहुल परदेशी, मारुती खानापुरे, मंगेश क्षीरसागर उपस्थित होते.

### प्रणया साळुंके हिचा वटवृक्ष मंदिरात सत्कार

**अक्कलकोट, दि. १० मे -**



येथील श्री शहाजी प्रशालेची विद्यार्थिनी प्रणया साळुंके हिने शालांत परीक्षेत तालुक्यात दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळवले आहे. तिच्या कामगिरीबद्दल येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी तिचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. सत्कारप्रसंगी नगरसेवक महेश इंगळे यांनी प्रणया साळुंखे दहावीत उज्वल यश मिळवल्याने तिच्या भावी जीवनाचा पाया रोवला गेला आहे. पण अलीकडील काळात तालुक्यात साक्षरतेचे प्रमाणही वाढत आहे. जेणेकरून भविष्यातही अक्कलकोट तालुक्याचे नांव शैक्षणिक पटलांवर उज्वल होत राहील, असे मनोदय व्यक्त केले. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, माजी नगरसेवक रामचंद समाणे, परधनेश साळुंखे, विपूल जाधव, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार आदींनी प्रणया साळुंखे हिचे कौतुक केले.

## माऊली आणि तुकोबा रथाच्या बैलांसाठी यंदा खास मंडप

### आषाढी वारी : पावसामुळे होणारी गैरसोय टळणार; जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

प्रतिवर्षी पंढरीच्या आषाढी वारीत संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचा रथ ओढणाऱ्या बैलांची मुक्कामाच्या ठिकाणी पावसामुळे गैरसोय होत असल्याची माहिती मिळाल्याने यंदा आम्ही या दोन्ही रथांच्या बैलांसाठी खास मंडप उभारणी करून त्यांचा पाऊस, वादळ-वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी सुरक्षित अशा ठिकाणी व्यवस्था करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी दिली.




संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगत्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी ही आळंदी आणि देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवत असते. या रथासांठी मानकऱ्यांच्या बैलांना मान दिला जातो. गतवर्षीपासून देहू संस्थानने संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारीचा पालखी रथ ओढण्यासाठी देहू संस्थानच्याच नव्या बैलजोड्या खरेदी केल्या असल्याचे सांगण्यात आले. तर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यातील रथासाठी दरवर्षी विविध भागातील मानाच्या बैलजोड्या निवडल्या जातात, ज्या खिलार जातीच्या आणि देखण्या असतात. २०२५ च्या वारीसाठी बावधन येथील गणा बापू कदम यांची 'प्रधान व राजा' जोडी, तसेच घुंडरे कुटुंबाची 'सावकार व संग्राम' यांसारख्या प्रसिद्ध जोड्या रथासाठी निवडण्यात आल्या होत्या. या बैलांना दररोज खारीक, खोबऱ्याचा भुगा, पेंड, आणि शाळूची वैरण असा विशेष पौष्टिक आहार दिला जातो. इतकेच नाहीतर रथ ओढण्यासाठी या बैलांना विशेष सराव, बैलगाडी ओढण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

वारकरी परंपरेत या बैलांना 'माऊलींचे सारथी' मानले जाते आणि त्यांना मानाचे स्थान असते. या बैलजोड्यांची गैरसोय होवू नये म्हणून सोलापूरचे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी त्या बैलजोड्यांची मुक्कामाच्या ठिकाणी विशेष सोय केली आहे; जेणेकरून त्यांना ऊन, वारा, पाऊस लागणार नाही.

#### यंदाही वारकऱ्यांना टोल नाही

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीसाठी पंढरीत दाखल होणाऱ्या भाविकांना टोलनाक्यांवर टोल घेवू नये म्हणून मंत्रालय स्तरावरून सुचना येणार आहेत. त्या सुचनांचे पालन करून महामार्ग अधिकाऱ्यांनी भाविकांसाठी टोलनाके खुले करावेत, त्यांच्याकडून अजिबात टोल घेवू नयेत, अशा सुचना मीही देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

## सुयश विद्यालयाचा बोर्ड परीक्षेत झेंडा

### सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे-**



एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. बार्शीतील सुयश विद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या नावाप्रमाणे 'सुयश' संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विद्यालयाने तालुक्यात गुणवत्तेतील आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्ण न होता, गुणांच्या टक्केवारीतही मोठी मजल मारली आहे. ४५ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत. २४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांचा टप्पा ओलांडून विशेष प्राविण्य मिळवले. ८१% ते ९०% दरम्यान ६७ विद्यार्थी आहेत. उर्वरित सर्व विद्यार्थी उच्च श्रेणीत आहेत. गणितात 'शंभर पैकी शंभर' गुणांसह विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी कामगिरी अक्षरा शिनगारे हिने ९९.४०% गुणांसह विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. सलोनी माने (९८.८०%) आणि प्रथमेश गोडगे (९८.२०%) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. विशेष कौतुकाची बाब म्हणजे, अपर्णा तुपे हिनेही गणितात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले.

विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलवडे यांनी मेहनत, जिद्द आणि गुणवत्ता हेच आमच्या यशाचे सूत्र आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी घेतलेले कष्ट फळाला आल्याचे सांगितले. यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शिका नलवडे, प्रसाद नलवडे, मुख्याध्यापिका जगताप, उपमुख्याध्यापक येवले यांनी अभिनंदन केले आहे.

## निरा देवधर प्रकल्पात समावेशासाठी मुख्यमंत्र्यांना अकरा हजार सह्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० मे-**

माळशिरस तालुक्यातील उर्वरित दुष्काळी गावांचा निरा देवधर प्रकल्पात समावेश करुन घेण्याच्या मागणीसाठी सुमारे ११ हजार सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

निरा देवधर मुळ प्रकल्पातील कारूंडे, पिंपरी, लोणंद, रेडे, गिरवी, मांडवे, मांडकी, कण्हेर, इस्लामपूर, भांबुर्डी, गोरडवाडी, मोटेवाडी या गावांसाठी ताबडतोब टेंडर काढावे. तसेच तालुक्यातील कायम दुष्काळी बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, कोळेगाव, जळभावी, गारवाड, मगरवाडी, कोथळे, भांब, पठाणवस्ती, तरंगफळ, काळमवाडी, लोंढे मोहितेवाडी, चांदापुरी, फडतरी, पिलीव या गावांसाठी तातडीने उपसा सिंचन योजनेचे ताबडतोब टेंडर काढावे असेही निवेदनात म्हटले आहे. शिवराज पुकळे यांनी या सर्व गावांचा ९ मे ते १४ मे या दरम्यान दौरा करुन सह्या घेऊन निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री, पालकमंत्री जयकुमार गोरे यांना देणार असल्याचे सांगितले.

#### जनतेला हक्काचे पाणी मिळवुन देणारच

मी जरी भाजपचा असलो तसेच माझ्या पक्षाचे सरकार केंद्र व राज्यात असले तरीही दुष्काळी भागातील जनतेला दिलेला पाण्याचा शब्द आपण अजिबात बदलणार नाही. यासाठी सातत्याने मी शासनाकडे पाठपुरावा करुन या भागातील जनतेला हक्काचे पाणी मिळवुन देणारच.

**- शिवराज पुकळे, सामाजिक कार्यकर्ते.**

## बनावट कागदपत्राद्वारे तीन फ्लॅटचा ताबा मिळविला; तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

खोटी व बनावट कागदपत्राद्वारे गृहप्रकल्पात घुसखोरी करून बेकायदेशीरपणे तीन फ्लॅटचा ताबा मिळवल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तिघा जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविंद्र ज्ञानोबा पाटील, उमा दत्तात्रय लोकरे आणि राहुल किशोर परमार (रा. सोलापूर ) असे गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे असून याबाबत विद्या मिलिंद लोलगे (वय ५६, रा. जिद्द ब्रम्हचैतन्य नगर, विजापूर रोड) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी विद्या लोलगे या प्रेषक रेसिडेन्सी वसंत विहार गृहप्रकल्पाच्या पार्टनर आहेत. वरील आरोपींनी संगनमत करून २००९ ते २०२२ या कालावधीत प्रकल्पातील प्लॉट नंबर १०४, २०२ आणि ४०१ चा व्यवहार करताना फिर्यादीची फसवणूक केली आहे. आरोपींनी केवळ इसारा पावती करून घेतली होती. मात्र, कोणतेही कायदेशीर 'रजिस्टर खरेदी खत' किंवा ताबा प्रमाणपत्र नसतानाही त्यांनी या मालमत्तेवर ताबा मिळवला. विशेष म्हणजे, फिर्यादीला कोणतीही माहिती न देता किंवा त्यांच्याशी संपर्क न साधता प्लॉटचा बेकायदेशीर ताबा घेऊन फिर्यादीची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार बावणे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.


## चिमुकल्याच्या मदतीसाठी शिखर पहारिया फाउंडेशन धावले

### हृदय शस्त्रक्रियेसाठी मुंबईकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

सैफुल परिसरातील बसवराज जवळगे यांच्या अवघ्या चार दिवसांच्या चिमुकल्या बाळाला हृदयाशी संबंधित गंभीर आजार असल्याचे निदान डॉक्टरांनी केले असून तातडीच्या शस्त्रक्रियेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. या नाजूक अवस्थेत बाळाला पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

अत्यंत कठीण आणि चिंताजनक परिस्थितीत कुटुंबावर मोठा मानसिक व आर्थिक ताण निर्माण झाला असताना, माणुसकीचा हात पुढे करत शिखर दादा पहारिया यांनी मदतीचा आधार दिला आहे. या निरागस जीवाचे प्राण




वाचवण्यासाठी त्यांनी तत्काळ सहकार्य करत कुटुंबाला दिलासा दिला आहे.सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारे शिखर दादा पहारिया हे अशा प्रसंगी अनेकांसाठी आधारवड ठरत आहेत. त्यांच्या या सहकार्यामुळे जवळगे कुटुंबाला मोठा धीर मिळाला असून, बाळाच्या उपचारासाठी आवश्यक असलेली मदत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

दरम्यान, संबंधित डॉक्टरांच्या देखरेखीखाली मुंबईत बाळावर आवश्यक वैद्यकीय उपचार सुरू करण्यात येणार असून, बाळाच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी सर्वत्र प्रार्थना व्यक्त होत आहे.

मानवी मूल्ये जपणाऱ्या अशा संवेदनशील मदतीमुळे समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरत असून, संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.या बाळाला लागणाऱ्या उपचाराची माहिती रुग्णसेवक आशम फुलमामडी यांनी दिल्यानंतर

शिखर पहारिया फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत केली.

## 'सीतामाई'तून दररोज २ लाख लिटर पाणी उपशास मंजुरीचा प्रस्ताव सादर

### मंद्रूपच्या पाणीटंचाईवर दिलासा !

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप गावाच्या पाणीटंचाईवर तात्पुरता दिलासा देण्यासाठी जिल्हा परिषद जलसंधारण विभागाने महत्त्वाचा प्रस्ताव जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीसमोर ठेवला आहे. टंचाई कालावधीत मंद्रूप पाणीपुरवठा योजनेसाठी 'सितामाई तलाव' अर्थात रूपांतरित साठवण तलावातून दररोज दोन लाख लिटर पाणी उपसा करण्यास ग्रामपंचायतीला परवानगी देण्याचा विषय समितीच्या सभेपुढे सादर करण्यात आला.

ग्रामपंचायत मंद्रूपने १६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या पत्रानुसार, भीमा नदी पात्रातून टाकळी व कुरघोट येथील पंपहाऊसद्वारे होणारा पाणीपुरवठा अत्यंत कमी झाला आहे. नदीपात्रातील पाणीसाठा संपुष्टात येण्यासोबतच पंपहाऊसच्या वरच्या बाजूस पुलांचे बांधकाम झाल्यामुळेही पाणी उपलब्धतेवर परिणाम झाला असल्याचे ग्रामपंचायतीने नमूद केले आहे.

यामुळे गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी पर्यायी उपाय म्हणून जिल्हा परिषदेकडील मंद्रूप येथील पाझर तलाव (सितामाई तलाव) वापरण्याची मागणी करण्यात आली होती. उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, तलावाची एकूण साठवण क्षमता २६५.६१२ घनमीटर असून सध्या त्यामध्ये सुमारे ४५ टक्के म्हणजे ११९.५२ घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे उजनी कालव्याद्वारे तलावात पाणी सोडले जात असल्याने आवश्यक पाणीपुरवठा करणे शक्य असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीने टंचाईच्या ९० दिवसांच्या कालावधीसाठी एकूण १ कोटी ८० लाख लिटर पाण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनीही सकारात्मक अभिप्राय दिला असून, जलसंपदा विभागाकडून आकारण्यात येणारी पाणीपट्टी भरण्यास ग्रामपंचायत तयार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, शासनाच्या १९९५ च्या परिपत्रकानुसार पाझर तलावातील पाण्याचा सिंचनासाठी वापर करण्यास निर्बंध आहेत. मात्र संबंधित तलावाचे रूपांतर साठवण तलावात झाले असल्याने आणि उजनी कालव्याद्वारे पाणी उपलब्ध होत असल्याने विशेष बाब म्हणून पाणी उपशास अनुमती देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे.

समितीसमोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावानुसार ही परवानगी केवळ सन २०२६ च्या टंचाई कालावधीपुरती मर्यादित राहणार आहे. तसेच दररोज उपसा होणाऱ्या पाण्याची स्वतंत्र नोंद ठेवणे, त्यावर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने देखरेख करणे आणि जलसंपदा विभागाची पाणीपट्टी नियमित भरणे या अटी ग्रामपंचायतीवर लागू राहणार आहेत.

**- एच.सी.सपताळे,**
जिल्हा जलसंधारण अधिकारी लघु पाटबंधारे जिल्हा परिषद सोलापूर

## सेंट जॉन्स स्कुलचा सलग आठव्या वर्षी शंभर टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. १० मे-**

वेळापूर येथील सेंट जॉन्स इंग्लिश मीडियम स्कूलने सलग आठव्या वर्षी दहावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. प्रणिती मनोज हिने ९२.८० टक्के गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. कृपाल उल्हासने ९०.०० टक्के गुणांसह दुसरा तर जाधव ज्ञानेश्वरी हिने ८९.८० टक्के गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला.जानकर ईश्वरी हिने ८७.६० टक्के गुणांसह चतुर्थ, आडत श्रावणी हिने ८६.८० टक्के गुणांसह पाचवा तर इडियाडील जस्से इलियास जॉन याने ८३.४० टक्के गुणांसह सहावा क्रमांक मिळवला. शाळेतील १७ पैकी ३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यमध्ये उत्तीर्ण झाले. यशाबद्दल शाळेचे संस्थापक सोमी जॉन व मुख्याध्यापिका मिस शीजी जॉर्ज यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे अभिनंदन केले.